# क्रिकेटचे कायदे

# THE LAWS OF CRICKET

संहिता २०१७ (दुसरी आवृत्ती - २०१९)

Code 2017 (2nd Edition - 2019)

मॅरीलेबोन क्रिकेट क्लब

Marylebone Cricket Club

मराठी अनुवाद - प्रणव मनोहर जोशी
बीसीसीआय पंच

**प्रस्तावना**

क्रिकेट या खेळाचे २७० पेक्षा जास्त वर्षे कायद्याच्या अनेक संहितांद्वारे नियमन केले जात आहे. या संहितांमध्ये त्या त्या वेळच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांनुसार काही नवीन भर घातली गेली आणि बदलही केले गेले. १७८७ मध्ये स्थापन झाल्यापासून ही संहिता तयार करण्याचे किंवा त्यात बदल करण्याचे सर्व अधिकार मेरीलेबन क्रिकेट क्लब (MCC) यांच्याकडेच आहेत. याचे जागतिक हक्कही क्लबकडेच आहेत.

क्रिकेटचे पायाभूत नियम काळाच्या कसोटीवर घासून सिध्द झाले आहेत. याचे खरे कारण म्हणजे पारंपारिक रित्या, खेळाडूंनी खेळण्याची तयारी केवळ कायद्यानुसारच नव्हे तर, २००० सालापासून अस्तित्वात आलेल्या प्रस्तावनेनुसार, हा खेळ खिलाडूवृत्तीने कसा खेळला जाईल हे ध्यानात ठेऊन केली आहे.

या २०१७ च्या संहितेमध्ये केलेले बदल हे, या खेळाची जागतिक नियामक संस्था असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेसह जगभरातील सर्व स्तरावरील खेळाडू, पंच व प्रशासक याच्याशी केलेल्या चर्चेचे प्रतिबिंब आहे. या खेळाचा विकास इतक्या जलदगतीने झाला, की केवळ १५ वर्षात २००० सालच्या संहितेच्या सहा आवृत्त्या निघाल्या. या सुधारणांचे सुसूत्रीकरण करण्याकरिता आणि कायद्यांची मांडणी तर्कशुद्ध स्वरुपात करण्याकरिता नवीन संहिता आणणे आवश्यक होते. चर्चेमधून आलेली या बदलांमागील मार्गदर्शक तत्त्वे, बॅट आणि चेंडू यांदरम्यान योग्य संतुलन आणणे, कायदे समजून घेण्यासाठी सोपे करणे, खेळाडूंच्या हिताचे संरक्षण करणे आणि खेळाडूंचे गैरवर्तन रोखण्यासाठी पंचांना आणखी सक्षम करणे, ही होती. महिला आणि मुलींमधील खेळाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे प्रथमच हे कायदे पुरुष किंवा स्त्रिया यापैकी एकाला उद्देशून न लिहिता तटस्थ राहून लिहिले आहेत.

एमसीसीचे क्रिकेटचे कायदे हे सर्व क्रिकेट सामन्यांचा गाभा आहेत. विविध स्पर्धा आणि नियामक मंडळे त्यानंतर या कायद्यांत त्यांच्या विविध गरजांप्रमाणे, उदा. लहान वयोगटाचे क्रिकेट सामने, टी-२० सामने, कसोटी सामने, सुधारणा करून त्यांचे नियम बनवतात. अशा प्रकारच्या नियमांमध्ये धावा काढणे, बळी मिळवणे अशा प्रकारच्या खेळाच्या मुलभूत तत्वांमध्ये बदल होत नाही.

प्रकाशनाच्या वेळी या पुस्तकातील कायदे अचूक असेच आहेत मात्र एमसीसीचे संकेतस्थळ (www.lords.org) आणि Laws of cricket App या कायद्यांच्या डिजिटल आवृत्त्यांमध्ये गरज भासल्यास किरकोळ बदल केले जातील.

**या कायद्यांच्या इतिहासातील महत्वाच्या तारखा पुढीलप्रमाणे:**

**१७००** क्रिकेटला या तारखेपासून ओळख मिळाली.

**१७४४** माहीत असेलेली सर्वात आधीची संहिता लंडनमधील तोफखान्याचे मैदान वापरणाऱ्या काही 'ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लोकांनी' तयार केली.

**१७५५** 'अनेक क्लब्सनी आणि विशेषतः पॉलमॉल मधील स्टार अँड गार्टरनी' या कायद्यांमध्ये सुधारणा केली.

**१७७४** यापुढील सुधारित आवृत्तीची निर्मिती केंट, हॅम्पशायर, सरे, ससेक्स, मिडलसेक्स आणि लंडन मधील 'ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लोकांच्या' समितीने स्टार अँड गार्टर येथे केली.

**१७८६** यापुढील सुधारणा याच प्रकारच्या केंट, हॅम्पशायर, सरे, ससेक्स, मिडलसेक्स आणि लंडन मधील "ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लोकांच्या' समितीने केली.

**१७८८** एमसीसी कायद्याची पहिली संहिता ३० मे रोजी स्वीकारली गेली.

**१८३५** कायद्याची नवी संहिता एमसीसीच्या समितीने १९ मे रोजी मंजूर केली.

**१८८४** जगभरातल्या क्रिकेट क्लब्सशी चर्चा करून काही महत्त्वाच्या बदलांसह नवी संहिता २१ एप्रिल रोजी एमसीसीच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर झाली.

**१९४७** कायद्याची नवी संहिता ७ मे रोजी एमसीसीच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर झाली. त्यातील बदलांचा मुख्य उद्देश कायद्यांमध्ये स्पष्टता आणणे, त्याची अधिक चांगली मांडणी करणे आणि ते समजायला अधिक सोपे करणे हा होता.

**१९७९** सन १९४७ मधील संहितेच्या पाच आवृत्त्यांनंतर नवीन आवृत्तीचे काम १९७४ पासून सुरू झाले, ज्याचा उद्देश त्यातील काही विसंगती दूर करणे आणि इतर काही आवश्यक सुधारणा करून त्यात स्पष्टता व साधेपणा आणणे हा होता. कायद्याची नवी संहिता एमसीसीच्या विशेष सर्वसाधारण सभेत २१ नोव्हेंबर रोजी मंजूर झाली व १९८० साली अंमलात आणली गेली.

**१९९२** दरम्यानच्या १२ वर्षांमध्ये मंजूर झालेल्या सुधारणांचा अंतर्भाव करून १९८० च्या संहितेच्या दुसऱ्या आवृत्तीची निर्मिती केली गेली.

**२०००** क्रिकेटमधील खिलाडूवृत्तीची परिभाषा स्पष्ट केलेल्या प्रस्तावनेसह कायद्यांची नवी संहिता ३ मे २००० रोजी मंजूर केली गेली.

**२००७** एमसीसीने कायद्याचे कार्यकारी मंडळ बदलून कायद्याची उपसमिती स्थापन केली.

**२०१०** सन २००० सालच्या संहितेची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली. ५ मे रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत एमसीसीच्या सदस्यांनी, एमसीसीच्या समितीला सदस्यांच्या मंजुरीशिवाय क्रिकेटचे कायदे बदलण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले.

**२०१७** सन २००० सालच्या संहितेच्या सहा आवृत्त्यांनंतर, १ ऑक्टोबर २०१७ रोजी नवीन संहिता अस्तित्वात आली.

दरवर्षी कायद्यांविषयी अनेक प्रश्न एमसीसीकडे निर्णयासाठी पाठवले जातात. कायद्याचे सर्वमान्य पालक म्हणून एमसीसी, अशा प्रश्नांची उत्तरे देण्यास व कायद्याचा नेमका अर्थ सांगण्यास नेहमीच तयार असते. मात्र हलक्या प्रतीच्या किंवा कोणत्याही प्रकारे पैज अथवा जुगाराशी संबंधित असलेल्या प्रश्नांना उत्तरे न देण्याचा हक्क एमसीसी राखून ठेवत आहे.

**जी. डब्लू. लवेंडर**
कार्यकारी अधिकारी आणि सचिव, एमसीसी

लॉर्डस क्रिकेट मैदान,
लंडन, NW8 8QN
१ ऑक्टोबर २०१७

**अनुक्रमणिका**


| | | |
|---|---|---|
| **उद्देशिका -** | क्रिकेटमधील खिलाडूवृत्ती | **५** |
| **कायदा १** | खेळाडू | **६** |
| **कायदा २** | पंच | **७** |
| **कायदा ३** | स्कोअरर्स | **१२** |
| **कायदा ४** | चेंडू | **१२** |
| **कायदा ५** | बॅट | **१३** |
| **कायदा ६** | खेळपट्टी | **१६** |
| **कायदा ७** | क्रीझेस | **१७** |
| **कायदा ८** | यष्टी | **१८** |
| **कायदा ९** | खेळण्याच्या क्षेत्राची तयारी व देखभाल | **१९** |
| **कायदा १०** | खेळपट्टी आच्छादित करणे | **२१** |
| **कायदा ११** | मध्यंतरे | **२२** |
| **कायदा १२** | खेळाची सुरुवात; खेळ थांबवणे | **२६** |
| **कायदा १३** | डाव | **२९** |
| **कायदा १४** | फॉलोऑन | **३०** |
| **कायदा १५** | डाव घोषित करणे व डाव न खेळता सोडणे | **३१** |
| **कायदा १६** | निकाल | **३१** |
| **कायदा १७** | षटक | **३४** |
| **कायदा १८** | धावा जमा करणे | **३६** |
| **कायदा १९** | सीमारेषा | **४०** |
| **कायदा २०** | डेड चेंडू | **४४** |
| **कायदा २१** | नोबॉल | **४६** |
| **कायदा २२** | वाईड चेंडू | **५०** |
| **कायदा २३** | बाय व लेग बाय | **५२** |
| **कायदा २४** | क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती; बदली खेळाडू | **५३** |
| **कायदा २५** | फलंदाजाचा डाव; रनर | **५६** |
| **कायदा २६** | मैदानावरील सराव | **५९** |
| **कायदा २७** | यष्टीरक्षक | **६१** |
| **कायदा २८** | क्षेत्ररक्षक | **६३** |
| **कायदा २९** | यष्टी पडली | **६६** |
| **कायदा ३०** | फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझबाहेर | **६७** |

| | | |
|---|---|---|
| **कायदा ३१** | अपील्स | ६९ |
| **कायदा ३२** | त्रिफळाचीत | ७० |
| **कायदा ३३** | झेल | ७१ |
| **कायदा ३४** | चेंडू दोनदा मारला | ७२ |
| **कायदा ३५** | स्वयंचीत | ७३ |
| **कायदा ३६** | पायचीत | ७४ |
| **कायदा ३७** | क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे | ७५ |
| **कायदा ३८** | धावचीत | ७७ |
| **कायदा ३९** | यष्टीचीत | ७८ |
| **कायदा ४०** | उशिर झाला म्हणून बाद | ७९ |
| **कायदा ४१** | अनुचित खेळ | ८० |
| **कायदा ४२** | खेळाडूंचे वर्तन | ९५ |
| **परिशिष्ट 'अ'** | मजकुरात स्पष्ट न केल्या गेलेल्या शब्दांच्या किंवा वाक्प्रचारांच्या व्याख्या आणि त्याचे स्पष्टीकरण | १०२ |
| **परिशिष्ट 'ब'** | कायदा ५ (बॅट) | १०९ |
| **परिशिष्ट 'क'** | कायदे ६ (खेळपट्टी) आणि ७ (क्रीझेस) | ११३ |
| **परिशिष्ट 'ड'** | कायदा ८ (यष्टी) | ११४ |
| **परिशिष्ट 'इ'** | यष्टिरक्षणाचे ग्लोव्हज | ११५ |
| **विषय सूची** | | ११६ |

प्रस्तुत अनुवाद मूळ इंग्रजी कायद्याप्रमाणे करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. तथापि, अर्थ स्पष्ट होण्यासाठी काही ठिकाणी थोडी सवलत घेण्यात आलेली आहे. मात्र, वादाच्या प्रसंगी मूळ इंग्रजी कायदेच प्रमाणभूत मानावेत.

काही सूचना असल्यास impranav_2000@yahoo.com वर संपर्क साधावा.

**उद्देशिका - क्रिकेटमधील खिलाडूवृत्ती**

क्रिकेट या खेळाची लोकप्रियता व या खेळातून मिळणारा आनंद हा केवळ खेळ नियमाप्रमाणे खेळल्यामुळेच नव्हे तर खिलाडूवृत्तीने खेळल्यामुळेही मिळतो.

खेळ खिलाडूवृत्तीने खेळला जाईल हे पाहण्याची मुख्य जबाबदारी कर्णधारांवर असेल, मात्र, यात सर्व खेळाडू, पंच, स्कोअरर्स, सामन्याचे अधिकारी आणि, विशेषतः कनिष्ठ दर्जाच्या क्रिकेटमध्ये, शिक्षक, प्रशिक्षक आणि पालक यांचा सहभाग असावा.

आदर हा क्रिकेटमधील खिलाडूवृत्तीच्या केंद्रस्थानी असावा.

तुमच्या संघाचा कर्णधार, संघातील सहकारी, विरुद्ध संघ आणि पंचांचे अधिकार यांचा आदर करावा.

खेळ झुंजार वृत्तीबरोबरच खिलाडूवृत्तीनेही खेळावा.

पंचांच्या निर्णयाचा स्वीकार करावा.

तुमच्या स्वतःच्या वागणुकीने सकारात्मक वातावरण तयार करावे व इतरांनाही तसे वागण्यास प्रोत्साहन द्यावे.

जेव्हा परिस्थिती तुम्हाला अनुकूल नसेल तेव्हाही वागणुकीत स्वयंशिस्त दाखवावी.

प्रतिस्पर्धी संघाच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करावे व तुमच्या स्वतःच्या संघाच्या यशाचा मनमुराद आनंद लुटावा.

सामन्याचा निकाल काहीही लागला तरी सामन्याच्या शेवटी अधिकाऱ्यांचे व विरुद्ध संघाचे आभार मानावेत.

क्रिकेट हा एक रोमांचक खेळ आहे जो नेतृत्वगुण, मैत्री आणि सांघिक प्रयत्न यांच्या वाढीस प्रोत्साहन देतो व, खिलाडूवृत्तीने खेळल्यास, विविध राष्ट्राच्या, संस्कृतीच्या आणि धर्माच्या लोकांना एकत्र आणतो.

*क्रिकेट या खेळात खेळाडू, पंच आणि स्कोअरर स्त्री किंवा पुरुष कोणीही असू शकतील आणि कायदे सर्वांना सारखेच लागू राहतील. संपूर्ण मजकूरात, तो/ती अशा पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी सर्वनामाचा वापर, कायद्याची स्पष्टता कमी होणार नाही याची काळजी घेऊन, शक्य तेवढा सर्वसमावेशक व व्यवहार्य केलेला आहे. जेथे विशेष उल्लेख केलेला आहे तेथे सोडून, कायद्यातील सर्व तरतुदी स्त्री व पुरुष सर्वांना समान लागू होतील.*

## कायदा १ खेळाडू

### १.१ खेळाडूंची संख्या

सामना दोन संघात खेळवला जाईल. प्रत्येक संघात ११ खेळाडू असतील ज्यांपैकी एक कर्णधार असेल.

आधी करार केल्यास सामना ११ पेक्षा कमी किंवा जास्त खेळाडूंच्या संघात खेळवता येईल. मात्र कधीही अकरा पेक्षा जास्त खेळाडू क्षेत्ररक्षण करणार नाहीत.

जर सामन्यादरम्यान कोणत्याही कारणासाठी संघातील खेळाडूंची संख्या मूळ नामांकन झालेल्या खेळाडूंच्या संख्येपेक्षा कमी झाली तर, कायद्यानुसार अथवा नाणेफेकीआधी झालेल्या करारानुसार, सामना शक्य तेवढा वेळ चालू राहील.

### १.२ नामांकन आणि खेळाडूंच्या मूळ यादीत बदल

नाणेफेकीआधी दोन्ही कर्णधार त्याच्या/तिच्या संघातील खेळाडूंची यादी कोणत्याही एका पंचाकडे लेखी स्वरूपात सादर करतील. नामांकनानंतर विरुद्ध संघाच्या कर्णधाराच्या परवानगीशिवाय यात बदल करता येणार नाही.

### १.३ कर्णधार

**१.३.१** कोणत्याही वेळी जर कर्णधार उपलब्ध नसेल तर त्याच्या/तिच्या ऐवजी त्याचा/तिचा प्रतिनिधी ही भूमिका पार पाडेल.

**१.३.२** जर खेळाडूंचे नामांकन करण्यासाठी कर्णधार उपलब्ध नसेल तर त्या संघाशी संबंधित कोणतीही व्यक्ती त्याचा/तिचा प्रतिनिधी म्हणून ही जबाबदारी पार पाडेल. १.२ पाहा.

**१.३.३** खेळाडूंचे नामांकन झाल्यावर कधीही, नामांकन झालेला/झालेली एक खेळाडूच या कायद्यात नमूद केलेली कर्णधाराची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पडू शकेल ज्यात नाणेफेकीचाही समावेश असेल. कायदा १३.४ (नाणेफेक) पाहा.

### १.४ कर्णधाराची जबाबदारी

खेळ खिलाडूवृत्तीला धरून तसेच कायद्यानुसार खेळला जात आहे हे पाहण्याची जबाबदारी सर्वस्वी कर्णधारांची राहील. 'उद्देशिका - क्रिकेटमधील खिलाडूवृत्ती' आणि कायदा ४१.१ (उचित व अनुचित खेळ - कर्णधारांची जबाबदारी) पाहा.

## कायदा २ पंच

### २.१ नियुक्ती आणि उपस्थिती

सामन्यापूर्वी, खेळावर कायद्यानुसार व निष्पक्षपातीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी, प्रत्येक बाजूला एक, याप्रमाणे दोन पंचांची नियुक्ती केली जाईल. पंच दररोज खेळ सुरू होण्याच्या निर्धारित वेळेआधी कमीत कमी ४५ मिनिटे मैदानावर उपस्थित राहतील आणि मैदानाधिकाऱ्यांना तसे कळवतील.

### २.२ पंच बदलणे

सामन्यादरम्यान एखादा पंच, अपवादात्मक परिस्थितीत, केवळ तो/ती जखमी झाल्यास किंवा आजारी पडल्यास, बदलता येईल. जर पंच बदलावाच लागला तर बदली पंच केवळ स्ट्रायकरकडील पंच म्हणून काम पाहील. मात्र जर दोन्ही कर्णधारांची सहमती असेल तर बदली पंच, संपूर्ण जबाबदारी स्वीकारेल.

### २.३ कर्णधारांशी सल्लामसलत

नाणेफेकीआधी पंच

**२.३.१** कर्णधारांची भेट घेतील व खालील गोष्टी निर्धारित करतील.

**२.३.१.१** सामन्यादरम्यान वापरायचे चेंडू. कायदा ४ (चेंडू) पाहा.

**२.३.१.२** खेळाचे तास व ठरलेल्या मध्यंतरांची वेळ आणि कालावधी. एकदिवसीय सामन्यामध्ये चहापानाच्या मध्यंतरासाठी विशिष्ट वेळ ठरवण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी चहापानाचे मध्यंतर दोन डावांच्या मध्ये घेण्याचे ठरवण्यात येऊ शकेल. कायदा ११ (मध्यंतरे) पाहा.

**२.३.१.३** सामन्यादरम्यान कोणते घड्याळ वापरणार आणि आवश्यकता भासल्यास कोणत्या दुसऱ्या घड्याळाचा आधार घेणार.

**२.३.१.४** मैदानाची सीमारेषा आणि सीमापार चेंडूच्या धावा. मैदानात एखादा अडथळा असल्यास आणि चेंडूचा त्याला स्पर्श झाल्यास चेंडू सीमापार गेला असे धरणार किंवा कसे? कायदा १९ (सीमारेषा) पाहा.

**२.३.१.५** आच्छादनांचा वापर. कायदा १० (खेळपट्टी आच्छादित करणे) पाहा.

**२.३.१.६** सामन्याच्या संचालानावर परिणाम करणाऱ्या इतर काही विशेष अटी.

**२.३.२** स्कोअरर्सना वरील २.३.१.२, २.३.१.३, २.३.१.४, आणि २.३.१.६ मधील मुद्द्यांविषयी माहिती देतील.

### २.४ यष्टी, क्रीझेस आणि सीमारेषा

नाणेफेकीआधी आणि सामन्यादरम्यान पंच पुढील गोष्टींविषयी खात्री करून घेतील.

**२.४.१** यष्टी योग्य प्रकारे रोवलेल्या आहेत. कायदा ८ (यष्टी) पाहा.

**२.४.२** क्रीझेस योग्य प्रकारे आखलेली आहेत. कायदा ७ (क्रीझेस) पाहा.

**२.४.३** खेळाच्या मैदानाची सीमारेषा कायदे १९.१ (मैदानावरील सीमारेषा निर्धारित करणे), १९.२ (सीमारेषा ठरवणे व तिची आखणी) आणि १९.३ (सीमारेषा पूर्ववत करणे) यांना अनुसरून आहे.

**२.५ सामन्याचे संचालन, सामन्यात वापरण्याच्या वस्तू आणि उपकरणे**

नाणेफेकीआधी आणि सामन्यादरम्यान पंच पुढील गोष्टींची खात्री करून घेतील.

**२.५.१** सामन्याचे संचालन पूर्णपणे कायद्यानुसार होत आहे.

**२.५.२** सामन्यात वापरण्याच्या वस्तू पुढील तरतुदींप्रमाणे आहेत.

**२.५.२.१** कायदा ४ (चेंडू).

**२.५.२.२** कायदा ५ (बॅट) आणि परिशिष्ट 'ब' मधील बाहेरून दिसू शकणाऱ्या तरतुदी.

**२.५.२.३** कायदा ८.२ (यष्टीची मापे) आणि ८.३ (बेल्स) किंवा, लागू असल्यास, कायदा ८.४ (लहान वयोगटाचे क्रिकेट).

**२.५.३** कोणताही खेळाडू परवानगी असलेल्या उपकरणांव्यतिरिक्त इतर उपकरण वापरत नाही. परिशिष्ट अ.२ पाहा. विशेषतः त्यातील 'संरक्षक हेल्मेट'चा अर्थ पाहा.

**२.५.४** यष्टिरक्षणाचे ग्लोव्हज कायदा २७.२ (ग्लोव्हज) च्या तरतुदींना अनुसरून आहेत.

**२.६ उचित व अनुचित खेळ**

उचित व अनुचित खेळ ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी पंचांचा असेल.

**२.७ मैदान, हवामान व प्रकाश यांची योग्यता**

**२.७.१** मैदान, हवामान व प्रकाश किंवा इतर काही अपवादात्मक परिस्थिती खेळण्यासाठी धोकादायक किंवा प्रतिकूल आहे का, याचा निर्णय सर्वस्वी पंचांचा असेल.

केवळ परिस्थिती आदर्श नाही म्हणजे ती धोकादायक किंवा प्रतिकूल आहे असे मानले जाणार नाही.

मैदानावरील गवत आणि चेंडू ओलसर आहे म्हणून परिस्थिती खेळण्यास प्रतिकूल किंवा धोकादायक आहे असे मानले जाणार नाही.

**२.७.२** प्रत्यक्ष परिस्थिती जर कोणत्याही खेळाडूच्या किंवा पंचाच्या सुरक्षिततेला धोका पोहोचवू शकणारी आणि भविष्यकाळातील जोखमीचा अंदाज बांधता येण्यासारखी असेल तर अशी परिस्थिती धोकादायक मानली जाईल.

२.७.३ जरी कोणाच्याही सुरक्षिततेला धोका नसला तरी, ज्या परिस्थितीत खेळ चालू ठेवणे शहाणपणाचे ठरणार नाही अशी परिस्थिती खेळण्यास प्रतिकूल मानली जाईल.

२.७.४ जर पंचांच्या मते मैदान एवढे ओले किंवा निसरडे आहे की ज्यामुळे गोलंदाजांचा पाय घसरू शकेल, क्षेत्ररक्षकाला मुक्तपणे हालचाल करता येणार नाही किंवा फलंदाजांना त्यांचे फटके खेळताना किंवा धाव घेताना अडचण येईल तर, अशी परिस्थिती खेळण्यास धोकादायक आणि प्रतिकूल मानली जाईल.

## २.८ धोकादायक किंवा प्रतिकूल परिस्थितीत खेळ थांबवणे

२.८.१ मैदानाविषयीच्या सर्व संदर्भात खेळपट्टीचा अंतर्भाव असेल. कायदा ६.१ (खेळपट्टीचे क्षेत्र) पाहा.

२.८.२ जर कोणत्याही पंचाच्या मते, मैदान, हवामान, प्रकाश किंवा अन्य कोणतीही परिस्थिती खेळण्यास धोकादायक किंवा प्रतिकूल असेल तर पंच खेळ थांबवतील किंवा सुरू करणार नाहीत किंवा पुन्हा सुरू करणार नाहीत.

२.८.३ जेव्हा खेळ थांबविलेला असेल तेव्हा परिस्थितीवर देखरेख करण्याची जबाबदारी पंचांची असेल. ते योग्य तितक्या वेळा, खेळाडू किंवा अधिकारी यांना बरोबर न घेता, मैदानाची पाहणी करतील. परिस्थिती धोकादायक किंवा प्रतिकूल नाही याबाबत दोन्ही पंचांचे एकमत झाल्याबरोबर ते खेळ पुन्हा सुरू करण्यासाठी खेळाडूंना पाचारण करतील.

## २.९ पंचांची जागा

निर्णय द्यावा लागेल अशी कोणतीही घटना जेथून सर्वात चांगली दिसेल अशा ठिकाणी पंच उभे राहतील.

ही गोष्ट विचारात घेऊन, गोलंदाजाला रन-अप घ्यायला व स्ट्रायकरला चेंडू पहायला अडथळा येणार नाही अशा ठिकाणी गोलंदाजाकडील पंच उभा राहील.

स्ट्रायकरकडील पंच ऑन साईड ऐवजी खेळपट्टीच्या ऑफ साईडला उभा राहू शकेल. असे करताना त्याने/तिने क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार, स्ट्रायकर व दुसऱ्या पंचाला सांगावे.

## २.१० पंचांनी बाजू बदलणे

दोन्ही संघांचा एक-एक डाव पूर्ण झाल्यावर पंच आपली बाजू बदलतील. कायदा १३.३ (पूर्ण झालेला डाव) पाहा.

## २.११ मतभेद आणि वादविवाद

कोणत्याही मुद्द्यावर मतभेद किंवा वादविवाद झाल्यास दोन्ही पंच मिळून अंतिम निर्णय घेतील. कायदा ३१.६ (पंचांची सल्लामसलत) सुद्धा पाहा.

## २.१२ पंचाचा निर्णय

पंच आपला कोणताही निर्णय बदलू शकेल, मात्र असा बदल तातडीने करायला हवा. या व्यतिरिक्त पंचानी एकदा दिलेला निर्णय अंतिम राहील.

## २.१३ इशारे

**२.१३.१** पंच खालील प्रमाणे इशारे करतील.

**२.१३.१.१** चेंडू खेळीत असताना करावयाचे इशारे

**डेड चेंडू** - मनगटे कमरेच्या खाली पुन्हा पुन्हा एकमेकांवरून आडवी हलवून

**नोबॉल** - एक हात आडवा धरून

**बाद देणे** - तर्जनी डोक्याच्या वर उंचावून (नाबाद असल्यास पंच तसा पुकार करेल)

**वाईड** - दोन्ही हात आडवे धरून

**२.१३.१.२** चेंडू डेड झाल्यावर गोलंदाजाकडील पंच 'बाद' सोडून २.१३.१.१ मधील सर्व इशारे स्कोअरर्सना पुन्हा करेल.

**२.१३.१.३** खालील इशारे स्कोअरर्सना चेंडू डेड झाल्यावरच केले जातील.

**चौकार**- एक हात बाजूने हलवून व शेवटी छातीजवळ थांबवून

**षटकार** - दोन्ही हात डोक्याच्या वर उंचावून

**बाय** - उघडा हात डोक्याच्या वर उंचावून

**शेवटच्या तासाची सुरुवात** - एक हात उंच करून दुसऱ्या हाताने उंचावलेल्या हाताचे मनगट दाखवून

**फलंदाजी संघास ५ दंड धावा बहाल करणे** - एका खांद्याला विरुद्ध हाताने पुन्हा पुन्हा स्पर्श करून

**क्षेत्ररक्षक संघास ५ दंड धावा बहाल करणे** - एक हात विरुद्ध खांद्यावर नुसता ठेवून.

**लेग बाय**- उंचावलेल्या गुढघ्यास हाताने स्पर्श करून

**नवीन चेंडू** - चेंडू डोक्याच्या वर धरून.

**पूर्वीचा इशारा रद्द करणे** - दोन्ही खांद्यांना विरुद्ध हाताने स्पर्श करून.

**तोकडी धाव** - हात वर वाकवून जवळच्या खांद्याला बोटाच्या टोकांनी स्पर्श करून.

पुढील इशारे खेळाडूंच्या वर्तणुकीबद्दलच्या तिसऱ्या आणि चौथ्या स्तराच्या गुन्ह्यांबद्दल आहेत. प्रत्येक इशाऱ्याचे दोन भाग आहेत. स्कोअरर्सनी दोन्ही भागांसाठी वेगवेगळी पोच द्यावी.

**तिसऱ्या स्तराचा गुन्हा**

भाग १ - एक हात बाजूला आडवा करून आणि तो एकसारखा वर खाली करून.

भाग २ - दोन्ही हात खांद्याच्या उंचीपर्यंत उंचावून, हाताची बोटे पसरवून, हाताचे तळवे स्कोअररच्या दिशेने धरून.

**चौथ्या स्तराचा गुन्हा**

भाग १ - एक हात बाजूला आडवा करून आणि तो एकसारखा वरखाली करून.

भाग२ - तर्जनी, शरीराच्या एका बाजूला खांद्याच्या उंचीपर्यंत वर उचलून.

**२.१३.१.४** तोकड्या धावेचा इशारा सोडून २.१३.१.३ मधील सर्व इशारे गोलंदाजाकडील पंच करेल. तोकड्या धावेचा इशारा, तोकडी धाव ज्या बाजूला काढली असेल त्या बाजूचा/बाजूची पंच करेल. मात्र स्कोअररला करायच्या शेवटच्या इशाऱ्याची व एका पेक्षा जास्त तोकड्या धावा असल्यास, किती धावा जमा करायच्या हे त्याला कळवण्याची जबाबदारी गोलंदाजाकडील पंचाची असेल.

**२.१३.२** खेळ पुढे सुरू करण्याआधी, आपल्या प्रत्येक इशाऱ्याची स्कोअररकडून वेगवेगळी पोच मिळेपर्यंत पंच थांबेल.

जर एकापेक्षा जास्त इशारे करायचे असतील तर, ज्या क्रमाने प्रसंग घडले त्या क्रमाने ते करावेत.

## २.१४ पंचांना कळवणे

या कायद्यानुसार, कर्णधाराने किंवा इतर खेळाडूंनी पंचांना देण्याची माहिती कोणत्याही एका पंचाला देणे पुरेसे असेल. सदर माहिती तो/ती पंच दुसऱ्या पंचाला कळवेल.

## २.१५ धावसंख्येची अचूकता

जेथे शंका असेल तेथे पंचांनी व स्कोअरर्सनी सल्लामसलत करणे आवश्यक आहे. संपूर्ण सामन्यात धावा, बाद झालेले गडी आणि, योग्य तेथे, टाकलेल्या षटकांची संख्या यांच्या अचूकतेबद्दल पंच स्वतःची खात्री करून घेतील. स्कोअरर्सबरोबर अशी सहमती पंच, पाण्याची

मध्यंतरे सोडून, इतर मध्यंतरांत आणि सामना संपल्यावर करून घेतील. कायदे ३.२ (धावसंख्येची अचूकता), १६.८ (निकालाची अचूकता) आणि १६.१० (निकाल बदलता येणार नाही) पाहा.

## कायदा ३ स्कोअरर्स

### ३.१ स्कोअरर्सची नेमणूक

काढलेल्या धावा, बाद झालेले गडी आणि, योग्य तेथे, टाकलेली षटके यांची नोंद करण्यासाठी दोन स्कोअरर्सची नेमणूक करण्यात येईल.

### ३.२ धावसंख्येची अचूकता

स्कोअरर्स आपल्या नोंदी बरोबर असल्याची वेळोवेळी खात्री करतील. ते पंचांबरोबर, काढलेल्या धावा, बाद झालेले गडी आणि, योग्य तेथे, टाकलेली षटके यांबाबत, पाण्याची मध्यंतरे सोडून, इतर मध्यंतरांत आणि सामना संपल्यावर, सहमती करून घेतील. कायदा २.१५ (धावसंख्येची अचूकता) पाहा.

### ३.३ इशाऱ्याची पोच देणे

स्कोअरर्स पंचांनी त्यांना दिलेल्या सर्व सूचना व इशारे स्वीकारतील व लगेचच प्रत्येक इशाऱ्याची वेगवेगळी पोच देतील.

## कायदा ४ चेंडू

### ४.१ वजन व आकार

चेंडू, नवीन असताना, त्याचे वजन ५.५ औंस/१५५.९ ग्रॅम पेक्षा कमी किंवा ५.७५ औंस/१६३ ग्रॅम पेक्षा जास्त असू नये आणि त्याचा परीघ ८.८१ इंच/२२.४ से.मी. पेक्षा कमी किंवा ९ इंच/२२.९ से.मी. पेक्षा जास्त नसावा.

### ४.२ चेंडूची निवड आणि ताबा

**४.२.१** पंचांनी निवडलेले, सामन्यात वापरायचे सर्व चेंडू नाणेफेकीच्या आधीपासून ते सामना संपेपर्यंत पंचांच्या नियंत्रणाखाली राहतील.

**४.२.२** गडी बाद झाल्यावर, मध्यंतर सुरू झाल्यावर किंवा सामन्यात व्यत्यय आल्यास पंच चेंडू आपल्या ताब्यात घेतील.

### ४.३ नवीन चेंडू

सामन्यापूर्वी दुसरा काही करार झालेला नसल्यास, कोणताही कर्णधार प्रत्येक डावाच्या सुरूवातीला नवीन चेंडूची मागणी करू शकेल.

### ४.४ एकापेक्षा जास्त दिवसांच्या सामन्यात नवीन चेंडू

अपूर्ण षटक सोडून, जुन्या चेंडूने टाकलेली षटके ८० किंवा त्यापेक्षा जास्त असतील, तर एकापेक्षा जास्त दिवसांच्या सामन्यात, क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार नवीन चेंडूची मागणी करू शकेल. जेव्हा खेळण्यासाठी नवीन चेंडू घेतला जाईल तेव्हा पंच दुसऱ्या पंचाला त्याची माहिती देईल व, फलंदाजांना व स्कोअरर्सना तसे सूचित करेल.

### ४.५ चेंडू हरवला किंवा खेळण्यास निरुपयोगी झाला

जर, सामना चालू असताना, चेंडू हरवला किंवा हाती येत नसला किंवा सामान्य वापरामुळे तो खेळण्यास निरुपयोगी झाला आहे याविषयी पंचांचे एकमत झाले तर त्याऐवजी जवळपास आधीच्या चेंडू इतकी झीज झालेला असा दुसरा चेंडू घेतला जाईल. जेव्हा चेंडू बदलला जाईल तेव्हा पंच फलंदाजांस व क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधारास त्याविषयी माहिती देईल.

### ४.६ मोजमापे

वरील ४.१ मध्ये दिलेली मोजमापे फक्त पुरुषांच्या क्रिकेटसाठी लागू राहतील. पुढील मोजमापे महिला क्रिकेट व लहान वयोगटाच्या १३ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेटमध्ये लागू होतील.

**४.६.१** महिला क्रिकेट

वजन: ४.९४ औंस/१४० ग्रॅम ते ५.३१ औंस/१५१ ग्रॅम पर्यंत
परीघ: ८.२५ इंच/२१.० से.मी. ते ८.८८ इंच/२२.५ से.मी. पर्यंत

**४.६.२** लहान वयोगटाचे क्रिकेट - १३ वर्षाखालील मुलांसाठी

वजन: ४.६९ औंस/१३३ ग्रॅम ते ५.०६ औंस/१४४ ग्रॅम पर्यंत
परीघ: ८.०६ इंच/२०.५ से.मी. ते ८.६९ इंच/२२.० से.मी. पर्यंत

## कायदा ५ बॅट

### ५.१ बॅट

**५.१.१** बॅटचे दोन भाग असतात, एक हॅंडल आणि एक पाते.

**५.१.२** बॅटवरील प्राथमिक बंधने व तिची मोजमापे या कायद्यामध्ये नमूद केलेली आहेत व त्याचा सविस्तर तपशील परिशिष्ट 'ब' मध्ये दिला आहे.

### ५.२ हॅंडल

**५.२.१** हॅंडल प्रामुख्याने बांबूचे आणि/किंवा लाकडाचे बनवलेले असावे.

**५.२.२** पात्याच्या पूर्णपणे बाहेर असलेला हॅंडलचा भाग हा हॅंडलचा वरचा भाग म्हणून ओळखला जाईल. तो बॅट धरता यावी यासाठी एका सरळ दांडयासारखा असेल.

**५.२.३** या बॅटच्या वरच्या भागाला परिशिष्ट ब.२.२ मध्ये सांगितल्याप्रमाणे ग्रीप लावता येईल.

## ५.३ पाते

**५.३.१** बॅटचे पाते म्हणजे, ५.२ आणि परिशिष्ट ब.३ मध्ये सांगितल्याप्रमाणे हँडल सोडून इतर सर्व बॅट.

**५.३.२** पाते हे फक्त लाकडाचेच असावे.

**५.३.३** बॅटच्या पात्यावर व्यावसायिक चिन्हे असू शकतील ज्यांचा आकार परिशिष्ट ब.६ मधील तपशिलाप्रमाणे असावा.

## ५.४ संरक्षण आणि दुरुस्ती

खालील सर्व बाबी परिशिष्ट ब.४ मधील तपशिलाप्रमाणे असाव्यात तसेच त्यामुळे ५.५ मधील तरतुदींचे उल्लंघन होऊ नये.

**५.४.१** केवळ,

पात्याचा पृष्ठभाग, कडा किंवा खांदे यांच्या संरक्षणासाठी

किंवा पात्याचा पृष्ठभाग खराब झाला असल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी,

वापरण्यात येणारा पदार्थ, पात्यावर लावण्याच्या वेळी किंवा त्यानंतर, कडक होणार नसावा.

**५.४.२** पृष्ठभागाचे नुकसान सोडून पात्याच्या खराब झालेल्या इतर भागाच्या दुरुस्तीकरता

**५.४.२.१** पात्याच्या आत घन पदार्थ घालता येईल.

**५.४.२.२** पात्याच्या आत घालण्यासाठी फक्त लाकूड आणि गरजेपुरता गोंद वापरण्याची परवानगी असेल.

**५.४.३** पात्याच्या तळाचे नुकसान होऊ नये म्हणून त्याच्या संरक्षणासाठी एखादा पदार्थ त्यावर लावता येईल मात्र असा पदार्थ पात्याचा पृष्ठभाग, मागचा भाग किंवा त्याच्या बाजू यांवर जाऊ नये.

## ५.५ चेंडूला हानी पोहोचणे

**५.५.१** बॅटचा आच्छादित किंवा अनाच्छादित असा कोणताही भाग, त्यात वापरण्यात आलेल्या पदार्थाच्या कठीणपणामुळे आणि/किंवा त्याच्या पृष्ठभागाच्या पोतामुळे, चेंडूची प्रमाणाबाहेर झीज होईल अशा प्रकारचा नसावा.

**५.५.२** तसेच बॅटच्या कोणत्याही भागावरील कोणत्याही कारणासाठी वापरण्यात आलेल्या कोणत्याही पदार्थामुळे चेंडूची प्रमाणाबाहेर झीज होऊ नये.

**५.५.३** या कायद्यापुरते, प्रमाणाबाहेर झीज म्हणजे पात्यावरील आच्छादनाशिवाय फक्त लाकडाच्या बॅटने चेंडू मारल्यामुळे सामान्यतः चेंडूची जी झीज होते, त्यापेक्षा जास्त होणारी झीज.

## ५.६ चेंडूचा स्पर्श

या कायद्यांमध्ये,

**५.६.१** वेगळे नमूद केलेले नसल्यास, बॅट म्हणजे फलंदाजाने हातात किंवा त्याने/तिने हातात घातलेल्या ग्लोव्हमध्ये, धरलेली बॅट.

**५.६.२** चेंडूचा पुढील ५.६.२.१ ते ५.६.२.४ मधील कशालाही स्पर्श झाल्यास चेंडू बॅटला लागला अथवा चेंडूचा बॅटला स्पर्श झाला किंवा चेंडू बॅटने मारला असे मानले जाईल.

**५.६.२.१** प्रत्यक्ष बॅट

**५.६.२.२** फलंदाजाने ज्या हातात बॅट धरलेली आहे तो हात

**५.६.२.३** फलंदाजाने ज्या हातात बॅट धरलेली आहे त्या हातात घातलेल्या ग्लोव्हचा कोणताही भाग

**५.६.२.४** ५.४ प्रमाणे परवानगी असलेला इतर कोणताही पदार्थ

## ५.७ बॅटच्या आकारावरील मर्यादा

**५.७.१** हँडलचा खालचा भाग पात्यामध्ये घातल्यानंतर बॅटची एकूण लांबी ३८ इंच/९६.५२ से.मी. पेक्षा जास्त नसावी.

**५.७.२** बॅटच्या पात्याची मोजमापे खालीलपेक्षा जास्त नसावी.

रुंदी ४.२५ इंच/१०.८ से.मी.

खोली २.६४ इंच/६.७ से.मी.

कडा १.५६ इंच/४.० से.मी.

शिवाय, ती बॅट, परिशिष्ट ब.८ मध्ये सांगितल्याप्रमाणे, बॅटमापक यंत्रातूनही जायला हवी.

**५.७.३** क्रमांक ६ किंवा त्यापेक्षा कमी आकाराच्या बॅट सोडून, इतर प्रकारच्या बॅटचे हँडल बॅटच्या एकूण लांबीच्या ५२% पेक्षा जास्त नसावे.

**५.७.४** ५.४.१ मध्ये आच्छादनासाठी परवानगी दिलेल्या पदार्थाची जाडी ०.०४ इंच/०.१ से.मी. पेक्षा जास्त नसावी.

**५.७.५** बॅटच्या तळाला लावण्याच्या संरक्षक पदार्थाची जाडी जास्तीत जास्त ०.१२ इंच/०.३ से.मी. असावी.

### ५.८ बॅटचे प्रकार

**५.८.१** 'अ', 'ब' आणि 'क' प्रकारच्या बॅट ५.१ ते ५.७ च्या तरतुदींनुसार असाव्यात.

**५.८.२** 'अ' प्रकारच्या बॅट कोणत्याही दर्जाच्या क्रिकेटमध्ये वापरता येतील.

**५.८.३** 'ड' प्रकारच्या बॅट परिशिष्ट ब.७ मधील तपशिलाप्रमाणे असाव्यात आणि त्या लहान मुलांनी फक्त लहान वयोगटाच्या क्रिकेटमध्येच वापराव्यात.

**५.८.४** 'ब', 'क' आणि 'ड' प्रकारच्या आणि इतर कोणत्याही प्रकारच्या बॅट संबंधित देशातील क्रिकेट प्रशासकांनी ठरविलेल्या एका विशिष्ट दर्जापर्यंतच्या क्रिकेटमध्ये वापरता येतील.

**५.८.५** ज्या बॅट 'अ' ते 'ड' यांपैकी कोणत्याच प्रकारात मोडत नाहीत त्यांना या कायद्याअंतर्गत मान्यता नाही.

## कायदा ६ खेळपट्टी

### ६.१ खेळपट्टीचे क्षेत्र

खेळपट्टी म्हणजे २२ यार्ड/२०.१२ मी. लांब आणि १० फूट/३.०५ मी. रुंद असलेले आयताकृती क्षेत्र. त्याच्या दोन्ही टोकांना बोलिंग क्रीझ असेल आणि दोन्ही बाजूला, मधल्या यष्टींच्या केंद्रबिंदूला जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या प्रत्येक बाजूला ५ फूट/१.५२ मी. अंतरावर एक, अशा एकमेकांशी समांतर दोन काल्पनिक रेषांनी मर्यादित असेल. जर खेळपट्टीला लागून एखादी कृत्रिम खेळपट्टी असेल आणि ती मधल्या यष्टींपासून ५ फुटापेक्षा कमी अंतरावर असेल तर खेळपट्टी, त्या बाजूला, दोन्ही पृष्ठभागांना जोडणाऱ्या रेषेपर्यंत मर्यादित असेल. कायदे ८.१ (वर्णन, रुंदी आणि यष्टी रोवणे), ८.४ (लहान वयोगटाचे क्रिकेट) आणि ७.२ (बोलिंग क्रीझ) पाहा.

### ६.२ खेळण्यासाठी खेळपट्टीची योग्यता

खेळण्यासाठी खेळपट्टीची योग्यता ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी पंचांचा असेल. कायदे २.७ (मैदान, हवामान व प्रकाश यांची योग्यता) आणि २.८ (धोकादायक किंवा प्रतिकूल परिस्थितीत खेळ थांबवणे) पाहा.

### ६.३ खेळपट्टीची निवड आणि तयारी

सामन्यापूर्वी खेळपट्टीच्या निवडीची व तयारीची जबाबदारी मैदान अधिकाऱ्यांची असेल. सामन्यादरम्यान तिचा वापर आणि देखभाल यांचे नियंत्रण पंचांच्या हाती राहील.

### ६.४ खेळपट्टी बदलणे

सामन्यादरम्यान खेळपट्टी बदलता येणार नाही. मात्र खेळपट्टीवर खेळणे धोकादायक किंवा प्रतिकूल आहे असे जर पंचांना वाटले तर दोन्ही कर्णधारांची सहमती असल्यास ते खेळपट्टी बदलू शकतील.

### ६.५ कृत्रिम खेळपट्टी

जर सामना कृत्रिम खेळपट्टीवर खेळवण्यात येत असेल तर अशा कृत्रिम खेळपट्टीची मोजमापे पुढीलप्रमाणे असतील.

लांबी - कमीतकमी ५८ फूट/१७.६८ मी.

रुंदी - कमीतकमी ६ फूट/१.८३ मी.

कायदा ९.८ (कृत्रिम खेळपट्ट्या) पाहा.

## कायदा ७ क्रीझेस

### ७.१ क्रीझेस

७.२, ७.३ आणि ७.४ मध्ये दाखवल्याप्रमाणे, खेळपट्टीच्या दोन्ही टोकांना, एक बोलिंग क्रीझ, एक पॉपिंग क्रीझ आणि दोन रिटर्न क्रीझेस पांढऱ्या रेषेने आखली जातील. परिशिष्ट 'क' पाहा.

### ७.२ बोलिंग क्रीझ

बोलिंग क्रीझ म्हणजे आखलेल्या रेषेची मागील कडा. ही रेषा कायदा ६.१ (खेळपट्टीचे क्षेत्र) प्रमाणे खेळपट्टीची समाप्ती दर्शवते. ही रेषा ८ फूट ८ इंच/२.६४ मी. इतकी लांब असेल.

### ७.३ पॉपिंग क्रीझ

पॉपिंग क्रीझ म्हणजे आखलेल्या रेषेची मागील कडा. ही रेषा बोलिंग क्रीझच्या पुढे आणि त्याला समांतर असेल आणि बोलिंग क्रीझपासून ४ फूट/१.२२ मी. अंतरावर असेल. पॉपिंग क्रीझ दोन्ही बाजूच्या मधल्या यष्टींच्या केंद्रबिंदूला जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या दोन्ही बाजूला कमीतकमी ६ फूट/१.८३ मी. पर्यंत आखलेले असेल आणि ते अमर्यादित आहे असे मानले जाईल.

### ७.४ रिटर्न क्रीझेस

रिटर्न क्रीझेस म्हणजे आखलेल्या रेषांची आतील कडा. ही रेषा, पॉपिंग क्रीझशी काटकोनात आखली जाईल. ही रेषा दोन्ही बाजूच्या मधल्या यष्टींना जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या दोन्ही बाजूला ४ फूट ४ इंच/१.३२ मी. अंतरावर असेल. प्रत्येक रिटर्न क्रीझ हे पॉपिंग क्रीझपासून, त्याच्या मागे, कमीतकमी ८ फूट/२.४४ मी. पर्यंत आखले जाईल आणि ते अमर्यादित आहे असे मानले जाईल.

## कायदा ८ यष्टी

### ८.१ वर्णन, रुंदी आणि यष्टी रोवणे

दोन्ही बाजूला, बोलिंग क्रीझच्या मध्यभागी यष्ट्यांचे दोन संच समोरासमोर व एकमेकांना समांतर असे रोवले जातील. प्रत्येक संच हा ९ इंच/२२.८६ से.मी. रुंद असेल. प्रत्येक संचात तीन लाकडी यष्ट्या व त्यावर दोन लाकडी बेल्स असतील. परिशिष्ट 'ड' पाहा.

### ८.२ यष्टींची मापे

यष्टींची उंची जमिनीच्या वर २८ इंच/७१.१२ से.मी. इतकी असेल आणि बेल्सच्या खाचा सोडून त्याच्या वरच्या भागाचा आकार घुमटासारखा असेल. वरचा घुमटासारखा भाग सोडून, जमिनीच्या वर असलेला यष्टींचा आकार नळीसारखा असेल व त्याचा परीघ १.३८ इंच/३.५० से.मी. पेक्षा कमी आणि १.५ इंच/३.८१ सेमी पेक्षा जास्त नसेल. परिशिष्ट 'ड' पाहा.

### ८.३ बेल्स

**८.३.१** बेल्स, यष्टींवर ठेलेल्या असताना,

- यष्टींहून ०.५ इंच/१.२७ से.मी. पेक्षा वर राहू नयेत.
- यष्टी फाकून तिरक्या न होता त्या यष्टींवर योग्य प्रकारे बसाव्यात.

**८.३.२** प्रत्येक बेलचे माप खालीलप्रमाणे असावे. (परिशिष्ट 'ड' पाहा):

| | |
|---|---|
| एकूण लांबी | - ४.३१ इंच/१०.९५ से.मी. |
| मधल्या नळीसारख्या भागाची लांबी | - २.१३ इंच/५.४० से.मी. |
| मोठी दांडी | - १.३८ इंच/३.५० से.मी. |
| छोटी दांडी | - ०.८१ इंच/२.०६ से.मी. |

**८.३.३** मोठी दांडी, छोटी दांडी आणि मधला नळीसारखा भाग यांची मध्यरेषा एकच असावी.

**८.३.४** सामन्याची प्रशासकीय समिती आणि मैदान अधिकारी यांची मान्यता असल्यास, खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी, बेल्सच्या उडण्याला मर्यादा घालणारे उपकरण वापरण्यास परवानगी असेल.

### ८.४ लहान वयोगटाचे क्रिकेट

यष्टी आणि बेल्सची मोजमापे आणि दोन्ही बाजूच्या यष्टींमधील अंतर याविषयी संबंधित देशातील क्रिकेट नियामक मंडळ निर्णय घेईल.

## ८.५ बेल्स काढून ठेवणे

आवश्यक वाटल्यास, दोन्ही पंच सहमतीने यष्टींवरील बेल्स काढून ठेवतील. पंचांची अशा प्रकारची सहमती झाल्यास दोन्ही बाजूला बेल्स वापरल्या जाणार नाहीत. परिस्थिती अनुकूल झाल्यावर लगेचच बेल्स पुन्हा वापरण्यात येतील. कायदा २९.४ (बेल्स काढून ठेवणे) पाहा.

# कायदा ९ खेळण्याच्या क्षेत्राची तयारी व देखभाल

## ९.१ रोलिंग

खालील ९.१.१ व ९.१.२ प्रमाणे सोडून सामन्यादरम्यान रोलिंग केले जाणार नाही.

### ९.१.१ रोलिंगची वारंवारिता आणि कालावधी

सामन्यादरम्यान, फलंदाजी संघाच्या कर्णधाराने विनंती केल्यास खेळपट्टीवर जास्तीत जास्त ७ मिनिटे रोलिंग करता येईल. हे रोलिंग सामन्याचा पहिला डाव सोडून इतर डावांच्या सुरुवातीला आणि पहिला दिवस सोडून इतर प्रत्येक दिवसाच्या सुरुवातीला केले जाईल. ९.१.४ पाहा.

### ९.१.२ उशिरा सुरू होणाऱ्या सामन्यातील रोलिंग

वरील रोलिंग शिवाय, नाणेफेकीनंतर जर सामन्याचा पहिला डाव सुरू होण्यास उशिर झाला तर फलंदाजी संघाचा कर्णधार जास्तीत जास्त ७ मिनिटे रोलिंग करण्याची विनंती करू शकेल. मात्र पंचांच्या मते, उशिर झाल्यामुळे खेळपट्टीच्या स्थितीत लक्षणीय बदल झाला नसेल, तर ते अशा रोलिंगची परवानगी नाकारतील.

### ९.१.३ रोलरची निवड

एकापेक्षा जास्त रोलर उपलब्ध असल्यास फलंदाजी संघाचा कर्णधार कोणता रोलर वापरायचा त्याची निवड करेल.

### ९.१.४ रोलिंग करण्याची वेळ

दिवसाचा खेळ सुरू होण्याच्या आधी करण्यात येणारे रोलिंग (जास्तीत जास्त ७ मिनिटे) खेळ सुरू होण्याच्या किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या ३० मिनिटांपेक्षा आधी सुरू करता येणार नाही. मात्र फलंदाजी संघाचा कर्णधार अशा रोलिंगची सुरुवात खेळ सुरू होण्याच्या किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या १० मिनिटे आधीपर्यंत लांबवू शकेल.

## ९.२ खेळपट्टीवरील सैल दगड माती काढणे

### ९.२.१ खेळपट्टीवरील सैल दगड माती खालील वेळी काढली जाईल.

**९.२.१.१** प्रत्येक दिवसाचा खेळ सुरू होण्याआधी. खेळपट्टीवरील गवत कापल्यानंतर आणि रोलिंगच्या आधी, खेळ सुरू होण्याच्या किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या ३० मिनिटे आधीपासून उशिरात उशिरा १० मिनिटे आधीपर्यंत हे केले जाईल.

**९.२.१.२** दोन डावांमधील मध्यंतरात. रोलिंग करायचे असल्यास त्याआधी हे केले जाईल.

**९.२.१.३** खानपानाच्या सर्व मध्यंतरांत.

**९.२.२** ९.२.१ प्रमाणे खेळपट्टीवरील सैल दगड माती झाडून काढली जाईल. मात्र झाडल्यामुळे खेळपट्टीवर विपरीत परिणाम होऊ शकेल असे पंचांना वाटले तर खेळपट्टीवरील सैल दगड माती झाडून न काढता हाताने काढली जाईल.

**९.२.३** ९.२.१ व्यतिरिक्त, खेळपट्टीवरील सैल दगड माती, झाडून न काढता, गवत कापायच्या आधी, हाताने काढली जाऊ शकते आणि कोणत्याही पंचाला आवश्यकता वाटल्यास, ते कधीही काढली जाऊ शकते.

## ९.३ गवत कापणे

**९.३.१** गवत कापण्याची जबाबदारी

**९.३.१.१** सामन्यापूर्वी गवत कापण्याची जबाबदारी ही सर्वस्वी मैदान अधिकाऱ्यांची असेल.

**९.३.१.२** त्यानंतर पंचांच्या देखरेखीखाली गवत कापले जाईल.

**९.३.२** खेळपट्टी आणि बाहेरील मैदान

संपूर्ण सामन्यात मैदानाची स्थिती दोन्ही संघांसाठी शक्य तेवढी समान राहावी यासाठी, मैदान आणि हवामान यांची परिस्थिती अनुकूल असल्यास, खेळपट्टी आणि बाहेरील मैदानावरील गवत, खेळ सुरू होण्याची अपेक्षा असलेल्या प्रत्येक दिवशी कापण्यात येईल.

जर, मैदान आणि हवामान यांची परिस्थिती सोडून इतर काही कारणामुळे बाहेरील मैदानावरील गवत कापणे शक्य नसेल तर, मैदान अधिकारी कर्णधारांना आणि पंचांना सामन्यादरम्यानच्या गवत कापण्याच्या प्रक्रियेविषयी माहिती देतील.

**९.३.३** गवत कापण्याची वेळ

**९.३.३.१** खेळपट्टीवरील गवत कापण्याचे काम, रोलिंगच्या आधी खेळपट्टी झाडण्यापूर्वी, सामना सुरू होण्याच्या किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या ३० मिनिटे आधी पूर्ण केले जाईल. गरज भासल्यास, गवत कापण्याआधी खेळपट्टीवरील सैल दगड माती, झाडून न काढता, हाताने काढली जाईल. ९.२.३ पाहा.

९.३.३.२ कोणत्याही दिवशी बाहेरील मैदानावरील गवत कापण्याचे काम सामना सुरू होण्याच्या किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे आधीपर्यंत पूर्ण केले जाईल.

### ९.४ खेळपट्टीवर पाणी मारणे

सामन्यादरम्यान खेळपट्टीवर पाणी मारले जाणार नाही.

### ९.५ क्रीझेस पुन्हा आखणे

कोणत्याही पंचाला कधीही आवश्यकता भासल्यास क्रीझेस पुन्हा आखली जातील.

### ९.६ पायामुळे झालेल्या खड्ड्यांची देखभाल

खेळण्यात सुलभता यावी म्हणून पंच, गरज असेल तेव्हा, फलंदाज आणि गोलंदाज यांनी केलेल्या खड्ड्यांची स्वच्छता करून व सुकवून घेतील.

एकापेक्षा जास्त दिवसांच्या सामन्यात, आवश्यकता भासल्यास, गोलंदाजाच्या शेवटच्या झेपेमुळे झालेले खड्डे बुजवून घेण्यास पंच परवानगी देतील. यासाठी लवकर वाळणारा मातीचा भराव वापरता येईल.

### ९.७ पाऊल घसरू नये म्हणून उपाय व खेळपट्टीची देखभाल

खेळ चालू असताना, पाऊल घसरू नये म्हणून पंच खेळाडूंना भुसा वापरण्यास परवानगी देतील, मात्र यामुळे खेळपट्टी खराब होऊ नये आणि कायदा ४१ (अनुचित खेळ) चे उल्लंघन होऊ नये.

### ९.८ कृत्रिम खेळपट्ट्या

९.१ ते ९.७ मधील तरतुदी योग्य तेथे लागू होतील.

## कायदा १० खेळपट्टी आच्छादित करणे

### १०.१ सामन्यापूर्वी

सामन्यापूर्वी आच्छादने घालण्याची जबाबदारी मैदान अधिकाऱ्यांची आहे आणि गरज भासल्यास खेळपट्टी पूर्णपणे आच्छादित करता येईल.

तथापि, मैदान अधिकारी योग्य अशी सुविधा उपलब्ध करून देतील की ज्यायोगे खेळाडूंच्या नामांकानापूर्वी कर्णधार खेळपट्टी पाहू शकतील व पंच कायदा २ (पंच), ६ (खेळपट्टी), ७ (क्रीझेस), ८ (यष्टी) आणि ९ (खेळण्याच्या क्षेत्राची तयारी व देखभाल) नुसार आपली कर्तव्ये बजावू शकतील.

**१०.२ सामन्यादरम्यान**

नाणेफेकीपूर्वी काही करार झालेला नसल्यास, सामन्याच्या दिवशी रात्री आणि सामन्यादरम्यान खराब हवामानात,

**१०.२.१** संपूर्ण खेळपट्टीवर आणि त्यापलीकडे दोन्ही बाजूला ४ फूट/१.२२ मी. पर्यंत आच्छादने घातली जातील.

**१०.२.२** शक्य तेथे, गोलंदाजांचे रन-अप आच्छादित केले जातील.

**१०.३ आच्छादने काढणे**

**१०.३.१** जर नाणेफेकीनंतर खेळपट्टी रात्रभर आच्छादित केलेली असेल, तर खेळ सुरू होण्याची शक्यता असलेल्या प्रत्येक दिवशी शक्य तितक्या लवकर ही आच्छादने काढली जातील.

**१०.३.२** जर खराब हवामानापासून संरक्षण करण्यासाठी दिवसाही अशी आच्छादने घातलेली असतील किंवा खराब हवामानामुळे रात्रभर घातलेली आच्छादने काढण्यास उशिर झाला असेल तर, परिस्थिती अनुकूल झाल्यावर तत्परतेने ही आच्छादने काढली जातील.

## कायदा ११ मध्यंतरे

**११.१ मध्यंतर**

**११.१.१ मध्यंतरांचे प्रकार खालीलप्रमाणे:**

- एका दिवसाचा खेळ संपल्यापासून दुसऱ्या दिवशी खेळ सुरू होईपर्यंतचा कालावधी
- दोन डावांमधील मध्यंतरे
- खानपानाची मध्यंतरे
- पाण्याची मध्यंतरे
- कराराप्रमाणे ठरलेले इतर कोणतेही मध्यंतर

**११.१.२** केवळ ही मध्यंतरे कायदा २४.२.६ साठी नियोजित मध्यंतरे म्हणून धरली जातील.

**११.२ मध्यंतराचा कालावधी**

**११.२.१** जेवणाच्या किंवा चहापानाच्या मध्यंतराचा कालावधी कायदा २.३ (कर्णधारांशी सल्लामसलत) मध्ये ठरल्याप्रमाणे असेल व हा कालावधी मध्यंतराआधी 'टाईम' म्हटल्यापासून मध्यंतरानंतर खेळ पुन्हा सुरू करताना 'प्ले'चा पुकार करेपर्यंत मोजला जाईल.

**११.२.२** दोन डावांमधील मध्यंतर १० मिनिटांचे असेल. ते डाव संपल्यावर सुरू होईल व पुढचा डाव सुरू करताना 'प्ले'चा पुकार करेपर्यंत असेल. तथापि, ११.३, ११.५ व ११.६ पाहा.

## ११.३ डावांमधील मध्यंतरासाठी वेगळा वेळ न देणे

११.५ आणि ११.६ च्या तरतुदींव्यतिरिक्त,

**११.३.१** जर एखाद्या संघाचा डाव कोणत्याही दिवसाचा खेळ संपण्यासाठी १० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी वेळ असताना संपला तर त्यादिवशी खेळ पुढे चालू राहणार नाही. दुसऱ्या दिवशी खेळ सुरू करण्याच्या वेळेत डावांमधील मध्यंतराच्या या १० मिनिटांमुळे बदल केला जाणार नाही.

**११.३.२** जर १० मिनिटांपेक्षा जास्त कालावधीचा व्यत्यय चालू असताना फलंदाजी संघाच्या कर्णधाराने डाव घोषित केला आणि व्यत्ययाची कमीतकमी १० मिनिटे शिल्लक असतील तर, डावांमधील मध्यंतराच्या या १० मिनिटांमुळे खेळ सुरू करण्याच्या वेळेत कोणताही बदल केला जाणार नाही व त्याचा व्यत्ययातच अंतर्भाव आहे असे मानले जाईल. जर कर्णधाराने डाव घोषित केला किंवा डाव न खेळता सोडला त्या वेळी व्यत्ययाची १० पेक्षा कमी मिनिटे शिल्लक असतील तर पुढचा डाव, डाव घोषित केल्यापासून किंवा डाव न खेळता सोडल्यापासून १० मिनिटांनी सुरू होईल.

**११.३.३** जर कर्णधाराने पाण्याची मध्यंतरे सोडून इतर मध्यंतरात डाव घोषित केला तर, त्या मध्यंतराची कमीतकमी १० मिनिटे उरलेली असल्यास, त्या मध्यंतराचा कालावधी ठरल्याप्रमाणे राहील आणि डावांमधील मध्यंतराचा त्यातच अंतर्भाव आहे असे मानले जाईल. मात्र कर्णधाराने डाव घोषित केला किंवा डाव न खेळता सोडला तेव्हा मध्यंतराची १० पेक्षा कमी मिनिटे शिल्लक असतील तर मध्यंतर संपण्याची वेळ गरजेपुरती पुढे ढकलली जाईल व डाव घोषित केल्यापासून किंवा डाव न खेळता सोडल्यापासून १० मिनिटांनी पुढचा डाव सुरू होईल.

## ११.४ मध्यंतराची ठरलेली वेळ बदलणे

जर, सामन्यादरम्यान कधीही,

मैदान, हवामान, प्रकाश किंवा इतर अनिवार्य कारणामुळे खेळाचा वेळ वाया गेला,

किंवा नियोजित मध्यंतर सोडून, खेळाडूंना मैदान सोडून जावे लागले,

तर दोन पंच आणि दोन्ही कर्णधार सहमत असल्यास जेवणाची अथवा चहापानाची वेळ बदलता येईल मात्र यामुळे ११.२, ११.५, ११.६, ११.७ व ११.८.३ मधील तरतुदींचे उल्लंघन होऊ नये.

## ११.५ जेवणाची ठरलेली वेळ बदलणे

**११.५.१** जर एखाद्या संघाचा डाव जेवणाच्या ठरलेल्या वेळेला १० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी वेळ असताना संपला तर जेवणाचे मध्यंतर लगेचच घेतले जाईल. ते ठरलेल्या कालावधीचे असेल व डावांमधील मध्यंतराच्या १० मिनिटांचा त्यातच अंतर्भाव आहे असे मानले जाईल.

**११.५.२** जर मैदान, हवामान, प्रकाश किंवा इतर काही अनिवार्य कारणामुळे जेवणाच्या ठरलेल्या मध्यंतरासाठी १० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी वेळ असताना खेळ थांबला तर, वरील ११.४ प्रमाणे काही करार झाला असला किंवा नसला तरीही, मध्यंतर लगेचच घेतले जाईल. ते ठरलेल्या कालावधीचे असेल. मध्यंतर संपल्यावर किंवा परिस्थिती अनुकूल झाल्यावर लगेच खेळ पुन्हा सुरू केला जाईल.

**११.५.३** जर कोणत्याही कारणास्तव, जेवणाच्या ठरलेल्या वेळेला १० मिनिटांपेक्षा जास्त काळ शिल्लक असताना खेळाडूंना मैदान सोडावे लागले तर, पंच आणि कर्णधार यांनी मिळून जेवणाची वेळ न बदलल्यास, जेवण ठरलेल्या वेळी घेण्यात येईल.

## ११.६ चहापानाची ठरलेली वेळ बदलणे

**११.६.१** जर एखाद्या संघाचा डाव चहापानाच्या ठरलेल्या वेळेला ३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी वेळ असताना संपला तर चहापानाचे मध्यंतर लगेचच घेतले जाईल. ते ठरलेल्या कालावधीचे असेल व डावांमधील मध्यंतराच्या १० मिनिटांचा त्यातच अंतर्भाव आहे असे मानले जाईल.

**११.६.२** जर चहापानाच्या ठरलेल्या वेळेला ३० मिनिटे असताना डावांमधील मध्यंतर चालू असेल तर, परिस्थिती अनकूल असल्यास, खेळ १० मिनिटांनी सुरू होईल.

**११.६.३** जेव्हा मैदान, हवामान, प्रकाश किंवा इतर अनिवार्य कारणामुळे चहापानाला ३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी वेळ असताना खेळ थांबला, तेव्हा जर,

११.४ प्रमाणे, चहापानाची वेळ बदलण्याचा करार झाला नसेल

किंवा ११.९ मध्ये परवानगी असल्याप्रमाणे, दोन्ही कर्णधार चहापानाचे मध्यंतर रद्द करण्यास सहमत नसतील

तर मध्यंतर लगेचच घेतले जाईल. ते ठरलेल्या कालावधीचे असेल. मध्यंतर संपल्यावर किंवा परिस्थिती अनुकूल झाल्यावर लगेचच खेळ सुरू होईल.

**११.६.४** जर चहापानाच्या ठरलेल्या वेळेला ३० मिनिटे असताना खेळ आधीपासूनच थांबलेला असेल तर, ११.४ लागू होईल.

## ११.७ जेवणाचे किंवा चहापानाचे मध्यंतर - ९ गडी बाद

जेवणाच्या व चहापानाच्या मध्यंतराच्या

वेळेच्या ३ मिनिटे आधीच ९ गडी बाद झालेले असतील,

किंवा आधीच्या ३ मिनिटात अथवा मध्यंतराच्या ठरलेल्या वेळेला चालू असलेल्या षटकातील शेवटचा चेंडू टाकून होईपर्यंत, ९ वा गडी बाद झाला,

तर, कायदा १२.५.२ लागू होणार नाही आणि खेळाडूंना मैदान सोडावे न लागल्यास किंवा आधी डाव न संपल्यास, मध्यंतर ठरलेल्या मूळ वेळेच्या ३० मिनिटांनंतर चालू असलेले षटक संपेपर्यंत घेतले जाणार नाही.

कायद्याच्या या विभागासाठी फलंदाज निवृत्त झाला तर गडी बाद झाला असे मानले जाणार नाही.

### ११.८ पाण्याची मध्यंतरे

**११.८.१** जर कोणत्याही दिवशी पंचांनी पाण्याची मध्यंतरे घेण्याचे ठरवले तर अशी मध्यंतरे घेण्याचा पर्याय दोन्ही संघांकडे उपलब्ध राहील. असे प्रत्येक मध्यंतर कमीतकमी वेळेत घेण्यात येईल व कोणत्याही परिस्थितीत ५ मिनिटांपेक्षा जास्त काळ असणार नाही.

**११.८.२** ११.९ मध्ये परवानगी दिल्याप्रमाणे दोन्ही कर्णधार मध्यंतर न घेण्याचे ठरवू शकतील. तसे न झाल्यास, मध्यंतराच्या ठरलेल्या वेळी चालू असलेले षटक संपल्यावर पाण्याचे मध्यंतर घेतले जाईल. मात्र, जर, ठरलेल्या वेळेच्या आधीच्या ५ मिनिटात गडी बाद झाला किंवा फलंदाज निवृत्त झाला तर पाण्याचे मध्यंतर लगेचच घेतले जाईल.

११.८.३ मधील तरतुदींव्यतिरिक्त पाण्याच्या मध्यंतराची वेळ बदलता येणार नाही.

**११.८.३** जर पाण्याच्या मध्यंतराच्या ठरलेल्या वेळेच्या आधीच्या ३० मिनिटात डाव संपला किंवा इतर काही कारणासाठी खेळाडूंना मैदान सोडावे लागले तर दोन्ही पंच आणि कर्णधार मिळून त्या सत्रासाठी पाण्याच्या मध्यंतराची वेळ पुनर्निर्धारित करतील.

**११.८.४** कायदा १२.६ (सामन्याचा शेवटचा तास - षटकांची संख्या) अनुसार सामन्याच्या शेवटच्या तासात पाण्याचे मध्यंतर घेता येणार नाही. ही एक अट सोडून, पंच नाणेफेकीच्या आधी आणि पुढील प्रत्येक दिवसाचा खेळ सुरू होण्याच्या १० मिनिटे आधीपर्यंत, पाण्याच्या मध्यंतरांची वेळ निर्धारित करतील.

### ११.९ मध्यंतर न घेण्याचे ठरवणे

सामन्यादरम्यान कधीही, दोन्ही कर्णधार मिळून चहापानाचे आणि पाण्याचे कोणतेही मध्यंतर न घेण्याचे ठरवू शकतील व त्याप्रमाणे पंचांना आपला निर्णय कळवतील.

खेळ चालू असताना, फलंदाजी संघाच्या कर्णधाराऐवजी मैदानावरील फलंदाज, त्या सत्रातील पाण्याचे मध्यंतर न घेण्याविषयी संमती देऊ शकतील.

### ११.१० स्कोअरर्सना कळवणे

खेळाचे तास, मध्यंतरे आणि नियमाप्रमाणे त्यांत करण्यात आलेले बदल याविषयी स्कोअरर्सना कळविल्याची पंच खात्री करून घेतील.

## कायदा १२ खेळाची सुरुवात; खेळ थांबवणे

### १२.१ 'प्ले'चा पुकार

सामन्याचा पहिला चेंडू टाकण्याआधी आणि मध्यंतर किंवा व्यत्ययानंतर खेळ पुन्हा सुरू करताना गोलंदाजाकडील पंच 'प्ले'चा पुकार करेल.

### १२.२ 'टाईम'चा पुकार

चेंडू डेड झाल्यावर, गोलंदाजाकडील पंच, खेळाचे एखादे सत्र संपल्यावर किंवा कायद्यानुसार आवश्यकता भासल्यास 'टाईम'चा पुकार करेल. कायदा २०.३ ('ओव्हर' किंवा 'टाईम'चा पुकार) सुद्धा पाहा.

### १२.३ बेल्स काढणे

'टाईम'चा पुकार झाल्यावर दोन्ही बाजूच्या यष्ट्यांवरील बेल्स काढल्या जातील.

### १२.४ नवीन षटक सुरू करणे

सामन्यादरम्यान, पंच त्यांच्या नेहमीच्या चालीने, पुढील मध्यंतराच्या किंवा खेळ संपायच्या ठरलेल्या वेळेआधी, गोलंदाजाकडील यष्टींच्या मागे त्याच्या जागेवर पोहोचला तर पुढील षटक सुरू करण्यात येईल. मात्र, १२.५.२ अनुसार मध्यंतर घ्यायचे असल्यास हे लागू होणार नाही.

### १२.५ षटक पूर्ण करणे

सामन्याचा शेवट सोडून,

**१२.५.१** षटक चालू असताना जर मध्यंतराची वेळ झाली तर, १२.५.२ प्रमाणे सोडून, मध्यंतर घेण्याआधी चालू षटक पूर्ण केले जाईल.

**१२.५.२** जेव्हा पुढील मध्यंतरासाठी ३ मिनिटांपेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तेव्हा,

एखादा फलंदाज बाद अथवा निवृत्त झाला

किंवा खेळाडूंना मैदान सोडून जावे लागले

तर षटक चालू असले किंवा संपले असले तरीही, लगेचच मध्यंतर घेतले जाईल. अशा परिस्थितीत, डाव संपला नसल्यास, जर षटक अपूर्ण राहिले असेल तर खेळ सुरू झाल्यावर ते पूर्ण केले जाईल.

### १२.६ सामन्याचा शेवटचा तास - षटकांची संख्या

सामन्याच्या ठरलेल्या वेळेप्रमाणे शेवटचा एक तास शिल्लक असताना चालू असलेले षटक पूर्ण केले जाईल. आधी निकाल लागला नसेल आणि मध्यंतर किंवा व्यत्यय आले नसेल तर पुढील षटक हे २० अनिवार्य षटकातील पहिले षटक असेल.

गोलंदाजाकडील पंच खेळाडूंना व स्कोअरर्सना ही २० अनिवार्य षटके सुरू झाल्याचा इशारा करेल. प्रत्यक्षात कितीही वेळ लागला तरी यापुढील कालावधीला 'शेवटचा तास' असे म्हटले जाईल.

शेवटच्या तासातील अनिवार्य षटके टाकून झाल्यावर खेळ संपण्याची ठरलेली वेळ झाली नसेल तरच पुढे षटके टाकण्यात येतील. १२.७ व १२.८ पाहा.

**१२.७ सामन्याचा शेवटचा तास - खेळातील व्यत्यय**

जर सामन्याचा शेवटचा तास चालू असताना खेळात व्यत्यय आला तर टाकण्याची किमान षटके २० अनिवार्य षटकातून पुढीलप्रमाणे कमी करण्यात येतील.

**१२.७.१** व्यत्ययामुळे वाया गेलेला कालावधी, 'टाईम'चा पुकार केल्यापासून ते पंचांनी ठरवलेल्या खेळ सुरू होण्याच्या वेळेपर्यंत मोजला जाईल.

**१२.७.२** वाया गेलेल्या प्रत्येक पूर्ण ३ मिनिटांसाठी एक याप्रमाणे षटके कमी केली जातील.

**१२.७.३** एकापेक्षा जास्त वेळा व्यत्यय आल्यास, वाया गेलेल्या कालावधीची बेरीज न करता प्रत्येक व्यत्ययासाठी वेगळी आकडेमोड केली जाईल.

**१२.७.४** जर खेळाचा शेवटचा एक तास शिल्लक असताना आधीपासूनच व्यत्यय चालू असेल तर,

**१२.७.४.१** आकडेमोडीसाठी शेवटच्या तासाच्या सुरूवातीपासून पुढचा कालावधी मोजण्यात येईल.

**१२.७.४.२** व्यत्ययाआधी चालू असलेले अपूर्ण षटक पूर्ण केले जाईल आणि ते षटक अनिवार्य षटकांमधील एक म्हणून मोजले जाणार नाही.

**१२.७.५** जर शेवटच्या तासाचा खेळ सुरू झाल्यावर चालू षटकामध्ये व्यत्यय आला तर खेळ पुन्हा सुरू झाल्यावर अपूर्ण राहीलेले षटक पूर्ण केले जाईल. ही दोन अपूर्ण षटके मिळून अनिवार्य षटकांतील एक षटक मोजण्यात येईल.

**१२.८ सामन्याचा शेवटचा तास - दोन डावांमधील मध्यंतरे**

जर एखाद्या संघाचा डाव संपल्यामुळे नवीन डाव सामन्याच्या शेवटच्या तासात सुरू होणार असेल तर, डाव संपल्यापासून मध्यंतर सुरू होईल व ते १० मिनिटांनी संपेल.

**१२.८.१** जर हे मध्यंतर शेवटच्या तास सुरू व्हायच्या आधीपासूनच चालू असेल तर, नवीन डावात टाकण्याच्या षटकांची संख्या १२.७ प्रमाणे ठरवण्यात येईल.

**१२.८.२** जर एखाद्या संघाचा डाव शेवटचा तास सुरू झाल्यानंतर संपला तर १२.८.३ व १२.८.४ मध्ये सांगितल्याप्रमाणे दोन प्रकारे आकडेमोड करावी. दोन्ही प्रकारे आकडेमोड केल्यानंतर उत्तरादाखल जी संख्या मोठी येईल, ती म्हणजे नवीन डावात टाकायची अनिवार्य षटके.

**१२.८.३** उरलेल्या षटकांच्या आधारे आकडेमोड

- डाव संपल्यानंतर शेवटच्या तासातील उरलेल्या अनिवार्य षटकांची नोंद करावी.
- जर उत्तर अपूर्णांकात आले तर त्याऐवजी पुढील पूर्णांक धरावा.
- डावाच्या मध्यंतराची तीन षटके वजा करून आलेले उत्तर म्हणजे नवीन डावात टाकायची अनिवार्य षटके.

**१२.८.४** उरलेल्या कालावधीच्या आधारे आकडेमोड

- डाव संपल्यानंतर शेवटच्या तासातील उरलेल्या कालावधीची नोंद करावी.
- डावाच्या मध्यंतराची दहा मिनिटे वजा करून आलेले उत्तर म्हणजे खेळाचा उरलेला कालावधी.
- त्यानंतर खेळाच्या उरलेल्या कालावधीच्या प्रत्येक पूर्ण ३ मिनिटांसाठी एक षटक, व असल्यास, उर्वरित अपूर्ण भागासाठी एक षटक याप्रमाणे षटकांचा हिशेब करावा.

### १२.९ सामना संपला

**१२.९.१** खालील बाबतींत सामना संपला असे समजले जाईल.

**१२.९.१.१** कायदे १६.१ ते १६.४ व १६.५.१ (निकाल) प्रमाणे निकाल लागला.

**१२.९.१.२** जर आधी निकाल लागला नसेल तर,

- शेवटच्या तासातील अनिवार्य षटके संपली
- आणि सामना संपण्याची वेळ झाली.

**१२.९.१.३** कायदा १३.१.२ मधील कराराप्रमाणे, कायदा १३.३.५ मधील डावाच्या व्याख्येप्रमाणे शेवटचा डाव संपला.

**१२.९.२** १२.९.१ प्रमाणे सामन्याचा निकाल लागला नाही आणि मैदान, हवामान व प्रकाश यांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे किंवा इतर काही अनिवार्य कारणामुळे खेळाडूंना मैदान सोडावे लागले व त्यानंतर खेळ झाला नाही तर सामना संपला असे समजण्यात येईल.

### १२.१० सामन्याचे शेवटचे षटक पूर्ण करणे

शेवटच्या दिवशी खेळ संपण्याची वेळ झाली तरीही खालील परिस्थितीत चालू षटक पूर्ण केले जाईल.

सामन्याचा निकाल लागला नसेल,

किंवा खेळाडूंना मैदान सोडावे लागले नसेल. खेळाडूंना मैदान सोडावे लागल्यास, कायदा १६.९ (स्कोअरिंगमधील चुका) चा अपवाद सोडून, खेळ पुन्हा सुरू केला जाणार नाही आणि सामना संपेल.

### १२.११ सामन्याच्या शेवटच्या तासात गोलंदाज षटक पूर्ण करू शकला नाही

जर कोणत्याही कारणासाठी शेवटच्या तासात गोलंदाज आपले षटक पूर्ण करू शकला नाही तर कायदा १७.८ (षटक चालू असताना गोलंदाज गोलंदाजी करण्यास असमर्थ झाला किंवा निलंबित झाला) लागू होईल. अशा षटकाचे वेगवेगळे भाग मिळून एक अनिवार्य षटक मोजले जाईल.

## कायदा १३ डाव

### १३.१ डावांची संख्या

**१३.१.१** सामन्यापूर्वी केलेल्या करारप्रमाणे सामना प्रत्येक संघासाठी एका किंवा दोन डावांचा असेल.

**१३.१.२** सामना मर्यादित षटकांचा किंवा मर्यादित कालावधीचा खेळवता येऊ शकेल. जर अशा प्रकारचा करार झाला तर

**१३.१.२.१** प्रत्येकी एका डावाच्या सामन्यात असा करार दोन्ही डावांना लागू होईल.

**१३.१.२.२** प्रत्येकी दोन डावांच्या सामन्यात असा करार

- दोन्ही संघांच्या पहिल्या डावाला लागू होईल,
- किंवा दोन्ही संघांच्या दुसऱ्या डावाला लागू होईल,
- किंवा दोन्ही संघांच्या दोन्ही डावांना लागू होईल.

प्रत्येकी एका किंवा दोन डावांच्या सामन्यात जर कायदा १६.१ (विजय - दोन डावांचा सामना) किंवा कायदा १६.२ (विजय - एका डावाचा सामना) प्रमाणे सामन्याचा निकाल लागला नाही, तर सामन्याचा निकाल ठरवण्यासाठी लागणाऱ्या निकषांचा त्या करारात समावेश असावा.

### १३.२ आळीपाळीने डाव

दोन डावांच्या सामन्यात, कायदा १४ (फॉलोऑन) किंवा कायदा १५.२ (डाव न खेळता सोडणे) मधील परिस्थिती सोडून, प्रत्येक संघ आपला डाव आळीपाळीने खेळेल.

### १३.३ पूर्ण झालेला डाव

खालीलपैकी कोणत्याही प्रसंगी एका संघाचा डाव पूर्ण झाला असे समजण्यात येईल.

**१३.३.१** संघाचे सर्व गडी बाद झाले.

**१३.३.२** गडी बाद झाल्यावर किंवा फलंदाज निवृत्त झाल्यावर चेंडू टाकायचे शिल्लक असतील मात्र खेळायला यायला फलंदाज उपलब्ध नसेल.

**१३.३.३** कर्णधाराने डाव घोषित केला.

**१३.३.४** कर्णधाराने डाव न खेळता सोडला.

**१३.३.५** १३.१.२ मधील करारानुसार,

ठरलेली षटके पूर्ण झाली

किंवा ठरलेला कालावधी पूर्ण झाला.

यापैकी जे लागू असेल त्याप्रमाणे.

## १३.४ नाणेफेक

डावाच्या निवडीसाठी दोन्ही कर्णधार मैदानावर, एका किंवा दोन्ही पंचांच्या उपस्थितीत, सामना सुरू होण्याच्या निर्धारित किंवा पुनर्निर्धारित वेळेच्या आधी ३० मिनिटांपासून ते १५ मिनिटांपर्यंत नाणेफेक करतील. तथापि, कायदा १.३ (कर्णधार) मधील तरतुदींची नोंद घ्यावी.

## १३.५ निर्णय कळवणे

नाणेफेक जिंकलेला कर्णधार नाणेफेकीनंतर लगेचच आपला फलंदाजी अथवा क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय विरुद्ध संघाच्या कर्णधाराला व पंचांना कळवेल. एकदा कळवल्यावर तो निर्णय बदलता येणार नाही.

# कायदा १४ - फॉलोऑन

## १४.१ पहिल्या डावातील आघाडी

**१४.१.१** दोन डावांच्या ५ किंवा त्यापेक्षा जास्त दिवसांच्या सामन्यात, जो संघ प्रथम फलंदाजी करून कमीतकमी २०० धावांची आघाडी घेईल तो संघ दुसऱ्या संघाला पुन्हा फलंदाजी करण्यास सांगू शकेल.

**१४.१.२** हाच पर्याय ५ पेक्षा कमी दिवसांच्या दोन डावांच्या सामन्यातही उपलब्ध असेल. त्यासाठी कमीतकमी आवश्यक आघाडी पुढीलप्रमाणे:

- ३ किंवा ४ दिवसांच्या सामन्यात १५० धावा;
- २ दिवसांच्या सामन्यात १०० धावा;
- १ दिवसाच्या सामन्यात ७५ धावा.

## १४.२ निर्णयाची सूचना

कर्णधार विरुद्ध संघाच्या कर्णधाराला व पंचांना हा पर्याय निवडण्याविषयीचा निर्णय कळवेल. कळवलेला निर्णय बदलता येणार नाही.

**१४.३ पहिल्या दिवसाचा खेळ वाया गेला**

एकापेक्षा जास्त दिवसांच्या सामन्यात पहिल्या दिवसाचा खेळ पूर्णपणे वाया गेल्यास, १४.१ मधील तरतुदी खेळ सुरू झाल्यापासून उर्वरित दिवसांसाठी लागू होतील. यासाठी खेळ कितीही वाजता सुरू झाला तरी ज्या दिवशी खेळ सुरू होईल तो दिवस सामन्याचा पहिला दिवस मानला जाईल.

'प्ले'चा पुकार झाल्यानंतर, पहिल्या षटकाची सुरुवात झाल्याबरोबर खेळ सुरू झाला असे मानण्यात येईल. कायदा १७.२ (षटकाची सुरुवात) पाहा.

## कायदा १५ डाव घोषित करणे व डाव न खेळता सोडणे

**१५.१ डाव घोषित करण्याची वेळ**

फलंदाजी संघाचा कर्णधार आपला चालू असलेला डाव, चेंडू डेड असताना कधीही घोषित करू शकेल. असा घोषित केलेला डाव, पूर्ण झालेला डाव म्हणून मानला जाईल.

**१५.२ डाव न खेळता सोडणे**

कर्णधार त्याच्या/तिच्या संघाचा कोणताही डाव, त्या डावाची सुरुवात होण्याआधी न खेळता सोडू शकतो. असा सोडलेला डाव, पूर्ण झालेला डाव म्हणून मानला जाईल.

**१५.३ निर्णयाची सूचना**

कर्णधार आपला डाव घोषित करण्याचा अथवा न खेळता सोडण्याचा निर्णय विरुद्ध संघाच्या कर्णधाराला आणि पंचांना कळवेल. एकदा कळवलेला निर्णय बदलता येणार नाही.

## कायदा १६ निकाल

**१६.१ विजय - दोन डावांचा सामना**

जो संघ विरुद्ध संघाच्या दोन पूर्ण डावांच्या एकूण धावसंख्येपेक्षा अधिक धावा करेल तो संघ विजयी होईल. कायदा १३.३ (पूर्ण झालेला डाव) पाहा आणि १६.६ ची सुद्धा नोंद घ्या.

**१६.२ विजय - एका डावाचा सामना**

जो संघ विरुद्ध संघाच्या एका पूर्ण डावाच्या एकूण धावसंख्येपेक्षा अधिक धावा करेल तो संघ विजयी होईल. कायदा १३.३ (पूर्ण झालेला डाव) पाहा आणि १६.६ ची सुद्धा नोंद घ्या.

**१६.३ पंचांनी सामना बहाल करणे**

कायदा १३.१.२ (डावांची संख्या) प्रमाणे झालेला करार जमेस न धरता,

**१६.३.१** एखादा संघ सामना गमावेल जर त्या संघाने

**१६.३.१.१** हार मान्य केली किंवा,

**१६.३.१.२** पंचांच्या मते खेळण्यास नकार दिला. या परिस्थितीत पंच विरुद्ध संघास सामना बहाल करतील.

**१६.३.२** कोणत्याही खेळाडूची किंवा खेळाडूंची एखादी कृती म्हणजे त्या संघाचा खेळण्यास नकार आहे असे एखाद्या पंचाला वाटले तर दोन्ही पंच मिळून अशा कृतीचे कारण जाणून घेतील. त्यानंतर जर, त्यांची कृती ही खेळण्यास नाकारण्याची आहे असे दोन्ही पंचांनी ठरवले तर ते त्या संघाच्या कर्णधारास तसे सांगतील. जर कर्णधार त्याच्या कृतीवर ठाम राहिला तर पंच १६.३.१ अनुसार सामना बहाल करतील. कायदा ४२.६.१ (कर्णधाराने एखाद्या खेळाडूस मैदानाबाहेर काढण्यास नकार देणे) सुद्धा पाहा.

**१६.३.३** जर १६.३.२ मधील कृती खेळ सुरू झाल्यानंतर झाली आणि पंचांच्या मते ती खेळ चालू ठेवण्यास नाकारण्याची नसेल तर,

- कायदा ११ (मध्यंतरे) आणि कायदा २.८ (धोकादायक किंवा प्रतिकूल परिस्थितीत खेळ थांबवणे) सोडून 'टाईम'च्या पुकारापासून ते 'प्ले'च्या पुकारापर्यंतचा खेळाचा कालावधी हा वाया गेलेला कालावधी म्हणून मोजला जाईल.
- त्या दिवशीची खेळ संपण्याची वेळ तेवढ्या कालावधीने पुढे ढकलण्यात येईल.
- लागू असल्यास, केवळ वाया गेलेल्या या कालावधीमुळे सामन्याच्या शेवटच्या तासातील षटके कमी केली जाणार नाहीत.

### १६.४ कायदा १३.१.२ प्रमाणे करार झालेले सामने

कायदा १३.१.२ (डावांची संख्या) प्रमाणे करार झालेल्या कोणत्याही सामन्यात, जर १६.१, १६.२ अथवा १६.३ प्रमाणे निकाल लागला नाही तर निकाल कायदा १३.१.२ मधील कराराप्रमाणे ठरवण्यात येईल.

### १६.५ इतर सर्व सामने - बरोबरी किंवा अनिर्णित

**१६.५.१** बरोबरी

जेव्हा सामन्यातील सर्व डाव पूर्ण होतील आणि दोन्ही संघांची एकूण धावसंख्या समान असेल तेव्हा तो सामना बरोबरीत सुटेल.

**१६.५.२** अनिर्णित

जेव्हा एखाद्या सामन्याचा निकाल १६.१, १६.२, १६.३, १६.४ किंवा १६.५.१ प्रमाणे ठरवता येणार नाही तेव्हा तो सामना अनिर्णित राहील.

### १६.६ विजयाचा फटका अथवा अवांतर धावा

**१६.६.१** जेव्हा सामन्याचा निकाल १६.१, १६.२, १६.३, १६.४ किंवा १६.५.१ प्रमाणे लागेल तेव्हा तो सामना संपेल. कायदा ४१.१८.२ (दंड धावा) चा अपवाद वगळता, त्यानंतर जे काही घडेल त्याचा सामन्यात अंतर्भाव करता येणार नाही. कायदा १६.९ सुद्धा पाहा.

**१६.६.२** झेल घेण्याची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी किंवा ज्यामुळे फलंदाज बाद होऊ शकेल, असा झेल घेण्यास अडथळा आणण्याआधी काढलेल्या धावा सोडून, संघाच्या एकूण धावा पुरेशा असल्या तरच शेवटी फलंदाजी करणारा संघ विजयी होईल.

**१६.६.३** फलंदाजांनी विजयासाठी आवश्यक धावा पूर्ण करण्याआधी चेंडू सीमापार गेला तर सीमापारच्या सर्व धावा त्या संघाच्या एकूण धावांमध्ये जोडल्या जातील व चेंडू बॅटने मारला असल्यास स्ट्रायकरच्या खात्यात जमा होतील.

### १६.७ निकालाचा तपशील

जर शेवटी फलंदाजी करणारा संघ त्यांचे सर्व गडी बाद न होता विजयी झाला तर तो संघ उरलेले गडी राखून विजयी झाला असे नमूद केले जाईल.

जर विरुद्ध संघाच्या एकूण धावांपेक्षा जास्त धावा न करता शेवटी फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव संपला, मात्र ५ दंड धावा मिळाल्यामुळे त्या संघाची धावसंख्या विजयी होण्यासाठी पुरेशी झाली तर तो संघ दंड धावांनी विजयी झाला असे नमूद केले जाईल.

जर शेवटी क्षेत्ररक्षण करणारा संघ विजयी झाला तर तो संघ जास्त असलेल्या धावांनी विजयी झाला असे नमूद केले जाईल.

जर सामन्याचा निर्णय एका संघाने पराभव मान्य केल्यामुळे किंवा खेळण्यास नकार दिल्यामुळे लागला तर सामन्याचा निकाल 'पराभव स्वीकारला' किंवा 'सामना बहाल केला' अशा प्रकारे नमूद केला जाईल.

### १६.८ निकालाची अचूकता

धावसंख्या अचूक असल्याचा निर्णय करण्याची जबाबदारी पंचांची असेल. कायदा २.१५ (धावसंख्येची अचूकता) पाहा.

### १६.९ स्कोअरिंगमधील चुका

जर, सामना संपला असे समजून खेळाडूंनी आणि पंचांनी मैदान सोडल्यावर पंचांना असे आढळून आले की, धावसंख्येत अशी काही चूक आहे की ज्यामुळे निकालावर परिणाम होत आहे तर पंच, १६.१० च्या तरतुदींच्या अधीन राहून, खालील कृती करतील.

**१६.९.१** जर, ज्यावेळी खेळाडूंनी मैदान सोडले त्यावेळी शेवटी फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव संपला नसेल आणि

शेवटच्या तासातील अथवा त्या डावातील षटके संपली नसतील

किंवा खेळ संपण्याची अथवा डाव संपण्याची वेळ झाली नसेल

तर, एका संघाने पराभव न स्वीकारल्यास, पंच खेळ पुन्हा सुरू करण्याचा आदेश देतील.

आधी निकाल न लागल्यास व परिस्थिती खेळण्यायोग्य असल्यास, ठरलेली षटकेपूर्ण होईपर्यंत आणि खेळ संपण्याची वेळ होईपर्यंत किंवा डावाचा ठरलेला कालावधी संपेपर्यंत खेळ चालू राहील. सामना संपला असे समजून 'टाईम'चा पुकार केला तेव्हा जेवढी षटके आणि कालावधी शिल्लक होता तेवढाच तो घेतला जाईल. त्या वेळेपासून खेळ पुन्हा सुरू होईपर्यंत वाया गेलेल्या कालावधीची दखल घेतली जाणार नाही.

**१६.९.२** मात्र जर, 'टाईम'चा हा पुकार झाला तेव्हा षटके संपली असतील आणि खेळाचा कालावधीही शिल्लक नसेल किंवा शेवटी फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव पूर्ण झाला असेल तर पंच दोन्ही कर्णधारांना धावसंख्येतील आणि निकालातील बदल कळवतील.

### १६.१० निकाल बदलता येणार नाही

सामना संपल्यानंतर धावांच्या अचूकतेबद्दल पंच एकदा स्कोअरर्सशी सहमत झाल्यानंतर कायदा २.१५ (धावसंख्येची अचूकता) आणि कायदा ३.२ (धावसंख्येची अचूकता) पाहा - सामन्याचा निकाल बदलता येणार नाही.

## कायदा १७ षटक

### १७.१ चेंडूंची संख्या

सहा चेंडूंचे एक षटक याप्रमाणे खेळपट्टीच्या दोन्ही बाजूंनी आलटून पालटून चेंडू टाकले जातील.

### १७.२ षटकाची सुरुवात

जेव्हा गोलंदाज षटकातील पहिला चेंडू टाकण्यासाठी त्याचा/तिचा रन-अप, किंवा रन-अप नसल्यास, त्याची/तिची त्या षटकातील पहिला चेंडू टाकण्याची कृती सुरू करेल तेव्हा षटक सुरू झाले असे मानण्यात येईल.

### १७.३ चेंडूंची वैधता

**१७.३.१** जरी चेंडू टाकायच्या आधी कायदा ४१.१६ (नॉन-स्ट्रायकरने त्याचे/तिचे क्रीझ लवकर सोडणे) अनुसार फलंदाज बाद झाला किंवा इतर एखादा प्रसंग घडला तरी, चेंडू टाकला जाईपर्यंत तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

**१७.३.२** गोलंदाजाने टाकलेला चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही

**१७.३.२.१** जर स्ट्रायकरला खेळण्याची संधी मिळण्याआधी चेंडू डेड म्हणून घोषित केला गेला किंवा डेड मानला गेला. कायदा २०.६ (डेड चेंडू; चेंडू षटकातील एक म्हणून मोजणे) पाहा.

**१७.३.२.२** जर कायदा २०.४.२.६ अनुसार चेंडू डेड घोषित केला गेला. कायदा २०.४.२.५ (पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे) मधील विशेष तरतुदींचीही नोंद घावी.

**१७.३.२.३** जर तो नोबॉल असेल. कायदा २१ (नोबॉल) पाहा.

**१७.३.२.४** जर तो वाईड चेंडू असेल. कायदा २२ (वाईड चेंडू) पाहा.

**१७.३.२.५** जेव्हा २४.४ (खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे), २८.२ (चेंडू अडवणे), ४१.४ (जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे) किंवा ४१.५ (जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे) यांपैकी कोणताही कायदा लागू होत असेल.

**१७.३.३** १७.३.१ व १७.३.२ मधील सोडून, गोलंदाजाने टाकलेले कोणत्याही प्रकारचे चेंडू वैध चेंडू म्हणून धरले जातील व हे वैध चेंडूच षटकातील एक म्हणून मोजले जातील.

**१७.४ 'ओव्हर'चा पुकार**

सहा वैध चेंडू टाकून झाले आणि चेंडू डेड झाला की आपली जागा सोडण्यापूर्वी गोलंदाजाकडील पंच 'ओव्हर' असा पुकार करेल. कायदा २०.३ ('ओव्हर' किंवा टाईम'चा पुकार) सुद्‌धा पाहा.

**१७.५ पंचाची मोजण्यात चूक झाली**

**१७.५.१** पंचाने वैध चेंडू मोजण्यात चूक केली तरी त्याने/तिने मोजल्याप्रमाणे षटक धरले जाईल.

**१७.५.२** जरी चेंडू मोजण्यात झालेल्या चुकीमुळे पंचानी षटकातील ६ वैध चेंडू झाल्यावरही षटक पुढे चालू ठेवले आणि टाकलेला पुढील चेंडू अवैध असला तरीही तो चेंडू डेड झाल्यानंतर पंच 'ओव्हर'चा पुकार करू शकेल.

**१७.६ गोलंदाजाने बाजू बदलणे**

गोलंदाज एका डावात कितीही वेळा बाजू बदलू शकतो मात्र त्याला/तिला एकाच डावात लागोपाठ दोन पूर्ण किंवा अपूर्ण षटके टाकता येणार नाहीत.

**१७.७ षटक पूर्ण करणे**

**१७.७.१** डावाच्या शेवटी सोडून, गोलंदाज गोलंदाजी करण्यास असमर्थ न झाल्यास किंवा त्याचे निलंबन न झाल्यास तो चालू असलेले षटक पूर्ण करेल.

**१७.७.२** डावाच्या शेवटी सोडून, कोणत्याही कारणासाठी मध्यंतराच्या किंवा व्यत्ययाच्या सुरूवातीला एखादे षटक अपूर्ण राहिले असेल तर खेळ पुन्हा सुरू झाल्यावर ते पूर्ण करण्यात येईल.

### १७.८ षटक चालू असताना गोलंदाज गोलंदाजी करण्यास असमर्थ झाला किंवा निलंबित झाला

जर एखादा गोलंदाज षटकातील पहिला चेंडू टाकण्यासाठी धावत येताना गोलंदाजी करण्यास असमर्थ ठरला/ठरली किंवा एखाद्या षटकादरम्यान, गोलंदाजी करण्यास असमर्थ ठरला/ठरली किंवा निलंबित झाला/झाली तर पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल. ते षटक त्याच बाजूने दुसरा गोलंदाज पूर्ण करेल, मात्र त्याला/तिला त्या डावात लागोपाठ दोन पूर्ण किंवा अपूर्ण षटके टाकता येणार नाहीत.

## कायदा १८ धावा काढणे

### १८.१ धाव

धावसंख्या ही धावांमध्ये मोजली जाईल. खालील बाबतीत धावा जमा होतील.

**१८.१.१** चेंडू खेळीत असताना, जितक्या वेळा फलंदाज एकमेकांना ओलांडून एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपापल्या क्रीझमध्ये जातील तितक्या वेळा.

**१८.१.२** चेंडू सीमापार गेल्यास. कायदा १९ (सीमारेषा) पाहा.

**१८.१.३** दंड धावा बहाल केल्यास. १८.६ पाहा.

### १८.२ धावा रद्द

या कायद्यात जिथे जिथे धावा मिळण्यासाठी अथवा दंड धावा बहाल करण्यासाठी तरतूद केलेली आहे ती याच कायद्यातील धावा किंवा दंड धावा नाकारण्याच्या तरतुदींच्या अधीन असेल.

जेव्हा धावा नाकारल्या जातील तेव्हा नोबॉल किंवा वाईड बॉलची एक धाव आणि, कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून, मिळणाऱ्या ५ दंड धावा दिल्या जातील.

### १८.३ तोकड्या धावा

**१८.३.१** पुढच्या धावेसाठी वळण्याआधी जर फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझमध्ये आला/आली नाही तर ती धाव तोकडी धरली जाईल.

**१८.३.२** अशा वेळी आदली धाव जरी तोकडी असली तरी नंतरची धाव पूर्ण केल्यास ती तोकडी धरली जाणार नाही. स्ट्रायकरने पहिली धाव पॉपिंग क्रीझच्या पुढून सुरू केली तर तीही धाव तोकडी धरली जाणार नाही.

## १८.४ अजाणतेपणी काढलेली तोकडी धाव

१८.५ मधील परिस्थिती सोडून,

**१८.४.१** जर कोणत्याही फलंदाजाने तोकडी धाव काढली आणि चेंडू सीमापार गेला नसेल तर, संबंधित पंच चेंडू डेड झाल्याबरोबर तोकड्या धावेचा पुकार व इशारा करेल आणि ती धाव मोजली जाणार नाही.

**१८.४.२** जर एका किंवा दोन्ही फलंदाजांनी तोकडी धाव काढल्यानंतर चेंडू सीमापार गेला तर संबंधित पंच तोकड्या धावेकडे दुर्लक्ष करेल आणि तोकड्या धावेचा पुकार किंवा इशारा करणार नाही.

**१८.४.३** जर दोन्ही फलंदाजांनी एकाच धावेत तोकडी धाव काढली तर एकच तोकडी धाव धरली जाईल.

**१८.४.४** जर एकापेक्षा जास्त तोकड्या धावा काढल्या गेल्या असतील तर, १८.४.२ व १८.४.३ सोडून, अशा सर्व धावा मोजल्या जाणार नाहीत.

**१८.४.५** जर एकापेक्षा जास्त तोकड्या धावा काढल्या गेल्या तर पंच स्कोअररला किती धावा जमा करायच्या ते कळवेल.

## १८.५ जाणूनबुजून काढलेल्या तोकड्या धावा

**१८.५.१** जर कोणत्याही पंचाच्या मते, एका किंवा दोन्ही फलंदाजांनी, त्याच्या बाजूला जाणूनबुजून तोकड्या धावा काढल्या तर संबंधित पंच चेंडू डेड झाल्यावर तोकड्या धावेचा पुकार व इशारा करेल, दुसऱ्या पंचाला त्याविषयी माहिती देईल आणि १८.५.२ नुसार कारवाई करेल.

**१८.५.२** गोलंदाजाकडील पंच

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजाला त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- लागू असल्यास, स्कोअररला नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.
- क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असल्यास, कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.
- स्कोअररला किती धावा जमा करायच्या ते कळवेल.
- क्षेत्ररक्षक संघाच्या कर्णधारास व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधारास आपल्या कृतीचे कारण कळवेल.

**१८.५.३** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती

यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

### १८.६ दंड म्हणून दिल्या जाणाऱ्या धावा

दंड धावा १८.५, आणि कायदे २१ (नोबॉल), २२ (वाईड बॉल), २४.४ (खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे), २६.४ (कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दंड), २८.२ (चेंडू अडवणे), ४१ (अनुचित खेळ) आणि ४२ (खेळाडूंचे वर्तन) अनुसार बहाल केल्या जातील.

मात्र कायदे १८.५, २३.३ (लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत), २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन), २५.७ (स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने), २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स), ३४ (चेंडू दोनदा मारला), ४१.१४ (फलंदाजाने खेळपट्टी खराब करणे) आणि ४१.१५ (स्ट्रायकर संरक्षित क्षेत्रात आला) नुसार दंड धावा बहाल करण्यावरील निर्बंधांची नोंद घ्यावी.

### १८.७ सीमापार चेंडूच्या धावा

चेंडू सीमापार गेल्यास कायदा १९ (सीमारेषा) प्रमाणे चेंडू सीमापार गेल्याबद्दलच्या धावा मिळतील.

### १८.८ फलंदाज बाद झाला तरी जमा होणाऱ्या धावा

जेव्हा एखादा फलंदाज बाद होईल तेव्हा कोणत्याही संघास दिलेल्या दंड धावा जमा होतील. मात्र खालील धावा सोडून इतर कोणत्याही धावा जमा होणार नाहीत.

**१८.८.१** जर एखादा फलंदाज क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद झाला तर फलंदाजी करणाऱ्या संघास गुन्हा घडण्याआधी पूर्ण केलेल्या धावाही मिळतील.

मात्र जर एखाद्या फलंदाजाने अडथळा आणल्यामुळे क्षेत्ररक्षक झेल घेऊ शकला नाही तर दंड धावा सोडून इतर कोणत्याही धावा जमा होणार नाहीत.

**१८.८.२** जर एखादा फलंदाज धावचीत झाला तर फलंदाजी करणाऱ्या संघास यष्टी पाडण्याआधी पूर्ण केलेल्या धावाही मिळतील.

मात्र जर, ज्याने/जिने रनर घेतला आहे असा/अशी स्ट्रायकर स्वतः कायदा २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) अनुसार धावचीत झाला/झाली तर रनर आणि दुसरा फलंदाज यांनी काढलेल्या धावा नाकारण्यात येतील.

### १८.९ गडी बाद होण्याव्यतिरिक्त चेंडू डेड होतो तेव्हा जमा होणाऱ्या धावा

जर, गडी बाद होण्याव्यतिरिक्त इतर काही कारणाने चेंडू डेड झाला किंवा पंचांनी चेंडू डेड झाला असे जाहीर केले आणि कायद्यात काही विशिष्ट तरतूद नसेल, तर दोन्ही संघास दिलेल्या दंड धावा जमा होतील. मात्र कायदे २३.३ (लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत) आणि २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) च्या तरतुदींची नोंद घ्यावी.

याशिवाय फलंदाजी करणाऱ्या संघाला पुढीलप्रमाणे धावा मिळतील.

तो प्रसंग घडण्याच्या अथवा डेड बॉलचा पुकार होण्याच्या आधी फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा,

आणि तो प्रसंग घडण्याच्या अथवा डेड बॉलचा पुकार होण्याच्या आधी फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले असेल तर ती धाव. मात्र विशेषतः कायदा ४१.५.८ (जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे) च्या तरतुदींची नोंद घ्यावी.

**१८.१० काढलेल्या धावा जमा करणे**

इतर कोणत्याही कायद्यात काही विशिष्ट तरतूद नसल्यास,

**१८.१०.१** जर चेंडू बॅटने मारला असेल तर, खालील अपवाद सोडून, फलंदाजी संघास मिळणाऱ्या सर्व धावा फलंदाजाच्या वैयक्तिक खात्यात जमा होतील.

- ५ दंड धावा, ज्या 'दंड धावा' म्हणून जमा होतील.
- नोबॉलसाठी मिळणारी एक धाव जी नोबॉल म्हणून अवांतर धावसंख्येत जमा होईल.

**१८.१०.२** जर बॅटचा चेंडूला स्पर्श झालेला नसेल तर मिळणाऱ्या धावा त्या त्या प्रसंगानुसार, दंड धावा, बाईज, लेग बाईज, नोबॉल अथवा वाईड म्हणून जमा केल्या जातील. जर नोबॉलवर बाईज किंवा लेग बाईज धावा काढल्या गेल्या तर एक धाव नोबॉल म्हणून जमा होईल व बाकीच्या धावा त्या त्या परिस्थितीनुसार बाईज किंवा लेग बाईज म्हणून जमा केल्या जातील.

**१८.१०.३** खालील धावा गोलंदाजाच्या पृथक्करणात जमा होतील.

- स्ट्रायकरने काढलेल्या सर्व धावा
- नोबॉलसाठी जमा झालेल्या सर्व अवांतर धावा
- वाईड चेंडूच्या जमा झालेल्या सर्व धावा.

**१८.११ फलंदाज आपल्या मूळ जागेवर परत येईल**

**१८.११.१** जेव्हा स्ट्रायकर १८.११.१.१ ते १८.११.१.६ मधील कोणत्याही परिस्थितीनुसार बाद होईल तेव्हा नाबाद फलंदाज त्याच्या/तिच्या मूळ जागेवर परत जाईल.

**१८.११.१.१** कायदा २५.६.४ किंवा २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) मधील परिस्थितीनुसार बाद झाला.

**१८.११.१.२** त्रिफळाचीत

**१८.११.१.३** यष्टिचीत

**१८.११.१.४** चेंडू दोनदा मारला

**१८.११.१.५** पायचीत

**१८.११.१.६** स्वयंचीत

**१८.११.२** खालील १८.११.२.१ ते १८.११.२.३ मधील प्रसंगात फलंदाज आपल्या मूळ जागेवर परत जातील.

**१८.११.२.१** चेंडू सीमापार गेला.

**१८.११.२.२** कोणत्याही कारणासाठी धावा नाकारल्या गेल्या.

**१८.११.२.३** खेळपट्टीवरील नाबाद फलंदाजांनी कायदा ४१.५ (जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे) अनुसार तसे करण्याचा निर्णय घेतला.

**१८.१२ फलंदाज त्याने/तिने सोडलेल्या जागेवर परत येईल**

**१८.१२.१** जेव्हा फलंदाज १८.१२.१.१ ते १८.१२.१.३ मधील कोणत्याही पद्धतीने बाद होईल तेव्हा, ज्या प्रसंगामुळे फलंदाज बाद झाला त्या क्षणी दोन्ही फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले नसल्यास, नाबाद फलंदाज त्याच्या/तिच्या सोडलेल्या जागेवर परत जाईल. मात्र जर धावा नाकारल्या गेल्या तर नाबाद फलंदाज आपल्या मूळ जागेवर परत जाईल.

**१८.१२.१.१** झेलबाद.

**१८.१२.१.२** क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे.

**१८.१२.१.३** धावचीत, मात्र कायदा २५.६.४ किंवा २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) सोडून.

**१८.१२.२** जर, फलंदाज धाव घेत असताना, फलंदाज बाद होण्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणामुळे चेंडू डेड झाला, तर चेंडू डेड झाला तेव्हा धाव घेताना फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले नसल्यास, ते आपल्या सोडलेल्या जागेवर परत जातील. मात्र १८.११.२.१ ते १८.११.२.३ मधील कोणतीही परिस्थिती लागू होत असल्यास फलंदाज आपल्या मूळ जागेवर परत जातील.

## कायदा १९ सीमारेषा

**१९.१ मैदानावरील सीमारेषा निर्धारित करणे**

**१९.१.१** नाणेफेकीच्या आधी दोन्ही पंच मैदानाची सीमारेषा निर्धारित करतील. ही सीमारेषा संपूर्ण सामन्यासाठी निश्चित राहील. कायदा २.३.१.४ (कर्णधारांशी सल्लामसलत) पाहा.

**१९.१.२** सीमारेषा अशा प्रकारे निर्धारित करण्यात येईल की साईट स्क्रीनचा कोणताही भाग सामन्यादरम्यान कधीही सीमारेषेच्या आत असणार नाही.

## १९.२ सीमारेषा ठरवणे आणि तिची आखणी

**१९.२.१** सीमारेषा शक्यतो सलग पांढऱ्या रेषेने आखली जाईल किंवा जमिनीवर टेकलेल्या एखाद्या वस्तूच्या आधारे निश्चित केली जाईल.

**१९.२.२** जर सीमारेषा पांढऱ्या रेषेने आखली असेल तर,

**१९.२.२.१** त्या रेषेची खेळपट्टीच्या जवळची कडा ही सीमारेषा असेल.

**१९.२.२.२** सीमारेषा सहजपणे दिसावी म्हणून ठेवण्यात आलेले झेंडे, खुंट्या किंवा फलक अशा वस्तू सीमारेषेच्या पलीकडे ठेवण्यात याव्यात. या वस्तू म्हणजे प्रत्यक्ष सीमारेषा नव्हे.

**१९.२.३** जर सीमारेषा जमिनीवर एखादी वस्तू ठेऊन निश्चित केली असेल तर त्या वस्तूच्या जमिनीवर टेकलेल्या भागाची खेळपट्टीच्या सर्वात जवळची कडा म्हणजे सीमारेषा असेल.

**१९.२.४** जेथे पांढरी रेषा नसेल किंवा एखादी वस्तू सलगपणे ठेवता आली नसेल तेथे झेंडे, खुंट्या किंवा फलक यासारख्या वस्तू सीमारेषेवरील विशिष्ट भाग दर्शवण्यासाठी वापरता येतील. खूण असलेल्या जवळच्या दोन बिंदूंमधील काल्पनिक सरळ रेषा ही सीमारेषा असेल.

**१९.२.५** जर सीमारेषा १९.२.२, १९.२.३ किंवा १९.२.४ प्रमाणे निश्चित करता आली नाही तर नाणेफेकीच्या आधी पंच ती निर्धारित करतील.

**१९.२.६** १९.२.७ प्रमाणे सोडून, पंचांनी नाणेफेकीआधी निर्धारित केले नसल्यास मैदानातील एखादा अडथळा सीमारेषा म्हणून मानला जाणार नाही. कायदा २.३.१.४ (कर्णधारांशी सल्लामसलत) पाहा.

**१९.२.७** चेंडू खेळीत असताना मैदानात आलेल्या एखाद्या व्यक्तीला किंवा प्राण्याला चेंडूचा स्पर्श झाला तर चेंडू सीमापार गेला असे मानायचे किंवा नाही ते पंच त्या त्या प्रसंगी ठरवतील. प्रत्येक निर्णय हा प्रसंगानुरूप घेतला जाईल.

## १९.३ सीमारेषा पूर्ववत करणे

जर सीमारेषा म्हणून ठेवलेली एखादी वस्तू हलली, तुटली किंवा विस्कळीत झाली तर,

**१९.३.१** ती वस्तू मुळात जेथे होती तीच सीमारेषा म्हणून मानली जाईल.

**१९.३.२** शक्य तितक्या लवकर ती वस्तू तिच्या मूळ जागी परत ठेवली जाईल. जर खेळ चालू असेल तर चेंडू डेड झाल्याबरोबर हे करण्यात यावे.

**१९.३.३** कुंपण किंवा इतर कुठल्या वस्तूचा काही भाग जर सीमारेषेच्या आत आला असेल तर शक्य तितक्या लवकर तो सीमारेषेबाहेर काढून टाकला जावा. जर खेळ चालू असेल तर चेंडू डेड झाल्याबरोबर हे करण्यात यावे.

### १९.४ चेंडू सीमारेषेपलीकडे टेकला

**१९.४.१** खेळीत असलेला चेंडू सीमारेषेपलीकडे टेकला असे मानले जाईल जर त्याचा स्पर्श

- सीमारेषेला किंवा सीमारेषा निश्चित करण्यासाठी ठेवलेल्या एखाद्या वस्तूच्या कोणत्याही भागाला झाला;
- सीमारेषेपलीकडील मैदानाला झाला;
- सीमारेषेपलीकडे जमिनीला टेकलेल्या कोणत्याही वस्तूला झाला.

**१९.४.२** खेळीत असलेला चेंडू सीमारेषेपलीकडे टेकला असे मानले जाईल जर,

- १९.५ मध्ये म्हटल्याप्रमाणे, सीमारेषेपलीकडे असलेल्या एखाद्या क्षेत्ररक्षकाने चेंडूला स्पर्श केला;
- सीमारेषेच्या आत झेल घेतल्यावर मात्र झेल घेण्याची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी, चेंडूच्या संपर्कात असताना एखाद्या क्षेत्ररक्षकाचा सीमारेषेपलीकडील मैदानाला स्पर्श झाला.

### १९.५ क्षेत्ररक्षक सीमारेषेपलीकडे टेकला

**१९.५.१** जर पुढीलपैकी कशाचाही क्षेत्ररक्षकाच्या अंगाच्या कोणत्याही भागाला स्पर्श झाला तर तो/ती क्षेत्ररक्षक सीमारेषेपलीकडे जाऊन टेकला/टेकली असे मानले जाईल.

- सीमारेषा किंवा सीमारेषा निर्धारित करण्यासाठी वापरलेल्या वस्तूचा कोणताही भाग;
- सीमारेषेच्या पलीकडील मैदान;
- सीमारेषेपलीकडील मैदानाशी संपर्क असलेली कोणतीही वस्तू;
- सीमारेषेपलीकडील मैदानाशी संपर्क असलेला दुसरा क्षेत्ररक्षक, जर पंचाच्या मते, दोन्हीपैकी कोणत्याही क्षेत्ररक्षकाचा हेतू चेंडू अडवण्यासाठी मदत करण्याचा असेल.

**१९.५.२** मैदानाशी संपर्क नसलेला क्षेत्ररक्षक सीमारेषेच्या बाहेर आहे असे मानले जाईल जर, गोलंदाजाने चेंडू टाकल्यानंतर, त्या क्षेत्ररक्षकाचा चेंडूला पहिल्यांदा स्पर्श होण्याआधीचा त्याचा मैदानावरील शेवटचा स्पर्श, पूर्णपणे सीमारेषेच्या आत नसेल.

### १९.६ सीमापार चेंडूच्या धावा

**१९.६.१** नाणेफेकीआधी पंच दोन्ही कर्णधारांबरोबर सीमापार चेंडूच्या धावा निर्धारित करतील. हे ठरवताना ते त्या मैदानावरील चालत आलेल्या प्रथांचा आधार घेतील.

**१९.६.२** १९.६.१ अनुसार काही वेगळे न ठरल्यास, षटकारासाठी ६ धावा दिल्या जातील आणि चौकारासाठी ४ धावा दिल्या जातील. १९.७ सुद्धा पाहा.

## १९.७ चेंडू सीमापार गेल्यास जमा होणाऱ्या धावा

**१९.७.१** जर फक्त बॅटने मारलेला चेंडू, सीमारेषेच्या आत टप्पा न पडता थेट सीमारेषेपलीकडे जाऊन टेकला तर ६ धावा मिळतील. त्याआधी चेंडूला क्षेत्ररक्षकाचा स्पर्श झाला असला तरीही हे लागू होईल.

**१९.७.२** चेंडू सीमारेषेच्या पलीकडे जाऊन टेकल्यास ४ धावा मिळतील, जर,

- चेंडू बॅटने मारलेला असला किंवा नसला तरीही, त्याचा सीमारेषेच्या आतील मैदानाला स्पर्श झाला असेल, किंवा
- चेंडू बॅटने मारलेला नसेल.

**१९.७.३** १९.८ चा अपवाद वगळता, चेंडू सीमापार गेल्यास फलंदाजी संघाला खालीलपैकी जास्त असलेल्या धावा मिळतील.

**१९.७.३.१** चेंडू सीमापार गेल्याबद्दलच्या धावा

**१९.७.३.२** चेंडू सीमापार गेला तेव्हा फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावांसह दोन्ही फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले असेल तर चालू असलेली धाव.

**१९.७.४** जेव्हा १९.७.३.२ मधील धावा, चेंडू सीमापार गेल्याबद्दलच्या धावांपेक्षा जास्त असतील तेव्हा १९.७.३.२ प्रमाणे धावा मिळतील व त्यानुसार कायदा १८.१२.२ (फलंदाज त्याने/तिने सोडलेल्या जागेवर परत येईल) लागू होईल.

**१९.७.५** कोणत्याही संघाला मिळणाऱ्या दंड धावांवर चेंडू सीमापार गेल्यामुळे काहीही परिणाम होणार नाही.

## १९.८ ओव्हरथ्रो किंवा क्षेत्ररक्षकाने जाणूनबुजून केलेली कृती

जर ओव्हरथ्रोमुळे किंवा एखाद्या क्षेत्ररक्षकाच्या जाणूनबुजून केलेल्या कृतीमुळे चेंडू सीमापार गेला तर पुढीलप्रमाणे धावा जमा होतील.

कोणत्याही संघाला मिळालेल्या दंड धावा

आणि चेंडू सीमापार गेल्याबद्दलच्या धावा

आणि फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावेसह, थ्रो किंवा कृती झाली त्या क्षणी फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले असल्यास चालू असलेली धाव.

कायदा १८.१२.२ (फलंदाज त्याने/तिने सोडलेल्या जागेवर परत येईल) थ्रो किंवा कृती झाली त्या क्षणापासून लागू होईल.

## कायदा २० डेड चेंडू

### २०.१ चेंडू डेड होतो

**२०.१.१** चेंडू आपोआप डेड होईल जेव्हा

**२०.१.१.१** चेंडू यष्टिरक्षक किंवा गोलंदाजाच्या हातात पूर्णपणे स्थिरावेल.

**२०.१.१.२** चेंडू सीमापार जाईल. कायदा १९.७ (चेंडू सीमापार गेल्यास जमा होणाऱ्या धावा) पाहा.

**२०.१.१.३** फलंदाज बाद होईल. ज्या प्रसंगामुळे फलंदाज बाद झाला असेल त्या प्रसंगापासून चेंडू डेड झाला असे समजण्यात येईल.

**२०.१.१.४** खेळला असला किंवा नसला तरीही, चेंडू फलंदाजाच्या बॅटच्या आणि अंगाच्या मध्ये अडकेल किंवा त्याच्या/तिच्या कपड्यामध्ये अथवा उपकरणाच्या मध्ये अडकेल.

**२०.१.१.५** खेळला असला किंवा नसला तरीही, चेंडू फलंदाजाच्या कपड्यांच्या किंवा उपकरणाच्या आत जाऊन स्थिरावेल किंवा पंचाच्या कपड्यात जाऊन स्थिरावेल.

**२०.१.१.६** जेव्हा कायदे २४.४ (खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे) किंवा २८.२ (चेंडू अडवणे) यांचे उल्लंघन केल्यामुळे दंड धावा दिल्या जातील. अशा वेळी चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

**२०.१.१.७** कायदा २८.३ (क्षेत्ररक्षक संघाची संरक्षक हेल्मेट्स) चे उल्लंघन होईल.

**२०.१.१.८** कायदा १२.९ (सामना संपला) मधील कोणत्याही प्रकारे सामना संपेल.

**२०.१.२** जेव्हा क्षेत्ररक्षण संघ आणि खेळपट्टीवरील दोन्ही फलंदाज यांनी चेंडू खेळीत नाही असे मानल्याचे गोलंदाजाकडील पंचाला वाटेल तेव्हा चेंडू डेड आहे असे समजले जाईल.

### २०.२ चेंडू पूर्णपणे स्थिरावणे

चेंडू पूर्णपणे स्थिरावला आहे किंवा नाही हे फक्त पंच ठरवेल.

### २०.३ 'ओव्हर' किंवा 'टाईम'चा पुकार

जोपर्यंत चेंडू डेड होत नाही तोपर्यंत, २०.१ किंवा २०.४ अनुसार, 'ओव्हर' (कायदा १७.४ पाहा) किंवा 'टाईम' (कायदा १२.२ पाहा) चा पुकार केला जाऊ नये.

### २०.४ पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे

**२०.४.१** जेव्हा कायदा २०.१ अनुसार चेंडू डेड होईल तेव्हा, आवश्यक असल्यास, खेळाडूंना समजावे म्हणून गोलंदाजाकडील पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

२०.४.२ कोणताही पंच खालील बाबतीत डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

२०.४.२.१ अनुचित खेळाच्या बाबतीत हस्तक्षेप करताना.

२०.४.२.२ एखाद्या खेळाडूला किंवा पंचाला गंभीर दुखापत झाली आहे असे वाटल्यास.

२०.४.२.३ सल्लामसलत करण्यासाठी त्याची/तिची नेहमीची जागा सोडताना.

२०.४.२.४ स्ट्रायकरला चेंडू खेळण्याची संधी मिळण्याआधी स्ट्रायकरच्या बाजूच्या यष्टींवरील एक किंवा दोन्ही बेल्स पडल्यास.

२०.४.२.५ स्ट्रायकर चेंडू खेळण्यासाठी तयार नसेल आणि, चेंडू टाकल्यास, त्याने खेळण्याचा प्रयत्न केला नाही. स्ट्रायकरला तो चेंडू न खेळण्यासाठी पुरेसे कारण होते अशी पंचांची खात्री पटली, तर तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

२०.४.२.६ जर चेंडू खेळताना किंवा खेळण्यासाठी तयार होताना, कोणत्याही आवाजामुळे, हालचालीमुळे किंवा इतर काही कारणामुळे स्ट्रायकरचे लक्ष विचलित झाले. त्याचा स्रोत सामन्यात किंवा बाहेर असला तरीही हे लागू होईल. २०.४.२.७ ची सुद्धा नोंद घ्यावी.

तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

२०.४.२.७ जर कायदा ४१.४ (जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे) किंवा कायदा ४१.५ (जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे) प्रमाणे जाणूनबुजून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न झाला. तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

२०.४.२.८ चेंडू टाकण्याआधी गोलंदाजाच्या हातातून निसटला.

२०.४.२.९ कायदा ४१.१६ (नॉन-स्ट्रायकरने त्याचे/तिचे क्रीझ लवकर सोडणे) अनुसार नॉन-स्ट्रायकरला धावचीत करण्यासाठी प्रयत्न करण्याचा अपवाद वगळता चेंडू गोलंदाजाच्या हातातून सुटला नाही.

२०.४.२.१० खेळीतील चेंडू हाती येत नाही याविषयी पंचांची खात्री पटली.

२०.४.२.११ वर समावेश नसलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार तसे म्हणावे लागले.

## २०.५ चेंडू डेड रहात नाही

जेव्हा गोलंदाज त्याचा/तिचा गोलंदाजीचा रन-अप किंवा रन-अप नसल्यास कृती सुरू करतो/करते तेव्हा चेंडू डेड रहात नाही - म्हणजेच तो खेळीत येतो.

### २०.६ डेड चेंडू; चेंडू षटकातील एक म्हणून मोजणे

**२०.६.१** खालील २०.६.२ प्रमाणे सोडून, जेव्हा गोलंदाजाने टाकलेला चेंडू डेड म्हणून पुकारला जाईल किंवा तो डेड मानला जाईल तेव्हा,

**२०.६.१.१** जर स्ट्रायकरला खेळण्याची संधी मिळाली नसेल तर तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

**२०.६.१.२** जर नोबॉल किंवा वाईड दिला गेला नसेल आणि स्ट्रायकरला खेळण्याची संधी मिळाली असेल तर, २०.४.२.६ आणि कायदे २४.४ (खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे), २८.२ (चेंडू अडवणे), ४१.४ (जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे) आणि ४१.५ (जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे) मधील परिस्थितीचा अपवाद वगळता, तो चेंडू एक वैध चेंडू असेल.

**२०.६.२** स्ट्रायकरने चेंडू खेळण्याचा प्रयत्न केला नाही आणि योग्य कारणास्तव तो चेंडू खेळण्यासाठी स्ट्रायकर तयार नव्हता, या दोन्ही अटी पूर्ण झाल्या तरच २०.४.२.५ प्रमाणे तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही. अन्यथा तो एक वैध चेंडू असेल.

## कायदा २१ नोबॉल

### २१.१ चेंडू टाकण्याची पद्धत

**२१.१.१** गोलंदाज उजव्या हाताने गोलंदाजी टाकणार की डाव्या हाताने, ओव्हर द विकेट टाकणार की राऊंड द विकेट, याची खात्री करून त्याप्रमाणे पंच स्ट्रायकरला सांगेल.

पंचांना न कळवता गोलंदाजाने यात बदल केला तर ते अनुचित ठरेल व पंच त्यासाठी नोबॉलचा पुकार व इशारा करेल.

**२१.१.२** जर सामन्यापूर्वी काही विशेष करार झाला नसेल तर अंडरआर्म गोलंदाजी करता येणार नाही.

### २१.२ योग्य प्रकारे टाकलेला चेंडू - हात

हाताच्या दृष्टीने चेंडू योग्य तऱ्हेने टाकण्यासाठी गोलंदाजाने चेंडू फेकता कामा नये.

चेंडू टाकताना गोलंदाजाचा हात खांद्याच्या पातळीवर आल्यानंतर, तेव्हापासून चेंडू हातातून सुटेपर्यंत हाताचे कोपर थोडे किंवा पूर्णपणे सरळ झाले नसेल तर हाताच्या दृष्टीने चेंडू योग्य प्रकारे टाकला असे मानले जाईल. मात्र या व्याख्येत मनगट वाकवून किंवा फिरवून चेंडू टाकण्यास गोलंदाजास प्रतिबंध केलेला नाही.

या संदर्भात, चेंडू योग्य प्रकारे टाकला गेला आहे किंवा नाही हे पाहण्याची प्राथमिक जबाबदारी जरी स्ट्रायकारकडील पंचाची असली तरी चेंडू फेकला आहे अशी गोलंदाजाकडील पंचाची खात्री झाल्यास त्याला या कायद्यात नोबॉलचा पुकार व इशारा करण्यास प्रतिबंध नाही.

## २१.३ चेंडू फेकला किंवा अंडरआर्म टाकला - पंचांनी करावयाची कृती

**२१.३.१** गोलंदाज त्याच्या/तिच्या चेंडू टाकण्याच्या शेवटच्या झेपेत आल्यानंतर चेंडू फेकला आहे किंवा २१.१.२ प्रमाणे करार झाला नसताना अंडरआर्म टाकला आहे असे कोणत्याही पंचाला वाटले, तर तो/ती पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल व चेंडू डेड झाल्यावर दुसऱ्या पंचाला असा पुकार करण्याचे कारण सांगेल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- गोलंदाजाला पहिली व शेवटची ताकीद देईल. ही ताकीद त्या गोलंदाजासाठी त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला आपल्या कृतीचे कारण सांगेल.
- खेळपट्टीवरील फलंदाजांना याबद्दल माहिती देईल.

**२१.३.२** जर त्या डावात त्याच गोलंदाजाने पुन्हा चेंडू फेकला आहे किंवा २१.१.२ प्रमाणे करार झाला नसताना चेंडू अंडरआर्म टाकला आहे असे कोणत्याही पंचाला वाटले तर तो/ती पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल व चेंडू डेड झाल्यावर दुसऱ्या पंचाला असा पुकार करण्याचे कारण सांगेल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधारास त्या गोलंदाजाला ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल. आवश्यक असल्यास, ते षटक, असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल ज्याने त्याआधीचे षटक किंवा त्यातील कोणताही चेंडू टाकलेला नसेल व ज्याला त्यापुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही. अशा प्रकारे निलंबित झालेला गोलंदाज त्या डावात पुन्हा गोलंदाजी करू शकणार नाही.
- खेळपट्टीवरील फलंदाजांना व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला आपल्या कृतीचे कारण सांगेल.

**२१.३.३** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## २१.४ गोलंदाजाने चेंडू टाकण्याआधी तो स्ट्रायकरकडील बाजूस फेकला

जर गोलंदाजाने शेवटच्या झेपेत प्रवेश करण्यापूर्वी चेंडू स्ट्रायकरकडील बाजूस फेकला तर कोणताही पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल. कायदा ४१.१७ (फलंदाजांनी धाव चोरणे) पाहा.

तथापि, २१.३ प्रमाणे पहिली आणि शेवटची ताकीद, माहिती देणे, गोलंदाजाविरुद्ध कारवाई आणि अहवाल सादर करणे ही प्रक्रिया लागू होणार नाही.

## २१.५ योग्य प्रकारे टाकलेला चेंडू - पाय

पायांच्या स्थितीच्या बाबतीत योग्य चेंडू ठरवण्यासाठी, चेंडू टाकण्याच्या शेवटच्या झेपेत

**२१.५.१** गोलंदाजांचा मागचा पाय, त्याच्या/तिच्या गोलंदाजीच्या बाजू अनुसार, रिटर्न क्रीझच्या आत व त्याला स्पर्श न होता पडला पाहिजे.

**२१.५.२** गोलंदाजाचा पुढचा पाय अशा प्रकारे खाली टेकला पाहिजे की त्याच्या पुढच्या पायाचा काही भाग, जमिनीवर टेकलेला असला किंवा नसला तरीही,

- २१.५.१ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, दोन्ही बाजूच्या मधल्या यष्टींना जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या ज्या बाजूला ते रिटर्न क्रीझ आहे त्याच बाजूला पडलेला असेल आणि
- पॉपिंग क्रीझच्या मागे पडलेला असेल.

जर या तीनही अटी पूर्ण झाल्या आहेत याविषयी गोलंदाजाकडील पंच समाधानी नसेल तर तो/ती नोबॉलचा पुकार व इशारा करेल. कायदा ४१.८ (जाणूनबुजून पुढच्या पायाने नोबॉल टाकणे) पाहा.

## २१.६ चेंडू टाकताना गोलंदाजामुळे यष्टी पडणे

गोलंदाजाने चेंडू टाकला आणि कायदा ४१.१६ (नॉन-स्ट्रायकरने त्याचे/तिचे क्रीझ लवकर सोडणे) अनुसार नॉन-स्ट्रायकर बाद झाला नसेल, तर चेंडू खेळीत आल्यापासून गोलंदाजाच्या शेवटच्या झेपेनंतर त्याचा मागचा पाय पुन्हा पुढे जमिनीवर टेकेपर्यंत केव्हाही गोलंदाजाने यष्टी पाडली तर कोणताही पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल. गोलंदाजाचा पोशाख किंवा त्याच्या अंगावरून पडलेल्या एखाद्या वस्तूमुळे यष्टी पडल्यास त्याचाही यात समावेश असेल. परिशिष्ट अ.१२ पाहा. कायदे २०.४.२.८, २०.४.२.९ (पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे) आणि २१.१२ लागू होतील.

## २१.७ चेंडूचा टप्पा एकापेक्षा जास्त वेळा पडणे, चेंडू घरंगळत जाणे किंवा चेंडूचा टप्पा खेळपट्टीच्या बाहेर पडणे

पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल जर, पंचाच्या मते गोलंदाजाने टाकलेला चेंडू स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श होण्यापूर्वी,

- आणि, पॉपिंग क्रीझपर्यंत पोहोचण्यापूर्वी, घरंगळत गेला अथवा त्या चेंडूचे एकापेक्षा जास्त टप्पे पडले
  किंवा

- कायदा ६.१ (खेळपट्टीचे क्षेत्र) मध्ये सांगितल्याप्रमाणे, स्ट्रायकरच्या यष्टींपर्यंत पोहोचण्यापूर्वी, त्याचा टप्पा पूर्णपणे किंवा अंशतः खेळपट्टीच्या बाहेर पडला. कृत्रिम खेळपट्टीचा वापर होत असल्यास चेंडूचा टप्पा कृत्रिम पृष्ठभागाच्या पूर्णपणे किंवा अंशतः बाहेर पडल्यासही हे लागू होईल.

### २१.८ चेंडू स्ट्रायकरच्या यष्टींच्या समोर येऊन थांबणे

जर गोलंदाजाने टाकलेला चेंडू स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श करण्याआधी स्ट्रायकरच्या यष्टींच्या रेषेसमोर येऊन थांबला तर पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल व लगेचच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

### २१.९ गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूचा क्षेत्ररक्षकाला स्पर्श होणे

कायदा २७.३ (यष्टिरक्षकाची जागा) सोडून, गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श होण्यापूर्वी किंवा स्ट्रायकरकडील यष्टी पार करण्यापूर्वी, एखाद्या क्षेत्ररक्षकाच्या अंगाच्या कोणत्याही भागाला स्पर्श झाला तर पंच नोबॉलचा पुकार आणि इशारा करेल आणि लगेचच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

### २१.१० चेंडू टप्पा पडून स्ट्रायकरच्या डोक्याच्या वरून जाणे

स्ट्रायकर क्रीझमध्ये सरळ उभा असताना, गोलंदाजाने टाकलेला कोणताही चेंडू, टप्पा पडल्यावर, स्ट्रायकरच्या डोक्याच्या वरून गेला किंवा तो तसा जाण्याची शक्यता असेल तर पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल.

### २१.११ इतर कायद्यांच्या उल्लंघनासाठी नोबॉल

वरील प्रसंगांशिवाय, खालील कायद्यानुसार आवश्यक असेल तेव्हा नोबॉलचा पुकार व इशारा केला जाईल.

कायदा २७.३ - यष्टिरक्षकाची जागा

कायदा २८.४ - ऑन साईडच्या क्षेत्ररक्षकांवरील मर्यादा

कायदा २८.५ - क्षेत्ररक्षकांनी खेळपट्टीवर अतिक्रमण न करणे

कायदा ४१.६ - आखूड टप्प्याचे धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे

कायदा ४१.७ - टप्पा न पाडता धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे

कायदा ४१.८ - जाणूनबुजून पुढच्या पायाने नोबॉल टाकणे

### २१.१२ नोबॉल रद्द करणे

कायदा २०.४.२.४, २०.४.२.५, २०.४.२.६, २०.४.२.८ किंवा २०.४.२.९ (पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे) अनुसार जर डेड चेंडू दिला गेला असेल तर पंच नोबॉलचा इशारा रद्द करेल.

### २१.१३ वाईडच्या आधी नोबॉल

नोबॉल आणि वाईड एकाच वेळी दिला गेल्यास तो चेंडू नोबॉल धरला जाईल. कायदा २२.१ (चेंडू वाईड ठरवणे) आणि २२.२ (वाईड चेंडूचा पुकार व इशारा करणे) पाहा.

### २१.१४ चेंडू डेड होणार नाही

नोबॉलचा पुकार झाल्यास चेंडू डेड होणार नाही.

### २१.१५ नोबॉलसाठी दंड

नोबॉलचा पुकार झाल्यावर लगेचच एक दंड धाव दिली जाईल. नोबॉलचा निर्णय रद्द न केल्यास, फलंदाज बाद झाला असला तरीही नोबॉलची एक दंड धाव मिळेल. ही धाव, इतर काढलेल्या धावा, चेंडू सीमापार गेल्यामुळे मिळणाऱ्या धावा आणि दिल्या गेलेल्या इतर दंड धावा, यांच्या व्यतिरिक्त असेल.

### २१.१६ नोबॉलवर काढलेल्या धावा - कशा जमा होतील

नोबॉलची एक धाव अवांतर म्हणून जमा होईल आणि ती गोलंदाजांच्या पृथक्करणात धरली जाईल. कोणत्याही संघाला इतर काही दंड धावा दिल्या गेल्यास त्या कायदा ४१.१८ (दंड धावा) प्रमाणे जमा होतील. फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा किंवा चेंडू सीमापार गेल्यामुळे मिळालेल्या धावा चेंडू बॅटने मारला असल्यास फलंदाजाच्या खात्यात जमा होतील; नाहीतर त्या धावा बाईज अथवा लेग बाईज म्हणून जमा होतील.

### २१.१७ नोबॉल न मोजणे

नोबॉल षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही. कायदा १७.३ (चेंडूंची वैधता) पाहा.

### २१.१८ नोबॉलवर बाद

नोबॉल दिला गेल्यास कोणताही फलंदाज कायदे ३४ (चेंडू दोनदा मारला), ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे) आणि ३८ (धावचीत) शिवाय इतर कोणत्याही कायद्यानुसार बाद होणार नाही.

## कायदा २२ वाईड चेंडू

### २२.१ चेंडू वाईड ठरवणे

**२२.१.१** गोलंदाजाने टाकलेला व नोबॉल नसलेला चेंडू, २२.१.२ मधील व्याख्येप्रमाणे, स्ट्रायकर उभा असलेल्या जागेपासून लांबून गेला आणि तो चेंडू त्याच्या/तिच्या नेहमीच्या उभे राहण्याच्या जागेपासूनही लांबून गेला असता असे पंचाला वाटले तर असा चेंडू पंच वाईड ठरवेल.

**२२.१.२** जर चेंडू, बॅटने क्रिकेटचा नेहमीचा फटका मारण्यासाठी स्ट्रायकरच्या आवाक्यात नसेल तर असा चेंडू स्ट्रायकरपासून लांबून गेला असे मानले जाईल.

## २२.२ वाईड चेंडूचा पुकार व इशारा

जर पंचानी एखादा चेंडू वाईड ठरवला तर, चेंडू स्ट्रायकरच्या यष्टींच्या पलीकडे गेल्यावर लवकरात लवकर पंच वाईडचा पुकार व इशारा करेल. मात्र असा चेंडू जरी स्ट्रायकरच्या यष्टींपलीकडे गेल्याशिवाय वाईड देता येत नसला तरी तो चेंडू गोलंदाजाने त्याच्या/तिच्या शेवटच्या झेपेत प्रवेश केल्यापासून वाईड आहे असे मानले जाईल.

## २२.३ वाईड चेंडूचा निर्णय मागे घेणे

**२२.३.१** चेंडू वाईड म्हणून घोषित केल्यानंतर जर कोणत्याही क्षेत्ररक्षकाला स्पर्श होण्याआधी चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श झाला तर पंच वाईड चेंडूचा निर्णय मागे घेतील.

**२२.३.२** तो चेंडू नोबॉल दिला गेल्यास पंच वाईड चेंडूचा निर्णय मागे घेतील. कायदा २१.१३ (वाईडच्या आधी नोबॉल) पाहा.

## २२.४ चेंडू वाईड नाही

**२२.४.१** पंच चेंडू वाईड असल्याचा निर्णय देणार नाही जर स्ट्रायकरने केलेल्या हालचालीमुळे,

चेंडू, कायदा २२.१.२ मधील व्याख्येनुसार, त्याच्या/तिच्या आवाक्याबाहेर गेला

किंवा क्रिकेटचा नेहमीचा फटका खेळण्यासाठी चेंडू त्याच्या/तिच्या आवाक्यात आला.

**२२.४.२** स्ट्रायकरच्या मागे गेल्यानंतर चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श झाला तर पंच चेंडू वाईड असल्याचा निर्णय देणार नाही.

## २२.५ चेंडू डेड नाही

चेंडू वाईड दिला गेल्यास तो चेंडू डेड होत नाही.

## २२.६ वाईड चेंडूबद्दल दंड

वाईड चेंडूचा पुकार झाल्याबरोबर एक दंड धाव बहाल केली जाईल. वाईड चेंडूचा निर्णय मागे न घेतला गेल्यास, २२.३ पाहा, जरी फलंदाज बाद झाला तरीही दंड धाव कायम राहील. ही धाव, फलंदाजांनी काढलेल्या धावा, चौकारासाठीच्या धावा आणि दिल्या गेलेल्या इतर दंड धावा यांच्या व्यतिरिक्त असेल.

## २२.७ वाईड चेंडूवरील धावा - कशा जमा होतील

वाईड चेंडूच्या धावेसह, फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा किंवा चौकारासाठीच्या धावा, वाईड म्हणून जमा होतील. ५ दंड धावा सोडून वाईड चेंडूवरील सर्व धावा गोलंदाजाच्या पृथक्करणात जमा होतील.

**२२.८ वाईड न मोजणे**

वाईड चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही. कायदा १७.३ (चेंडूंची वैधता) पाहा.

**२२.९ वाईड चेंडूवर बाद**

वाईड चेंडूवर कोणताही फलंदाज कायदे ३५ (स्वयंचीत), ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे), ३८ (धावचीत) किंवा ३९ (यष्टिचीत) याशिवाय इतर कोणत्याही कायद्यानुसार बाद होणार नाही.

## कायदा २३ बाय व लेग बाय

**२३.१ बाईज**

गोलंदाजाने टाकलेला व वाईड नसलेला चेंडू, स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श न करता त्याच्या/तिच्या मागे गेला तर फलंदाजांनी त्या चेंडूवर पूर्ण केलेल्या धावा किंवा चौकाराच्या धावा फलंदाजी संघाला बाईज म्हणून मिळतील. याशिवाय जर तो चेंडू नोबॉल असेल तर नोबॉलची एक धावही मिळेल.

**२३.२ लेग बाईज**

**२३.२.१** गोलंदाजाने टाकलेला चेंडू प्रथम स्ट्रायकरच्या अंगाला लागला आणि जर स्ट्रायकरने,

बॅटने चेंडू खेळण्याचा प्रयत्न केला आहे

किंवा इजा होऊ नये म्हणून चेंडू टाळण्याचा प्रयत्न केला आहे

असे पंचाला वाटले तरच त्या चेंडूवरील धावा जमा होतील.

**२३.२.२** दोन्हीपैकी कोणतीही एक अट पूर्ण झाली आहे अशी पंचाची खात्री झाली तर धावा पुढीलप्रमाणे जमा केल्या जातील.

**२३.२.२.१** जर,

त्यानंतर चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला स्पर्श झाला नाही,

किंवा चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला केवळ अनवधानाने स्पर्श झाला

तर, चेंडूचा त्यानंतर स्ट्रायकरच्या बॅटला स्पर्श झाल्यास, फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा किंवा सीमापारच्या धावा स्ट्रायकरच्या खात्यात जमा होतील, अन्यथा कायदा २३.२.३ प्रमाणे फलंदाजी संघाच्या धावसंख्येत जमा होतील.

**२३.२.२.२** जर स्ट्रायकरने जाणूनबुजून पण कायद्यानुसार चेंडू दुसऱ्यांदा मारला तर, कायदे ३४.३ (कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला) आणि ३४.४

(कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारल्यास मिळणाऱ्या धावा) लागू होतील.

**२३.२.३** २३.२.२.१ मधील धावा, स्ट्रायकरच्या खात्यात जमा झाल्या नाहीत तर, लेग बाईज म्हणून जमा होतील.

याशिवाय, चेंडू जर नोबॉल असेल तर, नोबॉलची एक दंड धावही मिळेल.

**२३.३ लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत**

जर २३.२.१ मधील परिस्थितीत, दोन्हीपैकी एकही अट पूर्ण झाली नाही असे पंचाने ठरवले, तर लेग बाईजच्या धावा बहाल केल्या जाणार नाहीत.

जर इतर कोणत्याही कारणामुळे चेंडू डेड झाला नाही तर, चेंडू सीमापार गेल्यावर किंवा फलंदाजांनी एक धाव पूर्ण केल्यावर लगेचच पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

त्यानंतर पंच,

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल;
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल;
- नोबॉल असल्यास स्कोअररला तसा इशारा करेल;
- कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून, लागू असलेल्या कोणत्याही ५ दंड धावा बहाल करेल.

## कायदा २४ क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती; बदली खेळाडू

**२४.१ बदली क्षेत्ररक्षक**

**२४.१.१** पंच बदली क्षेत्ररक्षकासाठी परवानगी देतील

**२४.१.१.१** जर सामन्यादरम्यान एखाद्या खेळाडूला दुखापत झाली आहे किंवा तो आजारी पडला आहे याबाबत पंच समाधानी असतील, किंवा

**२४.१.१.२** इतर काही पूर्णपणे स्वीकारार्ह कारण असेल.

इतर कोणत्याही परिस्थितीत बदली क्षेत्ररक्षक दिला जाणार नाही.

**२४.१.२** बदली क्षेत्ररक्षकाला गोलंदाजी करता येणार नाही अथवा कर्णधारपद भूषवता येणार नाही मात्र पंचांनी संमती दिल्यास तो यष्टिरक्षकाची जबाबदारी पार पडू शकेल. तथापि, कायदा ४२.७.१ (स्तर ३ आणि स्तर ४ गुन्हयांसंदर्भातील आणखी काही मुद्दे) ची नोंद घ्यावी.

**२४.१.३** संघातील एखाद्या खेळाडूसाठी बदली खेळाडूने क्षेत्ररक्षण केलेले असले तरीही तो/ती खेळाडू गोलंदाजी किंवा क्षेत्ररक्षण करू शकेल, मात्र कायदे २४.२, २४.३ आणि कायदा

४२.४ (तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती) च्या तरतुदी लागू राहतील.

**२४.२ क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती किंवा त्याने मैदान सोडणे**

**२४.२.१** एखादा खेळाडू क्षेत्ररक्षक म्हणून काही जबाबदारी पार पाडण्यासाठी अतिशय थोड्या कालावधीसाठी मैदानाबाहेर गेला तर तो/ती अनुपस्थित आहे असे मानले जाणार नाही किंवा या कायद्यापुरते, त्याने/तिने मैदान सोडले असेही मानले जाणार नाही.

**२४.२.२** एखादा खेळाडू सामना सुरू होण्याच्या वेळी किंवा त्यानंतर कधीही, मैदानावर आला नाही किंवा खेळ चालू असताना मैदान सोडून गेला तर,

**२४.२.२.१** कोणत्याही पंचाला त्याच्या अनुपस्थितीबद्दल कारणासहित कळवले जाईल.

**२४.२.२.२** त्यानंतर खेळाच्या कोणत्याही सत्रात तो/ती पंचांच्या संमतीशिवाय मैदानावर येऊ शकणार नाही. २४.४ पाहा. पंच शक्य तितक्या लवकर तशी संमती देईल.

**२४.२.२.३** २४.२.३ ते २४.२.७ आणि २४.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, 'दंडाच्या कालावधी' एवढा वेळ मैदानावर उपस्थित राहिल्याशिवाय त्याला/तिला गोलंदाजी करता येणार नाही.

**२४.२.३** एका खेळाडूचा शिल्लक राहिलेला दंडाचा कालावधी जास्तीत जास्त ९० मिनिटांपर्यंत मर्यादित असेल.

**२४.२.४** एखाद्या खेळाडूने त्याचा/तिचा दंडाचा कालावधी पूर्ण होण्याआधी मैदान सोडले तर उर्वरित कालावधी हा शिल्लक राहिलेला दंडाचा कालावधी म्हणून पुढे ढकलला जाईल.

**२४.२.५** एखाद्या खेळाडूला त्याचा/तिचा दंडाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत मैदानावर उपस्थित राहिल्याशिवाय गोलंदाजी करता येणार नाही. खेळ चालू असताना तो/ती कधीही अनुपस्थित असेल तर असा अनुपस्थितीचा कालावधी, कायदा २४.२.३ च्या तरतुदींच्या अधीन राहून, त्याच्या शिल्लक राहिलेल्या दंडाच्या कालावधीत जोडला जाईल.

**२४.२.६** खेळात कधीही व्यत्यय आला तर व्यत्ययाचा कालावधी खेळाडूच्या उपस्थितीत मोजला जाईल जर,

**२४.२.६.१** व्यत्ययाच्या सुरूवातीला मैदानावर उपस्थित असणारा क्षेत्ररक्षक, खेळ पुन्हा सुरू होण्याच्या वेळी मैदानावर आला किंवा त्याच्या/तिच्या संघाची आता फलंदाजी असेल.

**२४.२.६.२** व्यत्ययाच्या वेळी मैदानावर अनुपस्थित असलेल्या खेळाडूने व्यत्ययाच्या काळात स्वतः येऊन एखाद्या पंचाला आपण खेळात भाग घेऊ शकत असल्याचे कळवले आणि खेळ पुन्हा सुरू झाल्यावर मैदानावर आला किंवा

त्याच्या/तिच्या संघाची आता फलंदाजी असेल. पंचांना तसे कळवण्याआधीचा कालावधी अनुपस्थितीच्या कालावधीत मोजला जाणार नाही.

**२४.२.७** शिल्लक राहिलेला दंडाचा कालावधी, जसे लागू असेल त्याप्रमाणे, सामन्याच्या पुढील दिवशी आणि पुढील डावात ढकलला जाईल.

**२४.२.८** जर कायदा ४२.४ (तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती) च्या अंतर्गत एखाद्या क्षेत्ररक्षकाने तिसऱ्या स्तराचा गुन्हा केला तर निलंबनाचा कालावधी संपवून तो/ती लगेच परत मैदानावर आल्यास, तो निलंबनाचा कालावधी शिल्लक राहिलेल्या दंडाच्या कालावधीत जोडला जाणार नाही.

**२४.२.९** जर कायदा ४२.४ (तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती) च्या अंतर्गत एखाद्या बदली खेळाडूने तिसऱ्या स्तराचा गुन्हा केला तर खालील गोष्टी लागू होतील.

**२४.२.९.१** संघातील खेळाडू निलंबनाचा कालावधी संपवून लगेच परत मैदानावर आल्यास, तो निलंबनाचा कालावधी शिल्लक राहिलेल्या दंडाच्या कालावधीत जोडला जाणार नाही. मात्र निलंबनाआधीचा मैदानाबाहेरचा कालावधी, कायदा २४.२.३ च्या तरतुदींच्या अधीन राहून, शिल्लक राहिलेला दंडाचा कालावधी म्हणून तसाच राहील.

**२४.२.९.२** जर संघातील खेळाडू निलंबनाचा कालावधी संपल्याबरोबर मैदानावर आला नाही तर त्याच्या/तिच्या अनुपस्थितीचा संपूर्ण कालावधी, जास्तीत जास्त ९० मिनिटांपर्यंत, दंडाचा कालावधी म्हणून धरण्यात येईल.

## २४.३ दंडाच्या कालावधीला अपवाद

एखाद्या खेळाडूची अनुपस्थिती दंडाच्या कालावधीत मोजली जाणार नाही जर,

**२४.३.१** त्याला/तिला सामन्यादरम्यान बाह्य आघातामुळे दुखापत झाली असेल आणि त्यामुळे योग्य कारणासाठी त्याने/तिने मैदान सोडले असेल किंवा मैदानावर येऊ शकला/शकली नसेल.

**२४.३.२** पंचांच्या मते एखादा खेळाडू आजारपण किंवा अंतर्गत दुखापत सोडून इतर काही पूर्णपणे स्वीकारार्ह कारणांसाठी अनुपस्थित असेल किंवा त्याने/तिने मैदान सोडले असेल.

## २४.४ खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे

जर २४.२.२ चे उल्लंघन करून एखादा खेळाडू मैदानावर आला आणि चेंडू खेळीत असताना त्याचा चेंडूला स्पर्श झाला तर तो चेंडू ताबडतोब डेड होईल.

- पंच फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल.

- फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावांसह, गुन्हा घडण्याच्या आधी त्यांनी एकमेकांना ओलांडले असल्यास, चालू असलेली धाव मिळेल.
- चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.
- पंच, दुसऱ्या पंचाला, क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला, फलंदाजांना आणि शक्य तेवढ्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला आपल्या कृतीचे कारण सांगेल.
- सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## कायदा २५ फलंदाजाचा डाव; रनर

### २५.१ फलंदाज किंवा रनर होण्यासाठी पात्रता

केवळ नामांकन झालेला खेळाडूच फलंदाजी करू शकेल किंवा रनर राहू शकेल आणि, कायदा २५.३ आणि २५.५.२ च्या तरतुदींच्या अधीन राहून, पूर्वी त्याच्यासाठी/तिच्यासाठी एखादा बदली खेळाडू घेतला गेला असला तरीही तो/ती हे करू शकेल.

### २५.२ फलंदाजाच्या डावाची सुरुवात

पहिल्या दोन फलंदाजांचा डाव आणि 'टाईम'चा पुकार केल्यानंतर खेळ पुन्हा सुरू होताना येणाऱ्या नवीन फलंदाजाचा डाव 'प्ले'चा पुकार झाल्यावर सुरू होईल. इतर कोणत्याही वेळी फलंदाजाचा डाव त्याने मैदानात पहिले पाऊल टाकल्यावर सुरू झाला असे मानण्यात येईल.

### २५.३ फलंदाजाने डाव सुरू करण्यावरील बंधने

**२५.३.१** जर फलंदाजी संघातील एखाद्या खेळाडूचा दंडाचा कालावधी शिल्लक असेल, कायदा २४.२.७ (क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती किंवा त्याने मैदान सोडणे) पाहा, तर त्या खेळाडूला दंडाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत फलंदाजी करण्यास किंवा रनर राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही. मात्र, जरी दंडाचा कालावधी पूर्ण झाला नसला, तरी त्याच्या/तिच्या संघाचे ५ गडी बाद झाल्यावर सदर खेळाडू फलंदाजी करू शकेल.

**२५.३.२** फलंदाजी संघाच्या खेळाडूचा दंडाचा कालावधी खेळ चालू असताना तेवढ्या वेळाने कमी करण्यात येईल. मात्र २५.३.२.१ आणि २५.३.२.२ च्या तरतुदी लागू राहतील.

**२५.३.२.१** कायदा ४२.४ (तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती) च्या अंतर्गत तिसऱ्या स्तराच्या गुन्ह्यासाठी झालेल्या निलंबनाचा काळ शिल्लक राहिलेल्या दंडाचा कालावधी कमी करण्यासाठी मोजला जाणार नाही.

**२५.३.२.२** सामन्यात व्यत्यय आले असताना एखाद्या फलंदाजाने स्वतः येऊन पंचांना आपण तंदुरुस्त असल्याचे सांगितल्यानंतरचा कालावधी शिल्लक राहिलेल्या दंडाचा कालावधी कमी करण्यासाठी मोजला जाईल.

**२५.३.३** जर एखाद्या संघाचा डाव संपल्यावर दंडाचा कालावधी शिल्लक राहिला असेल तर, लागू असल्यास, तो कालावधी सामन्याच्या पुढील डावांमध्ये ढकलण्यात येईल.

## २५.४ फलंदाज निवृत्त होणे

**२५.४.१** फलंदाज त्याचा/तिचा डाव चालू असताना, चेंडू डेड झाल्यावर, कधीही निवृत्त होऊ शकेल. खेळ पुढे चालू करण्याआधी पंचांना फलंदाजाच्या निवृत्तीचे कारण सांगितले जाईल.

**२५.४.२** जर एखादा फलंदाज आजारपण, दुखापत किंवा एखाद्या अपरिहार्य कारणामुळे निवृत्त झाला तर तो/ती फलंदाज आपला डाव पुन्हा सुरू करू शकेल. जर कोणत्याही कारणामुळे तो आपला डाव पुन्हा सुरू करू शकला नाही तर त्याच्या डावाची नोंद 'निवृत्त - नाबाद' अशी केली जाईल.

**२५.४.३** जर एखादा फलंदाज वरील २५.४.२ मधील कारणांव्यतिरिक्त इतर काही कारणांमुळे निवृत्त झाला तर तो आपला डाव केवळ विरुद्ध संघाच्या कर्णधाराने संमती दिल्यास पुन्हा सुरू करू शकेल. जर कोणत्याही कारणामुळे तो आपला डाव पुन्हा सुरू करू शकला नाही तर त्याच्या डावाची नोंद 'निवृत्त - बाद' अशी केली जाईल.

**२५.४.४** जर निवृत्त फलंदाजाने त्याचा/तिचा डाव पुन्हा केला, तर, २५.४.२ आणि २५.४.३ च्या तरतुदींच्या अधीन राहून, दुसरा एखादा फलंदाज बाद किंवा निवृत्त झाल्यानंतरच तो तसे करू शकेल.

## २५.५ रनर

**२५.५.१** जर पंच पुढील गोष्टींविषयी समाधानी असले तर ते फलंदाजाला रनर घेण्याची परवानगी देतील.

**२५.५.१.१** फलंदाजाला अशी दुखापत झाली आहे की ज्यामुळे त्याच्या/तिच्या धावण्याच्या क्षमतेवर परिणाम होत आहे.

**२५.५.१.२** अशी दुखापत सामन्यादरम्यान झालेली आहे.

दुसऱ्या कोणत्याही परिस्थितीत फलंदाजाला रनर दिला जाणार नाही.

**२५.५.२** रनर हा

**२५.५.२.१** फलंदाजी संघाचा सदस्य असेल.

**२५.५.२.२** शक्यतो ज्याची/जिची त्या डावातील फलंदाजी झालेली आहे असा असेल, हे शक्य नसल्यास, जेव्हा बाद झालेला एखादा फलंदाज रनर होण्यासाठी उपलब्ध होईल, तेव्हा लगेचच रनर बदलला जाईल.

**२५.५.२.३** पंचांच्या संमतीनेच बदलता येईल.

**२५.५.२.४** ज्या फलंदाजासाठी असेल त्या फलंदाजाने घातलेली सर्व बाह्य संरक्षक उपकरणे तो/ती घालेल आणि हातात बॅट घेईल.

**२५.५.२.५** ज्याचा कायदा २४.२.७ (क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती किंवा त्याने मैदान सोडणे) मध्ये म्हटल्याप्रमाणे दंडाचा कालावधी शिल्लक राहिलेला नाही, असा असेल.

**२५.५.३** फलंदाजाच्या रनरला सर्व कायदे लागू राहतील आणि ज्या ठिकाणी रनरसाठी वेगळे नियम आहेत तेथे सोडून बाकी सर्व ठिकाणी तो/ती फलंदाज म्हणूनच धरला/धरली जाईल. कायदा ३०.२ (फलंदाजाचे क्रीझ कोणते) पाहा.

**२५.६ फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन**

**२५.६.१** रनर घेतलेल्या फलंदाजाला, रनरने केलेल्या नियमाच्या उल्लंघनाबद्दल, जणू काही तो/ती फलंदाज स्वतःच त्यासाठी जबाबदार आहे असे समजून, शिक्षा भोगावी लागेल. विशेषतः जर रनर कायदे ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे) किंवा ३८ (धावचीत) अनुसार बाद झाला तर तो/ती फलंदाज बाद होईल.

**२५.६.२** जेव्हा रनर असलेला फलंदाज स्ट्रायकर असेल तेव्हा सर्व कायदे आणि ते मोडल्यामुळे मिळणाऱ्या शिक्षा त्यास लागू राहतील. मात्र धावचीत आणि यष्टीचीत होण्याच्या बाबतीत मात्र रनर असलेला स्ट्रायकर म्हणून त्याला २५.६.३, २५.६.४ आणि २५.६.५ मधील विशेष तरतुदी लागू होतील.

**२५.६.३** जेव्हा रनर असलेला फलंदाज स्ट्रायकर असेल तेव्हा त्याचे क्रीझ नेहमीच यष्टिरक्षकाच्या बाजूचे असेल.

**२५.६.४** जर रनर असलेला स्ट्रायकर त्याच्या/तिच्या क्रीझमध्ये असेल, आणि जेव्हा त्या बाजूच्या यष्टी योग्य प्रकारे पाडल्या तेव्हा रनर त्याच्या/तिच्या यष्टिरक्षकाच्या बाजूच्या क्रीझच्या बाहेर असेल, तर कायदा ३८ (धावचीत) च्या तरतुदी लागू होतील.

**२५.६.५** जर रनर असलेला स्ट्रायकर त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असेल आणि यष्टिरक्षकाच्या बाजूच्या यष्टी योग्य प्रकारे पाडल्या गेल्या असतील तर स्ट्रायकर कायदा ३८ (धावचीत) किंवा कायदा ३९ (यष्टीचीत) अनुसार बाद होऊ शकेल. त्यावेळी जर रनर सुद्धा त्याच्या यष्टिरक्षकाच्या बाजूच्या क्रीझच्या बाहेर असेल तर फक्त कायदा ३८ (धावचीत) लागू होईल.

**२५.६.६** जर रनर असलेला स्ट्रायकर २५.६.५ प्रमाणे बाद झाला तर पंच

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- लागू असलेल्या कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.

**२५.६.७** जेव्हा रनर असलेला फलंदाज स्ट्रायकर नसेल तेव्हा तो/ती

**२५.६.७.१** कायदा ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे) च्या अधीन असेल मात्र या व्यतिरिक्त सामन्याच्या बाहेर असेल.

**२५.६.७.२** स्ट्रायकरकडील पंच सांगेल त्याप्रमाणे खेळात अडथळा येणार नाही अशा ठिकाणी उभा/उभी राहील.

**२५.६.७.३** मात्र २५.६.७.१ प्रमाणे सामन्याच्या बाहेर असूनही त्याने/तिने एखादी अनुचित कृती केली तर तो/ती कायद्यांतील तरतुदीनुसार दंडास पात्र ठरेल.

**२५.७ स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने**

**२५.७.१** स्ट्रायकर असलेल्या जखमी फलंदाजाच्या रनरची बॅट किंवा अंगाचा काही भाग, चेंडू खेळीत आल्यापासून तो स्ट्रायकरपर्यंत पोहोचेपर्यंत अथवा पॉपिंग क्रीझ पार करेपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंत, पॉपिंग क्रीझच्या मागे टेकलेला असायला हवा.

**२५.७.२** जर जखमी स्ट्रायकरच्या रनरने हे बंधन पाळलेले नाही असे स्ट्रायकरच्या बाजूच्या पंचाला वाटले तर, इतर कोणत्याही कारणाने चेंडू डेड झाला नसल्यास, चेंडू सीमापार गेल्यावर अथवा एक धाव पूर्ण झाल्यावर लगेचच, तो डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल. तथापि, झेल पूर्ण करण्याची संधी मिळावी म्हणून तो डेड चेंडूचा पुकार थोडा उशिराने करेल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे असलेल्या दंड धावा सोडून लागू असलेल्या इतर ५ दंड धावा बहाल करेल.

## कायदा २६ मैदानावरील सराव

### २६.१ खेळपट्टी किंवा उर्वरित चौकोनावरील सराव

**२६.१.१** सामन्याच्या कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी खेळपट्टीवर सराव करता येणार नाही.

**२६.१.२** पंचांच्या परवानगीशिवाय उर्वरित चौकोनावर सामन्याच्या कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी सराव करता येणार नाही.

## २६.२ बाहेरील मैदानावर सराव

**२६.२.१** सामन्याच्या कोणत्याही दिवशी बाहेरील मैदानाची फारशी खराबी होणार नाही अशी पंचांची खात्री झाली तर

- खेळ सुरू होण्याआधी,
- खेळ संपल्यावर आणि
- जेवणाच्या आणि चहापानाच्या मध्यंतरात किंवा दोन डावांच्या मध्ये,

बाहेरील मैदानावर कोणत्याही प्रकारचा सराव करता येईल.

**२६.२.२** पुढील सर्व अटींची पूर्तता झाल्यास 'प्ले' म्हटल्यापासून 'टाईम' म्हणेपर्यंतच्या काळात बाहेरील मैदानावर सराव करता येईल:

- फक्त परिशिष्ट अ.७ मधील क्षेत्ररक्षकाच्या व्याख्येत बसणारे क्षेत्ररक्षकच अशा सरावात भाग घेऊ शकतील.
- अशा सरावात सामन्याचा चेंडू सोडून इतर कोणत्याही चेंडूचा उपयोग करता येणार नाही.
- सामन्याच्या खेळपट्टीला समांतर, चौकोनापासून सीमारेषेपर्यंतच्या भागात, गोलंदाजीचा सराव करता येणार नाही.
- जर अशा सरावामुळे कायदे ४१.३ (सामन्याचा चेंडू - त्याची स्थिती बदलणे) किंवा ४१.९ (क्षेत्ररक्षण संघाने वेळ वाया घालवणे) यांचे उल्लंघन होणार नाही अशी पंचांची खात्री पटली.

## २६.३ रन-अपचा सराव

कायदे ४१.९ (क्षेत्ररक्षण संघाने वेळ वाया घालवणे) किंवा ४१.१२ (क्षेत्ररक्षकाने खेळपट्टी खराब करणे) यांपैकी कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होणार नाही याविषयी समाधानी असेल तर पंच गोलंदाजाला रन-अपचा सराव करण्याची परवानगी देईल.

## २६.४ कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दंड

सर्व प्रकारचा सराव हा कायदे ४१.३ (सामन्याचा चेंडू - त्याची स्थिती बदलणे), ४१.९ (क्षेत्ररक्षण संघाने वेळ वाया घालवणे) किंवा ४१.१२ (क्षेत्ररक्षकाने खेळपट्टी खराब करणे) मधील तरतुदींच्या अधीन असेल.

**२६.४.१** जर २६.१ किंवा २६.२ मधील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाले, तर पंच

- संबंधित खेळाडूस अशा प्रकारचा सराव करण्याची परवानगी नसल्याची ताकीद देईल.

- दुसऱ्या पंचाला आणि शक्य तितक्या लवकर दोन्ही कर्णधारांना आपल्या कृतीचे कारण सांगेल.

**२६.४.१.१** जर नाबाद फलंदाजाने या कायद्याचे उल्लंघन केले तर पंच दुसऱ्या फलंदाजाला व त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक फलंदाजाला अशा प्रकारची ताकीद दिली गेली असल्याचे सांगेल. अशी ताकीद त्या खेळाडूच्या संघाला संपूर्ण सामन्यासाठी लागू असेल.

**२६.४.२** जर सामन्यादरम्यान त्या संघातील कोणत्याही खेळाडूने पुन्हा कधीही या कायद्याचे उल्लंघन केले तर पंच

- विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- दुसऱ्या पंचाला, स्कोअरर्सना आणि शक्य तितक्या लवकर दोन्ही कर्णधारांना, आणि, कायद्याचे उल्लंघन खेळ चालू असताना झाले असल्यास, नाबाद फलंदाजांना आपल्या कृतीचे कारण सांगेल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## कायदा २७ यष्टिरक्षक

### २७.१ संरक्षक उपकरणे

यष्टिरक्षक हा असा एकमेव क्षेत्ररक्षक आहे की ज्याला ग्लोव्हज व बाहेरील पॅड्स घालण्याची परवानगी आहे. जर त्याने ते तसे घातले तर ते कायदा २८.२ (चेंडू अडवणे) साठी त्याच्या/तिच्या अंगाचा भाग म्हणून धरले जातील. जर चेंडू खेळीत आल्यावर यष्टिरक्षकाच्या कृतीवरून किंवा त्याच्या उभे राहण्याच्या जागेवरून तो/ती यष्टिरक्षकाची सर्वसाधारण कर्तव्ये पार पाडू शकणार नाही असे पंचांना वाटले तर तो/ती आपला हा हक्क गमावून बसेल आणि कायदे ३३.२ (योग्य झेल), ३९ (यष्टीचीत), २८.१ (संरक्षक उपकरणे), २८.४ (ऑन साईडच्या क्षेत्ररक्षकांवरील मर्यादा) आणि २८.५ (क्षेत्ररक्षकांनी खेळपट्टीवर अतिक्रमण न करणे) साठी यष्टिरक्षक म्हणून ओळखला जाणार नाही.

### २७.२ ग्लोव्हज

**२७.२.१** जर, २७.१ मध्ये परवानगी असल्याप्रमाणे, यष्टिरक्षकाने ग्लोव्हज घातले तर त्याच्या तर्जनी व अंगठा यांमध्ये आधारासाठी जोड असू शकेल मात्र इतर कोणत्याही दोन बोटांच्या मध्ये आधारासाठी जोड नसावा.

**२७.२.२** जर तर्जनी आणि अंगठा यांच्यामध्ये जोड वापरला, तर तो एका सलग ताणल्या न जाणाऱ्या पदार्थाचा असावा, ज्याला कापडाचा तुकडा लावला असला तरी तेथे कापडाची शिवलेली दुमड येऊ नये.

**२७.२.३** तर्जनी व अंगठा यांना आधारासाठी जोडलेल्या पदार्थाची वरची रेषा तर्जनीच्या वरच्या टोकापासून अंगठ्याच्या वरच्या टोकापर्यंत सरळ असावी आणि ग्लोव्ह घातलेला हात पूर्णपणे उघडल्यास ती ताठ राहावी. परिशिष्ट 'इ' पाहा.

### २७.३ यष्टिरक्षकाची जागा

**२७.३.१** चेंडू खेळीत आल्यापासून गोलंदाजाने टाकलेला चेंडू

स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला लागेपर्यंत

किंवा स्ट्रायकरच्या बाजूच्या यष्टींच्या पलीकडे जाईपर्यंत

किंवा स्ट्रायकर धाव घेण्याचा प्रयत्न करेपर्यंत

यष्टिरक्षक स्ट्रायकरच्या बाजूच्या यष्टींच्या पूर्णपणे मागे उभा राहील.

**२७.३.२** जर यष्टिरक्षकाने या कायद्याचे उल्लंघन केले तर गोलंदाजाने चेंडू टाकल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, स्ट्रायकरकडील पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल.

### २७.४ यष्टिरक्षकाची हालचाल

**२७.४.१** चेंडू खेळीत आल्यापासून तो स्ट्रायकरजवळ पोहोचेपर्यंत जर यष्टिरक्षकाने, स्ट्रायकरच्या यष्टींच्या संबंधाने, त्याच्या/तिच्या यष्टिरक्षणासाठी उभे राहण्याच्या जागेत लक्षणीय बदल केला तर ते अनुचित ठरेल. मात्र खालील गोष्टी त्यास अपवाद असतील.

**२७.४.१.१** धीम्या चेंडूसाठी त्याने/तिने काही पावले पुढे येणे, मात्र यामुळे यष्टी त्याच्या/तिच्या आवाक्यात येता कामा नयेत.

**२७.४.१.** गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूच्या दिशेप्रमाणे उजव्या किंवा डाव्या बाजूला केलेली हालचाल.

**२७.४.१.३** स्ट्रायकर खेळत असलेल्या फटक्यावर किंवा त्याच्या/तिच्या फटका खेळण्यासाठी केलेल्या कृतीवर प्रतिक्रिया म्हणून केलेली हालचाल. मात्र कायदा २७.३ च्या तरतुदी लागू राहतील.

**२७.४.२** यष्टिरक्षकाने अनुचित हालचाल केल्यास कोणताही पंच डेड बॉलचा पुकार व इशारा करेल.

### २७.५ यष्टिरक्षकावरील बंधने

जर कोणत्याही पंचाच्या मते यष्टिरक्षकाने स्ट्रायकरच्या चेंडू खेळण्याच्या आणि त्याच्या/तिच्या यष्टींचे रक्षण करण्याच्या अधिकारात हस्तक्षेप केला तर कायदा २०.४.२.६ (पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे ) लागू होईल.

मात्र जर, कोणत्याही पंचाला यष्टिरक्षकाने जाणूनबुजून हस्तक्षेप केला आहे असे वाटले तर कायदा ४१.४ (जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे) सुद्धा लागू होईल.

### २७.६ स्ट्रायकरचा यष्टिरक्षकास अडथळा

जर चेंडू खेळताना किंवा त्याच्या/तिच्या यष्टींचे कायदेशीरपणे रक्षण करताना स्ट्रायकरने यष्टिरक्षकास अडथळा आणला तर कायदा ३७.३ (झेल घेताना अडथळा आणला) अनुसार सोडून तो/ती बाद होणार नाही.

## कायदा २८ क्षेत्ररक्षक

### २८.१ संरक्षक उपकरणे

यष्टिरक्षक सोडून इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकास ग्लोव्हज व बाहेरील पॅड्स घालण्याची परवानगी दिली जाणार नाही. याशिवाय हाताला किंवा बोटांना पंचांच्या संमतीशिवाय संरक्षणात्मक आवरण घालता येणार नाही.

### २८.२ चेंडू अडवणे

**२८.२.१** २८.२.१.२ प्रमाणे सोडून, क्षेत्ररक्षक त्याच्या/तिच्या अंगाच्या कोणत्याही भागाने चेंडू अडवू शकतो (परिशिष्ट अ.१२ पाहा). मात्र जर चेंडू खेळीत असताना त्याने/तिने जाणूनबुजून खालीलप्रमाणे चेंडू अडवला तर त्याने/तिने बेकायदेशीर रित्या चेंडू अडवला असे मानण्यात येईल.

**२८.२.१.१** आपल्या अंगाचा भाग सोडून इतर कशाच्याही साहाय्याने चेंडू अडवला.

**२८.२.१.२** त्याच्या/तिच्या कपड्याचा कोणताही भाग हाताने ताणून त्याचा वापर त्याने/तिने चेंडू अडवण्यासाठी केला.

**२८.२.१.३** आपण घातलेल्या पोशाखाचा भाग, एखादे उपकरण किंवा इतर कोणतीही वस्तू टाकून दिली व त्या वस्तूचा नंतर चेंडूला स्पर्श झाला.

**२८.२.२** क्षेत्ररक्षकाच्या अंगावरून त्याने घातलेल्या पोशाखाचा भाग, एखादे उपकरण किंवा इतर कोणतीही वस्तू अपघाताने खाली पडली व त्याचा चेंडूला स्पर्श झाला तर असे क्षेत्ररक्षण बेकायदेशीर मानले जाणार नाही.

**२८.२.३** जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने बेकायदेशीर रित्या चेंडू अडवला तर तो चेंडू लगेचच डेड होईल आणि

- नोबॉल किंवा वाईडची एक धाव मिळेल.
- फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावांसह, गुन्हा घडण्याआधी त्यांनी एकमेकांना ओलांडले असल्यास, चालू असलेली धावही मिळेल.
- तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

या व्यतिरिक्त पंच

- फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- दुसरा पंच व क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार यांना आपल्या कृतीचे कारण सांगेल.
- दोन्ही फलंदाजांना व शक्य तेवढ्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला घडलेल्या प्रसंगाबद्दल माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## २८.३ क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स

**२८.३.१** क्षेत्ररक्षक वापरत नसतील तेव्हा, संरक्षक हेल्मेट्स, फक्त मैदानाच्या पृष्ठभागावर यष्टिरक्षकाच्या मागे दोन्ही बाजूंच्या यष्टींच्या सरळ रेषेत ठेवता येतील, मात्र ती मैदानाच्या पृष्ठभागावर इतर कोठेही ठेवता येणार नाहीत.

**२८.३.२** जर खेळीत असलेला चेंडू, २८.३.१ प्रमाणे ठेवलेल्या हेल्मेटला लागला तर,

**२८.३.२.१** चेंडू डेड होईल

आणि, २८.३.३ मधील तरतुदींच्या अधीन राहून,

**२८.३.२.२** फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करण्यात येतील;

**२८.३.२.३** चेंडू संरक्षक हेल्मेटला लागण्याआधी फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा जमा होतील आणि चेंडू संरक्षक हेल्मेटला लागण्याआधी फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले असल्यास चालू असलेली धावही मिळेल.

**२८.३.३** जर खेळीत असलेला चेंडू, २८.३.१ प्रमाणे ठेवलेल्या हेल्मेटला लागला तर, कायदे २३.३ (लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत), २५.७ (स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने), किंवा ३४ (चेंडू दोनदा मारला) यांमधील परिस्थिती लागू होत नसल्यास, पंच

- २८.३.२.३ प्रमाणे फलंदाजांनी काढलेल्या धावा जमा करण्याची परवानगी देईल.
- लागू असल्यास, स्कोअररला नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.

- २८.३.२.२ प्रमाणे ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असलेल्या इतर दंड धावा बहाल करेल.

**२८.३.४** जर खेळीत असलेला चेंडू, २८.३.१ प्रमाणे ठेवलेल्या हेल्मेटला लागला आणि कायदे २३.३ (लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत), २५.७ (स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने), किंवा ३४ (चेंडू दोनदा मारला) यांमधील परिस्थिती लागू होत असल्यास, पंच

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- लागू असल्यास, स्कोअररला नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.
- कायदा २८.३.२ प्रमाणे मिळणाऱ्या दंड धावा सोडून, लागू असलेल्या इतर दंड धावा बहाल करेल.

## २८.४ ऑन साईडच्या क्षेत्ररक्षकांवरील मर्यादा

गोलंदाज हातातून चेंडू सोडत असताना ऑन साईडला पॉपिंग क्रीझच्या मागे, यष्टिरक्षक सोडून, दोन पेक्षा जास्त क्षेत्ररक्षक ठेवता येणार नाहीत. क्षेत्ररक्षकाचे अंग, हवेत असो किंवा जमिनीवर टेकलेले, संपूर्णपणे पॉपिंग क्रीझच्या पुढे नसेल तर तो/ती या रेषेच्या मागे आहे असे मानले जाईल.

जर कोणत्याही क्षेत्ररक्षकाने या कायद्याचे उल्लंघन केले तर स्ट्रायकरकडील पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल.

## २८.५ क्षेत्ररक्षकांनी खेळपट्टीवर अतिक्रमण न करणे

चेंडू खेळीत असताना आणि त्याचा स्पर्श स्ट्रायकरच्या बॅटला अथवा अंगाला होईपर्यंत किंवा चेंडू स्ट्रायकरच्या बॅटच्या पलीकडे जाईपर्यंत, गोलंदाजाशिवाय इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाच्या अंगाचा कोणताही भाग खेळपट्टीवर टेकलेला किंवा खेळपट्टीच्या वर हवेत नसावा.

यष्टिरक्षक सोडून इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाने या कायद्याचे उल्लंघन केल्यास गोलंदाजाकडील पंच चेंडू टाकल्यावर शक्य तितक्या लवकर नोबॉलचा पुकार व इशारा करेल. तथापि, कायदा २७.३ (यष्टिरक्षकाची जागा) ची नोंद घ्यावी.

## २८.६ यष्टिरक्षकाशिवाय इतर क्षेत्ररक्षकांची हालचाल

**२८.६.१** चेंडू खेळीत आल्यापासून स्ट्रायकरजवळ पोहोचेपर्यंत यष्टिरक्षक सोडून इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाने केलेली कोणतीही हालचाल अनुचित ठरेल. मात्र खालील गोष्टी त्यास अपवाद असतील.

**२८.६.१.१** स्ट्रायकरच्या यष्टींच्या संबंधाने, क्षेत्ररक्षणासाठी उभे राहण्याच्या पवित्र्यात केलेला किरकोळ बदल.

**२८.६.१.२** जवळचा क्षेत्ररक्षक सोडून, इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाने स्ट्रायकारच्या किंवा स्ट्रायकारच्या यष्टींच्या दिशेने केलेली अशी हालचाल की ज्यामुळे क्षेत्ररक्षकाच्या क्षेत्ररक्षणाच्या जागेत लक्षणीय बदल होत नाही.

**२८.६.१.३** स्ट्रायकर खेळत असलेल्या फटक्यावर किंवा त्याच्या/तिच्या फटका खेळण्यासाठी केलेल्या कृतीवर प्रतिक्रिया म्हणून कोणत्याही क्षेत्ररक्षकाने केलेली हालचाल.

**२८.६.२** सर्व परिस्थितींत कायदा २८.४ (ऑन साईडच्या क्षेत्ररक्षकांवरील मर्यादा) लागू राहील.

**२८.६.३** अशा प्रकारची अनुचित हालचाल झाल्यास कोणताही पंच डेड बॉलचा पुकार व इशारा करेल.

**२८.६.४** कायदा ४१.४ (जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे) ची नोंद घ्यावी. कायदा २७.४ (यष्टिरक्षकाची हालचाल) सुद्धा पाहा.

## कायदा २९ यष्टी पडली

### २९.१ यष्टी पाडली

**२९.१.१** पुढीलपैकी कोणत्याही प्रकारे एखादी बेल यष्टींवरून पूर्णपणे काढली किंवा एखादी यष्टी बाहेर उखडून टाकली तर यष्टी पाडली असे मानण्यात येईल.

**२९.१.१.१** चेंडूने,

**२९.१.१.२** स्ट्रायकरच्या हातात असलेल्या बॅटने किंवा हातात असलेल्या बॅटच्या कोणत्याही भागाने,

**२९.१.१.३** केवळ या कायद्यापुरते, स्ट्रायकरच्या हातातून सुटलेल्या बॅटने किंवा बॅटपासून अलग झालेल्या बॅटच्या कोणत्याही भागाने,

**२९.१.१.४** स्ट्रायकरच्या अंगाने किंवा त्याच्या/तिच्या पोषाखाच्या किंवा उपकरणाच्या अंगावरून अलग होणाऱ्या कोणत्याही भागाने,

**२९.१.१.५** क्षेत्ररक्षकाच्या हाताच्या पंजाने किंवा हाताने, मात्र वापरण्यात आलेल्या अशा पंजात किंवा पंजांत, किंवा वापरण्यात आलेल्या अशा हाताच्या पंजात चेंडू पकडलेला असावा.

**२९.१.१.६** जर २९.१.१.५ प्रमाणे एखाद्या क्षेत्ररक्षकाने एखादी यष्टी, चेंडूने मारून किंवा उखडून जमिनीबाहेर काढली तरीही यष्टी योग्य प्रकारे पडली असे मानण्यात येईल.

**२९.१.२** बेल यष्टीवरून तात्पुरती किंवा पूर्णपणे सरकली तरी ती यष्टीवरून पूर्णपणे काढली असे मानले जाणार नाही. मात्र जर खाली पडताना बेल दोन यष्टींमध्ये अडकली तर ती पूर्णपणे काढली असे मानले जाईल.

### २९.२ एक बेल पडली

जर एक बेल पडली असेल तर, २९.१ मधील कोणत्याही प्रकारे, दुसरी बेल पडली किंवा तीन यष्टींपैकी कोणतीही यष्टी चेंडूने मारून किंवा उखडून जमिनीबाहेर काढली तर ते यष्टी पाडण्यासाठी पुरेसे असेल.

### २९.३ यष्टी पूर्ववत करणे

चेंडू खेळीत असताना जर यष्टी पडली तर चेंडू डेड होईपर्यंत पंच ती पूर्ववत करणार नाही. कायदा २० (डेड चेंडू) पाहा. मात्र चेंडू खेळीत असताना कोणताही क्षेत्ररक्षक,

- एक किंवा दोन्ही बेल्स पुन्हा यष्टींवर ठेवू शकेल.
- एक किंवा अधिक यष्टी जमिनीत मूळ जागी रोवू शकेल.

### २९.४ बेल्स काढून ठेवणे

कायदा ८.५ (बेल्स काढून ठेवणे) प्रमाणे पंचांनी बेल्स काढून ठेवण्याचे ठरवले तर यष्टी पडली की नाही हे संबंधित पंच ठरवेल.

**२९.४.१** बेल्सशिवाय खेळण्याचा निर्णय घेतल्यावर, जर यष्टी २९.१.१.२, २९.१.१.३ किंवा २९.१.१.४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे चेंडू, स्ट्रायकरची बॅट, त्याचे/तिचे अंग किंवा त्याच्या/तिच्या पोशाखामुळे किंवा उपकरणामुळे पडली आहे अथवा २९.१.१.५ मध्ये सांगितलेल्या पद्धतीने क्षेत्ररक्षकाने पाडली आहे याविषयी संबंधित पंच समाधानी असेल तर यष्टी पडली असे मानले जाईल.

**२९.४.२** जर यष्टी आधीच पडली असेल किंवा पाडली गेली असेल तर २९.४.१ अजूनही मूळ जागी असलेल्या यष्टीला किंवा यष्टींना लागू होईल. कोणताही क्षेत्ररक्षक पुन्हा यष्टी पाडण्याची संधी मिळण्यासाठी, २९.३ प्रमाणे, पडलेली यष्टी पुन्हा जमिनीत रोवू शकेल.

## कायदा ३० फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझबाहेर

### ३०.१ फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझबाहेर कधी असेल

**३०.१.१** एखाद्या फलंदाजाच्या अंगाचा कोणताही भाग किंवा बॅट यापैकी काहीही त्याच्या/तिच्या पॉपिंग क्रीझच्या मागे टेकलेले नसेल तर तो फलंदाज त्याच्या क्रीझच्या बाहेर आहे असे मानण्यात येईल.

**३०.१.२** मात्र, एखादा फलंदाज क्रीझच्या बाहेर आहे असे मानले जाणार नाही जर, स्वतःच्या क्रीझच्या दिशेने आणि त्यापलीकडे धावत जाताना किंवा झेप घेताना त्याच्या/तिच्या अंगाचा काही भाग किंवा बॅट यापैकी काहीही पॉपिंग क्रीझच्या पलीकडे जमिनीवर टेकले आणि त्यानंतर,

मैदानाशी त्याच्या/तिच्या अंगाचा अथवा बॅटचा संपर्क तुटला,

किंवा बॅटचा आणि त्याच्या/तिच्या अंगाचा संपर्क तुटला.

## ३०.२ फलंदाजाचे क्रीझ कोणते

**३०.२.१** जर एखाद्या क्रीझमध्ये एकच फलंदाज असेल तर ते त्याचे/तिचे क्रीझ असेल आणि जरी दुसरा/दुसरी फलंदाज नंतर त्या क्रीझमध्ये आला/आली तरीही ते त्याचेच/तिचेच क्रीझ राहील.

**३०.२.२** जर दोन्ही फलंदाज एकाच क्रीझमध्ये असतील आणि त्यानंतर त्यातील एकाने/एकीने क्रीझ सोडले, तर जो/जी फलंदाज त्या क्रीझमध्ये राहील, त्याचे/तिचे ते क्रीझ असेल.

**३०.२.३** जर दोन्हीही क्रीझमध्ये एकही फलंदाज नसेल, तर जो/जी फलंदाज ज्या क्रीझजवळ असेल, ते त्याचे/तिचे क्रीझ मानले जाईल किंवा जर दोन्ही फलंदाज एकाच रेषेत असतील, तर सरळ रेषेत यायच्या आधी जो/जी फलंदाज ज्या क्रीझच्या जवळ असेल, ते त्याचे/तिचे क्रीझ मानले जाईल.

**३०.२.४** जर एक फलंदाज एखाद्या क्रीझमध्ये असेल, तर, रनर घेतलेला/घेतलेली स्ट्रायकर मैदानावर नसल्यास, दुसरा/दुसरी फलंदाज कोठेही असला/असली तरीही, दुसरे क्रीझ हे त्या फलंदाजाचे असेल.

**३०.२.५** जेव्हा रनर घेतलेला/घेतलेली फलंदाज स्ट्रायकर असेल, तेव्हा त्याचे/तिचे क्रीझ नेहमीच यष्टिरक्षकाच्या बाजूचे असेल. या परिस्थितीत ३०.२.१, ३०.२.२, ३०.२.३ आणि ३०.२.४ फक्त रनर आणि नॉन-स्ट्रायकर यांनाच लागू होतील. म्हणजेच यष्टिरक्षकाच्या बाजूचे क्रीझ परिस्थितीनुसार रनर किंवा नॉन-स्ट्रायकर यापैकी एकाचेही/एकीचेही असेल.

## ३०.३ नॉन-स्ट्रायकरची जागा

नॉन-स्ट्रायकर, जेव्हा गोलंदाजाकडील बाजूला उभा असेल, तेव्हा गोलंदाज यष्टींच्या ज्या बाजूने गोलंदाजी करत असेल त्याच्या विरुद्ध बाजूला उभा राहील. मात्र पंचाने विनंती मान्य केल्यास तो त्याच बाजूला उभा राहू शकेल.

## कायदा ३१ अपील्स

### ३१.१ अपील झाल्याशिवाय पंच फलंदाजास बाद देणार नाहीत

फलंदाज कायद्यानुसार बाद असला तरीही, एखाद्या क्षेत्ररक्षकाने अपील केल्याशिवाय, कोणताही पंच त्याला/तिला बाद देणार नाही. मात्र कोणत्याही कायद्याअंतर्गत बाद असलेल्या फलंदाजास अपील झाल्याशिवाय स्वतःहून आपली यष्टी सोडून जाण्यास मनाई नाही. तथापि, ३१.७ मधील तरतुदींची नोंद घ्यावी.

### ३१.२ फलंदाज बाद झाला

एखादा फलंदाज बाद होईल जर

अपील झाल्यावर, पंचाने त्याला/तिला बाद दिले

किंवा तो/ती कायद्यानुसार बाद असेल आणि ३१.१ प्रमाणे त्याने/तिने स्वतःहून आपला यष्टी सोडली.

### ३१.३ अपील करण्याची वेळ

गोलंदाजाने पुढील चेंडू टाकण्यासाठी रन-अप घ्यायला सुरुवात करण्याआधी किंवा रन-अप घ्यायचा नसल्यास गोलंदाजीची कृती करण्याआधी आणि टाईम म्हणण्याआधी अपील केल्यास ते वैध ठरेल.

‘टाईम’चा पुकार झाला नसल्यास, पुढील षटक सुरू होण्याआधी केलेले अपील 'ओव्हर'च्या पुकारामुळे अवैध ठरणार नाही. कायदे १२.२ (‘टाईम’चा पुकार) आणि १७.२ (षटकाची सुरुवात) पाहा.

### ३१.४ अपील 'हाऊज दॅट'

'हाऊज दॅट?' हे सर्व प्रकारे बाद देण्यासाठी अपील म्हणून धरले जाईल.

### ३१.५ अपीलास उत्तर देणे

स्ट्रायकरकडील पंच कायदे ३५ (स्वयंचीत), ३९ (यष्टीचीत), व जेव्हा यष्टिरक्षकाच्या बाजूला होईल तेव्हा, कायदा ३८ (धावचीत) या अंतर्गत उद्भवणाऱ्या सर्व अपीलास उत्तर देईल. गोलंदाजाकडील पंच इतर सर्व अपीलांस उत्तर देईल.

जेव्हा अपील केले जाईल तेव्हा, प्रत्येक पंच त्याच्या/तिच्या अधिकार क्षेत्रातील बाबींवर निर्णय देईल.

फलंदाजाला नाबाद दिले गेल्यास, कोणताही पंच ३१.३ प्रमाणे केल्या गेलेल्या, त्याच्या/तिच्या अधिकार क्षेत्रातील पुढील अपीलास उत्तर देऊ शकेल.

### ३१.६ पंचांची सल्लामसलत

प्रत्येक पंच त्याच्या/तिच्या अधिकार क्षेत्रातील अपीलास उत्तर देईल. जर एखादा पंच अशा एखाद्या गोष्टीबद्दल साशंक असेल की जी गोष्ट त्याचा सहकारी पंच त्याच्या जागेवरून कदाचित अधिक चांगल्या प्रकारे पाहू शकला असेल तर तो/ती आपल्या सहकारी पंचाशी वस्तुस्थितीविषयी सल्लामसलत करून आपला निर्णय देईल. सल्लामसलतीनंतरही जर पंचाच्या मनात शंका असेल तर त्याचा निर्णय 'नाबाद' असा राहील.

### ३१.७ फलंदाजाने गैरसमजुतीने यष्टी सोडणे

पंचांनी बाद न देता, बाद आहे असे वाटून जर एखादा फलंदाज गैरसमजुतीने त्याचा डाव सोडून जात आहे अशी पंचांची खात्री पटली तर पंच हस्तक्षेप करेल. क्षेत्ररक्षण संघाकडून पुढे काही कृती होऊ नये म्हणून हस्तक्षेप करणारा पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल व फलंदाजाला परत बोलावेल.

तो डावातील शेवटचा बळी नसल्यास, त्यापुढील चेंडू खेळीत येईपर्यंत फलंदाजाला परत बोलावले जाऊ शकेल. मात्र तो जर डावातील शेवटचा बळी असेल तर पंच मैदान सोडून जाईपर्यंत फलंदाजाला परत बोलावता येऊ शकेल.

### ३१.८ अपील मागे घेणे

ज्या पंचाच्या अधिकार क्षेत्रातील अपील असेल त्या पंचाची संमती घेऊनच क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार अपील मागे घेऊ शकेल. जर अशी संमती दिली गेली तर संबंधित पंच, लागू असल्यास, आपला निर्णय मागे घेऊन फलंदाजास परत बोलावेल.

अपील हे त्यापुढील चेंडू खेळीत येईपर्यंत मागे घेतले जाऊ शकते किंवा, जर डाव संपला असेल तर पंच मैदान सोडून जाईपर्यंत ते मागे घेतले जाऊ शकते.

## कायदा ३२ त्रिफळाचीत

### ३२.१ त्रिफळाचीत बाद

**३२.१.१** गोलंदाजाने टाकलेला चेंडू, नोबॉल नसल्यास, जरी आधी स्ट्रायकरच्या बॅटला किंवा अंगाला लागला तरी, त्या चेंडूने यष्टी पडल्यास फलंदाज त्रिफळाचीत होईल.

**३२.१.२** तथापि, यष्टींना लागण्याआधी चेंडूचा इतर एखाद्या क्षेत्ररक्षकाला किंवा पंचाला स्पर्श झाला तर स्ट्रायकर त्रिफळाचीत होणार नाही. मात्र तो कायदे ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे), ३८ (धावचीत) किंवा ३९ (यष्टिचीत) यांच्या अधीन असेल.

**३२.२ त्रिफळाचीत आधी धरतील**

३२.१ प्रमाणे जर यष्टी पडली तर, स्ट्रायकर दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने बाद असला/असली तरी, त्रिफळाचीत धरला/धरली जाईल.

## कायदा ३३ झेल

**३३.१ झेल बाद**

गोलंदाजाने टाकलेला चेंडू नोबॉल नसेल, आणि कोणत्याही क्षेत्ररक्षकाशी संपर्क होण्याआधी त्या चेंडूचा स्ट्रायकरच्या बॅटला स्पर्श झाला आणि त्यानंतर तो चेंडू एखाद्या क्षेत्ररक्षकाने, ३३.२ आणि ३३.३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, जमिनीला स्पर्श होण्याआधी योग्य प्रकारे झेलला, तर तो स्ट्रायकर झेलबाद होईल.

**३३.२ योग्य झेल**

**३३.२.१** एखादा झेल हा योग्य ठरेल, जर, प्रत्येक बाबतीत,

केव्हाही, चेंडूचा

किंवा चेंडूच्या संपर्कात असलेल्या कोणत्याही क्षेत्ररक्षकाचा

झेल पूर्ण करण्याआधी, सीमारेषेपलीकडील कोणत्याही गोष्टीला स्पर्श झालेला नसेल. कायदे १९.४ (चेंडू सीमारेषेपलीकडे टेकला) आणि १९.५ (क्षेत्ररक्षक सीमारेषेपलीकडे टेकला) यांची नोंद घ्यावी.

**३३.२.२** याशिवाय, खालीलपैकी कोणत्याही परिस्थितीत तो झेल योग्य आहे असे मानले जाईल:

**३२.२.२.१** चेंडू क्षेत्ररक्षकाने एका किंवा दोन्ही हातात पकडलेला असताना जरी झेल पकडलेला हात जमिनीवर टेकला, किंवा तो चेंडू क्षेत्ररक्षकाने शरीराशी धरला, किंवा क्षेत्ररक्षकाने घातलेल्या बाह्य संरक्षक उपकरणात जाऊन अडकला, किंवा अपघाताने क्षेत्ररक्षकाच्या पोशाखात जाऊन अडकला.

**३३.२.२.२** स्ट्रायकरने कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारल्यानंतर क्षेत्ररक्षकाने झेलला, मात्र, पहिल्यांदा मारल्यावर चेंडूचा मैदानास स्पर्श झालेला नसावा. कायदा ३४ (चेंडू दोनदा मारला) पाहा.

**३३.२.२.३** चेंडूचा यष्टींना, पंचाला, क्षेत्ररक्षकाला, रनरला किंवा दुसऱ्या फलंदाजाला स्पर्श झाल्यानंतर तो क्षेत्ररक्षकाने झेलला.

**३३.२.२.४** ३३.२.१ मधील अटींची पूर्तता केल्यास, चेंडूने हवेत सीमारेषा पार केल्यानंतर क्षेत्ररक्षकाने तो झेलला.

**३३.२.२.५** पंचांनी ज्याला सीमारेषा म्हणून धरलेले नाही, अशा सीमारेषेच्या आतील अडथळ्यास चेंडूचा स्पर्श झाल्यानंतर चेंडू झेलला.

**३३.३ झेल घेण्याची कृती**

झेल घेण्याची कृती, ज्यावेळी चेंडूचा क्षेत्ररक्षकाच्या अंगाला पहिल्यांदा स्पर्श होईल, तेव्हा सुरू होईल व जेव्हा क्षेत्ररक्षक चेंडूवर आणि स्वतःच्या हालचालींवर संपूर्ण नियंत्रण मिळवेल, तेव्हा संपेल.

**३३.४ धावा जमा होणार नाहीत**

जर स्ट्रायकर झेलबाद झाला, तर त्या चेंडूवर फलंदाजांनी झेल पूर्ण होण्याआधी पूर्ण केलेल्या धावा जमा होणार नाहीत, मात्र कोणत्याही संघाला मिळणाऱ्या दंड धावा जमा होतील. कायदा १८.१२ (फलंदाज त्याने/तिने सोडलेल्या जागेवर परत येईल) झेल पूर्ण झाल्यापासून लागू होईल.

**३३.५ झेलबाद आधी धरतील**

जर ३३.१ मधील निकष लागू होत असतील आणि स्ट्रायकर त्रिफळाचीत झाला/झाली नसेल, तर, जरी कोणताही फलंदाज दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने बाद असला तरी, तो/ती झेलबाद होईल.

## कायदा ३४ चेंडू दोनदा मारला

**३४.१ चेंडू दोनदा मारला म्हणून बाद**

**३४.१.१** चेंडू खेळीत असताना, तो चेंडू स्ट्रायकरच्या अंगाच्या कोणत्याही भागाला लागला किंवा तो स्ट्रायकरने बॅटने मारला आणि क्षेत्ररक्षकाने चेंडूला स्पर्श करण्याआधी, स्ट्रायकरने, त्याच्या/तिच्या यष्टींच्या रक्षणासाठी सोडून, त्याच्या/तिच्या बॅटने अथवा, बॅट न धरलेल्या हाताने सोडून, अंगाच्या इतर कोणत्याही भागाने, पुन्हा जाणूनबुजून मारला, तर स्ट्रायकर चेंडू दोनदा मारला म्हणून बाद होईल. ३४.३ व कायदा ३७ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे) पाहा.

**३४.१.२** या कायद्यापुरते 'मारला' किंवा 'लागला' यात चेंडूचा स्ट्रायकरच्या अंगाला झालेल्या स्पर्शाचा अंतर्भाव असेल.

**३४.२ चेंडू दोनदा मारला - नाबाद**

या कायद्यानुसार स्ट्रायकर बाद होणार नाही जर त्याने/तिने

**३४.२.१** चेंडू क्षेत्ररक्षकाला परत देण्यासाठी दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर पुन्हा मारला. तथापि, कायदा ३७.४ (क्षेत्ररक्षकास चेंडू परत करणे) मधील तरतुदींची नोंद घ्यावी.

**३४.२.२** चेंडूचा क्षेत्ररक्षकास स्पर्श झाल्यावर तो जाणूनबुजून मारला. तथापि, कायदा ३७.१ (क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद) मधील तरतुदींची नोंद घ्यावी.

### ३४.३ कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला

स्ट्रायकर, केवळ त्याच्या/तिच्या यष्टींच्या रक्षणासाठी आणि चेंडूचा क्षेत्ररक्षकाला स्पर्श होण्याआधी, त्याच्या/तिच्या बॅटने, अथवा, बॅट नसलेल्या हाताने सोडून, अंगाच्या इतर कोणत्याही भागाने, चेंडू दुसऱ्यांदा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मारू शकेल.

चेंडू नोबॉल असला, तरीही स्ट्रायकर त्याच्या/तिच्या यष्टींचे रक्षण करू शकेल.

मात्र, त्याच्या/तिच्या यष्टींच्या रक्षणासाठी चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारताना स्ट्रायकर झेल घेण्यास अडथळा आणू शकत नाही. कायदा ३७.३ (झेल घेताना अडथळा आणला) पाहा.

### ३४.४ कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारल्यास मिळणाऱ्या धावा

३४.३ मध्ये परवानगी असल्याप्रमाणे, जेव्हा चेंडू कायद्यानुसार एकापेक्षा जास्त वेळा मारला जाईल तेव्हा, जर कोणत्याही कारणामुळे चेंडू डेड झाला नाही, तर, चेंडू सीमापार गेल्यावर किंवा फलंदाजांनी पहिली धाव पूर्ण केल्यावर लगेचच पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल. मात्र, क्षेत्ररक्षकाला झेल पूर्ण करण्याची संधी मिळावी, म्हणून पंच डेड चेंडूचा पुकार करण्यास थोडा विलंब करेल.

पंच

- फलंदाजी संघाला मिळणाऱ्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास, त्याच्या/तिच्या मूळ जागी पाठवेल.
- लागू असल्यास, स्कोअररला नोबॉलचा इशारा करेल.
- लागू असल्यास, कायदा२८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.

### ३४.५ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही

अशा प्रकारे गडी बाद झाल्यास त्याचे श्रेय गोलंदाजास मिळणार नाही.

## कायदा ३५ स्वयंचीत

### ३५.१ स्वयंचीत बाद

**३५.१.१** खालीलपैकी कोणत्याही परिस्थितीत, गोलंदाज चेंडू टाकायच्या शेवटच्या झेपेत आल्यानंतर आणि चेंडू खेळीत असताना, स्ट्रायकरची यष्टी कायदे २९.१.१.२ ते २९.१.१.४ (यष्टी पाडली) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याच्या/तिच्या बॅटमुळे किंवा अंगामुळे पडली, तर स्ट्रायकर स्वयंचीत म्हणून बाद होईल.

**३५.१.१.१** त्याने/तिने चेंडू खेळण्यासाठी तयार होण्याची किंवा खेळण्याची कोणतीही कृती करताना,

**३५.१.१.२** चेंडू खेळल्यावर किंवा खेळण्याचा प्रयत्न केल्यावर लगेचच पहिली धाव घेण्यासाठी निघताना,

**३५.१.१.३** चेंडू खेळण्याचा प्रयत्न केला नसेल तर पहिली धाव घेण्यासाठी निघताना. मात्र, पंचाच्या मते पहिली धाव घेण्याची सुरुवात चेंडू खेळण्याची संधी मिळाल्यावर लगेचच केलेली असावी,

**३५.१.१.४** कायदा ३४.३ (कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला) च्या तरतुदींनुसार चेंडू दोनदा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मारून आपल्या यष्टींचे संरक्षण करताना.

**३५.१.२** जर गोलंदाज चेंडू टाकायच्या शेवटच्या झेपेत येण्याआधी स्ट्रायकरने कायदे २९.१.१.२ ते २९.१.१.४ प्रमाणे त्याची/तिची यष्टी पाडली, तर कोणताही पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.

**३५.२ स्वयंचीत नाबाद**

जर खालीलपैकी कोणतीही गोष्ट लागू झाली तर, स्ट्रायकरची यष्टी ३५.१ मधील कोणत्याही प्रकारे पडली तरी तो या कायद्यानुसार बाद होणार नाही:

- जर, ३५.१.१.२ ते ३५.१.१.४ प्रमाणे सोडून, स्ट्रायकरने चेंडू खेळण्याची कोणतीही कृती पूर्ण केल्यानंतर हे घडले.
- जर, लगेचच पहिली धाव सुरू करताना सोडून, स्ट्रायकर धाव घेत असताना हे घडले.
- स्ट्रायकरने धावचीत किंवा यष्टीचीत होण्याचे टाळण्याचा प्रयत्न करताना हे घडले.
- स्ट्रायकरने, फेकलेल्या चेंडूपासून बचाव करण्याचा प्रयत्न करताना कधीही हे घडले.
- चेंडू टाकण्याच्या शेवटच्या झेपेत आल्यानंतर गोलंदाजाने चेंडू टाकला नाही. या परिस्थितीत कोणताही पंच ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल. कायदा २०.४ (पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे) पाहा.
- तो चेंडू नोबॉल असेल.

## कायदा ३६ पायचीत

**३६.१ पायचीत बाद**

३६.१.१ ते ३६.१.५ मधील सर्व बाबींची पूर्तता झाल्यास स्ट्रायकर पायचीत म्हणून बाद होईल.

**३६.१.१** गोलंदाजाने टाकलेला चेंडू नोबॉल नसेल

**३६.१.२** चेंडू, टप्पा न पडता थेट स्ट्रायकरच्या अंगाला लागला नसल्यास, त्याचा टप्पा दोन्ही बाजूच्या यष्टींना जोडणाऱ्या रेषेत किंवा स्ट्रायकरच्या यष्टींच्या ऑफ साईडला असेल

**३६.१.३** चेंडूचा स्पर्श आधी स्ट्रायकरच्या बॅटला न होता, टप्पा पडल्यावर अथवा न पडता, त्याच्या/तिच्या अंगाच्या कोणत्याही भागाला झाला असेल

**३६.१.४** चेंडूचा स्पर्श झाला तो भाग, बेल्सच्या पातळीच्या वर असला, तरी,

दोन्ही बाजूच्या यष्टींना जोडणाऱ्या सरळ रेषेत असेल

किंवा स्ट्रायकरने तो चेंडू बॅटने खेळण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला नसल्यास, दोन्ही बाजूच्या यष्टींना जोडणाऱ्या रेषेत किंवा उजव्या यष्टीच्या रेषेच्या बाहेर असेल.

**३६.१.५** चेंडू अंगाला लागला नसता, तर तो यष्टींना लागला असता.

## ३६.२ चेंडूचा स्पर्श

**३६.२.१** ३६.१.३, ३६.१.४ आणि ३६.१.५ मधील मुद्द्यांचा विचार करताना फक्त चेंडूचा पहिला स्पर्श विचारात घेतला जाईल.

**३६.२.२** ३६.१.३ चा विचार करताना, जर चेंडू स्ट्रायकरच्या अंगाला व बॅटला एकाच वेळी लागला असेल, तर तो चेंडू बॅटला प्रथम लागला, असे मानण्यात येईल.

**३६.२.३** ३६.१.५ चा विचार करताना, चेंडूचा अंगाला लागण्याआधीचा मार्ग, त्यानंतर टप्पा पडला असता किंवा नसता, तरीही, तसाच कायम राहील, असे गृहीत धरण्यात येईल.

## ३६.३ यष्टींची ऑफ साईड

स्ट्रायकरच्या यष्टींची ऑफ साईड, तो चेंडू खेळीत येईल त्या क्षणीच्या स्ट्रायकरच्या उभे राहण्याच्या पवित्र्यावरून ठरवली जाईल. परिशिष्ट अ.१३ पाहा.

# कायदा ३७ क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे

## ३७.१ क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद

**३७.१.१** ३७.२ मधील परिस्थिती सोडून, आणि चेंडू खेळीत असताना, जर कोणत्याही फलंदाजाने जाणूनबुजून क्षेत्ररक्षण संघाला शब्दाने अथवा कृतीने अडथळा आणण्याचा किंवा त्यांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला, तर तो/ती क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल. कायदा ३४ (चेंडू दोनदा मारला) सुद्धा पाहा.

**३७.१.२** ३७.२ मधील परिस्थिती सोडून, गोलंदाजाने टाकलेला चेंडू खेळताना स्ट्रायकरने तो चेंडू जाणूनबुजून बॅट न धरलेल्या हाताने मारला तर तो/ती क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल. अशा प्रकारे चेंडू मारण्याची पहिली, दुसरी किंवा त्यानंतरची वेळ असली, तरीही हे लागू होईल. चेंडू खेळण्याच्या कृतीमध्ये, चेंडू खेळणे आणि

त्याच्या/तिच्या यष्टींचे संरक्षण करण्यासाठी चेंडू दोनदा मारला, या दोन्ही गोष्टींचा समावेश होईल.

**३७.१.३** नोबॉलचा पुकार झाला असला किंवा नसला, तरीही हा कायदा लागू होईल.

### ३७.२ क्षेत्ररक्षणास अडथळा आणला - नाबाद

फलंदाज क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होणार नाही, जर,

अडथळा जाणूनबुजून आणला नसेल किंवा लक्ष जाणूनबुजून विचलित केले नसेल,

किंवा दुखापत टाळण्याचा प्रयत्न करताना अडथळा आणला गेला असेल,

किंवा स्ट्रायकरच्या बाबतीत, त्याने/तिने कायदा ३४.३ (कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला) अनुसार स्वतःच्या यष्टींचे कायदेशीर पद्धतीने रक्षण करण्यासाठी चेंडू दुसऱ्यांदा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मारला असेल. मात्र, ३७.३ पाहा.

### ३७.३ झेल घेताना अडथळा आणला

**३७.३.१** गोलंदाजाने टाकलेला चेंडू नोबॉल नसल्यास, कोणत्याही फलंदाजाने झेल घेताना जाणूनबुजून अडथळा आणून किंवा लक्ष विचलित करून स्ट्रायकरला झेलबाद होण्यापासून वाचवले तर स्ट्रायकर क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल.

**३७.३.२** स्ट्रायकरने कायदा ३४.३ (कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला) मधील तरतुदीनुसार कायदेशीर पद्धतीने त्याच्या/तिच्या यष्टींचे संरक्षण करताना असा अडथळा आणला, तरीही ३७.३.१ लागू होईल.

**३७.३.३** चेंडू नोबॉल असताना जर अशा प्रकारे अडथळा आणला गेला किंवा लक्ष विचलित केले गेले तर ज्या फलंदाजाने अडथळा आणला किंवा लक्ष विचलित केले, तो फलंदाज क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल.

**३७.३.४** जर स्ट्रायकरने कायदेशीर पद्धतीने त्याच्या/तिच्या यष्टींचे संरक्षण करताना प्रतिक्षिप्त क्रिया म्हणून असा अडथळा आणला, तर ३७.३.३ लागू होणार नाही.

### ३७.४ क्षेत्ररक्षकास चेंडू परत करणे

चेंडू खेळीत असताना आणि क्षेत्ररक्षकाची परवानगी न घेता, कोणत्याही फलंदाजाने क्षेत्ररक्षकास चेंडू परत करण्यासाठी बॅटचा किंवा त्याच्या/तिच्या अंगाच्या कोणत्याही भागाचा वापर केला, तर तो/ती क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल.

### ३७.५ मिळणाऱ्या धावा

जेव्हा कोणताही फलंदाज क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद होईल तेव्हा

**३७.५.१** झेल घेताना अडथळा आणला नसल्यास, गुन्हा घडण्याच्या आधी फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा आणि कोणत्याही संघाला बहाल करण्यात आलेल्या दंड धावा जमा

होतील. कायदे १८.६ (दंड म्हणून दिल्या जाणाऱ्या धावा) आणि १८.८ (फलंदाज बाद झाला तरी जमा होणाऱ्या धावा) पाहा.

**३७.५.२** जर झेल घेताना अडथळा आणला असेल, तर फलंदाजांनी काढलेल्या धावा जमा होणार नाहीत. मात्र कोणत्याही संघास बहाल केलेल्या दंड धावा जमा होतील.

**३७.६ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही**

अशा प्रकारे गडी बाद झाल्यास त्याचे श्रेय गोलंदाजास मिळणार नाही.

## कायदा ३८ धावचीत

**३८.१ धावचीत बाद**

३८.२ प्रमाणे सोडून, चेंडू खेळीत असताना कधीही, कोणताही फलंदाज धावचीत होईल, जर,

तो/ती त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असेल

आणि एखाद्या क्षेत्ररक्षकाने त्याची/तिची यष्टी योग्य प्रकारे पाडली.

३८.२.२.२ ची परिस्थिती सोडून, नोबॉल असला किंवा धाव घेण्याचा प्रयत्न केला असला किंवा नसला तरीही हे लागू होईल.

**३८.२ धावचीत नाबाद**

**३८.२.१** ३८.२.१.१ व ३८.२.१.२ मधील परिस्थितीत फलंदाज धावचीत होणार नाही.

**३८.२.१.१** तो/ती त्याच्या/तिच्या क्रीझमध्ये होता/होती आणि त्यानंतर जेव्हा यष्टी पाडली, तेव्हा दुखापत होऊ नये म्हणून त्याने/तिने आपले क्रीझ सोडले असेल.

कायदा ३०.१.२ (फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझबाहेर कधी असेल) च्या तरतुदींची सुद्धा नोंद घ्यावी.

**३८.२.१.२** गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूचा, यष्टी पडण्याआधी, कोणत्याही क्षेत्ररक्षकाला स्पर्श झाला नाही.

**३८.२.२** खालील ३८.२.२.१ आणि ३८.२.२.२ पैकी कोणत्याही परिस्थितीत स्ट्रायकर धावचीत होणार नाही.

**३८.२.२.१** तो/ती यष्टीचीत झाला/झाली. कायदे २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) आणि ३९.१.२ (यष्टीचीत बाद) पाहा.

**३८.२.२.२** नोबॉलचा पुकार झाला

आणि तो/ती त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर धाव घेण्याचा प्रयत्न न करता उभा/उभी आहे.

आणि यष्टिरक्षकाने इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाच्या हस्तक्षेपाशिवाय योग्य प्रकारे यष्टी पाडल्या.

मात्र, जर स्ट्रायकरने रनर घेतला असेल आणि तो रनर त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असेल, तर फक्त ३८.१ लागू होईल.

**३८.३ कोणता फलंदाज बाद**

ज्या बाजूची यष्टी पडली, त्या बाजूचे क्रीझ ज्या फलंदाजाचे क्रीझ असेल, तो फलंदाज ३८.१ प्रमाणे बाद होईल. कायदे २५.६ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) आणि ३०.२ (फलंदाजाचे क्रीझ कोणते) पाहा.

**३८.४ जमा होणाऱ्या धावा**

जर कोणताही फलंदाज धावचीत झाला तर चालू असलेली धाव मिळणार नाही, मात्र फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा व कोणत्याही संघाला बहाल केलेल्या दंड धावा मिळतील. कायदे १८.६ (दंड म्हणून दिल्या जाणाऱ्या धावा) आणि १८.८ (फलंदाज बाद झाला तरी जमा होणाऱ्या धावा) पाहा.

मात्र जर रनर असलेला स्ट्रायकर स्वतः धावचीत झाला/झाली आणि, यष्टी पाडण्याआधी, त्याच्या/तिच्या रनरने आणि दुसऱ्या फलंदाजाने काही धावा पूर्ण केल्या असतील, तर,

- त्या चेंडूपासून फलंदाजी संघास मिळालेल्या सर्व धावा नाकारण्यात येतील.
- नोबॉलची एक धाव मिळेल व ५ दंड धावा जमा करता येतील.
- पंच नॉन-स्ट्रायकरला त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.

कायदा २५.६ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) पाहा.

**३८.५ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही**

अशा प्रकारे गडी बाद झाल्यास त्याचे श्रेय गोलंदाजास मिळणार नाही.

## कायदा ३९ यष्टीचीत

**३९.१ यष्टीचीत बाद**

**३९.१.१** ३९.३ सोडून, स्ट्रायकर यष्टीचीत म्हणून बाद होईल, जर

गोलंदाजाने टाकलेला चेंडू नोबॉल दिला गेला नसेल

आणि तो/ती, ३९.३.१ प्रमाणे सोडून, त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असेल

आणि त्याने/तिने धाव घेण्याचा प्रयत्न केला नसेल

तेव्हा त्याची/तिची यष्टी यष्टिरक्षकाने दुसऱ्या क्षेत्ररक्षकाच्या हस्तक्षेपाशिवाय योग्य प्रकारे पाडली. तथापि, कायदे २५.६.२ आणि २५.६.५ (फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन) आणि २७.३ (यष्टिरक्षकाची जागा) यांची नोंद घ्यावी.

**३९.१.२** जर ३९.१.१ मधील सर्व अटींची पूर्तता झाली, तर, जरी धावचीतचा निर्णय योग्य ठरत असला तरी, स्ट्रायकर यष्टीचीत म्हणून बाद होईल.

### ३९.२ चेंडू यष्टिरक्षकाच्या अंगाला लागून परतणे

यष्टी चेंडूमुळे पडल्या असतील, तर त्या यष्टिरक्षकाने पाडल्या, असे मानले जाईल, जर चेंडू,

यष्टिरक्षकाच्या अंगाच्या किंवा उपकरणाच्या कोणत्याही भागाला आपटून चेंडू परत येऊन यष्टींना लागला

किंवा यष्टिरक्षकाने लाथ मारून किंवा फेकून यष्टींना मारला.

### ३९.३ यष्टीचीत नाबाद

**३९.३.१** गोलंदाजाने टाकलेला चेंडू खेळल्यानंतर, स्ट्रायकरने दुखापत टाळण्यासाठी त्याचे/तिचे क्रीझ सोडले असेल, तर तो/ती यष्टीचीत म्हणून बाद होणार नाही.

**३९.३.२** जर स्ट्रायकर यष्टीचीत झाला नसेल, तर तो/ती, कायदा ३८.२.२.२ (धावचीत नाबाद) मधील परिस्थिती सोडून, कायदा ३८.१ (धावचीत बाद) मधील अटी लागू होत असल्यास, धावचीत होऊ शकेल.

## कायदा ४० उशिर झाला म्हणून बाद

### ४०.१ उशिर झाला म्हणून बाद

**४०.१.१** एखादा गडी बाद झाल्यावर किंवा फलंदाज निवृत्त झाल्यावर नवीन येणारा/येणारी फलंदाज, 'टाईम'चा पुकार झाला नसल्यास, गार्ड घेण्यासाठी किंवा दुसऱ्या फलंदाजास पुढील चेंडू खेळण्यास तयार होण्यासाठी, गडी बाद झाल्यापासून किंवा फलंदाज निवृत्त झाल्यापासून ३ मिनिटांच्या आत, आपल्या जागेवर यायला हवा/हवी. ह्या अटीची पूर्तता न केल्यास, तर नवीन येणारा/येणारी फलंदाज उशिर झाला म्हणून बाद होईल.

**४०.१.२** जर बराच वेळ कोणी फलंदाज खेळपट्टीवर आला नाही, तर पंच कायदा १६.३ (पंचांनी सामना बहाल करणे) प्रमाणे प्रक्रिया सुरु करेल. त्या कायद्याच्या उद्देशांसाठी ही प्रक्रिया वर उल्लेख केल्याप्रमाणे ३ मिनिटे पूर्ण झाल्यावर सुरू केली जाईल.

### ४०.२ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही

अशा प्रकारे गडी बाद झाल्यास त्याचे श्रेय गोलंदाजास मिळणार नाही.

## कायदा ४१ अनुचित खेळ

### ४१.१ उचित व अनुचित खेळ - कर्णधारांची जबाबदारी

'उद्देशिका - क्रिकेटमधील खिलाडूवृत्ती'मध्ये म्हटल्याप्रमाणे खेळ खिलाडूवृत्तीने आणि कायद्यानुसार खेळला जात आहे, हे पाहण्याची जबाबदारी कर्णधारांची असेल.

### ४१.२ अनुचित कृती

**४१.२.१** खेळ उचित किंवा अनुचित पद्धतीने खेळला जात आहे, हे ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी पंचांचा असेल. जर एखाद्या पंचाच्या मते एखाद्या खेळाडूची, कायद्यात तरतूद नाही अशी कोणतीही कृती, अनुचित असेल, तर तो/ती, आवश्यकता वाटल्यास, दोषी नसलेल्या संघाला असा पुकार केल्यामुळे काही तोटा होणार नाही अशा वेळी, डेड चेंडूचा पुकार आणि इशारा करेल आणि त्याबाबत दुसऱ्या पंचास माहिती देईल.

**४१.२.१.१** हा त्या संघाचा पहिला गुन्हा असल्यास, गोलंदाजाकडील पंच त्यानंतर

- दोषी खेळाडूच्या कर्णधारास बोलावून पहिली आणि शेवटची ताकीद देईल, जी त्या संघाच्या सर्व खेळाडूंना त्या संपूर्ण सामन्यासाठी लागू राहील.
- दोषी खेळाडूच्या कर्णधारास, त्याच्या/तिच्या संघातील कोणत्याही खेळाडूने पुन्हा कधीही अशा प्रकारचा गुन्हा केला तर विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल केल्या जातील, अशी ताकीद देईल.

**४१.२.१.२** जर ही त्या संघाची असा गुन्हा करण्याची दुसरी किंवा त्यानंतरची वेळ असेल, तर गोलंदाजाकडील पंच त्यानंतर

- दोषी खेळाडूच्या कर्णधारास बोलावेल आणि पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा घडला असल्याचे सांगेल.
- विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल.

**४१.२.१.३** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

### ४१.३ सामन्याचा चेंडू - त्याची स्थिती बदलणे

**४१.३.१** पंच वारंवार व अनियमितपणे चेंडूची पाहणी करतील. याशिवाय जर त्यांना, ४१.३.२ मध्ये परवानगी असल्याप्रमाणे सोडून, कोणीही चेंडूची स्थिती बदलण्याचा प्रयत्न करीत आहे असा संशय आला, तर ते त्वरित चेंडूची पाहणी करतील.

**४१.३.२** कोणत्याही खेळाडूने चेंडूची स्थिती बदलेल अशी कोणतीही कृती करणे हा एक गुन्हा आहे.

त्याची/तिची सर्वसाधारण कर्तव्ये सोडून, कोणत्याही फलंदाजाला जाणूनबुजून चेंडू खराब करण्यास परवानगी नाही. कायदा ५.५ (चेंडूला हानी पोहोचणे) सुद्धा पाहा.

मात्र, एखादा क्षेत्ररक्षक

**४१.३.२.१** चेंडू त्याच्या/तिच्या कपड्यांवर घासून लकाकी आणू शकेल. मात्र यासाठी कोणताही कृत्रिम पदार्थ वापरता येणार नाही आणि यासाठी वेळ वाया घालवून चालणार नाही.

**४१.३.२.२** पंचाच्या देखरेखीखाली चेंडूला लागलेला चिखल काढू शकेल.

**४१.३.२.३** पंचांनी मंजूरी दिलेल्या कापडाने ओला चेंडू कोरडा करू शकेल.

**४१.३.३** जर कोणत्याही खेळाडूची कृती ४१.३.२ मधील अटींना धरून नसेल, तर पंच, चेंडूची स्थिती अनुचित प्रकारे बदलली गेली आहे असे मानतील.

**४१.३.४** जर कोणत्याही संघाच्या एखाद्या सदस्याने किंवा सदस्यांनी चेंडूची स्थिती अनुचित प्रकारे बदलली आहे असे पंचांना वाटले, तर ते विरुद्ध संघाच्या कर्णधाराला त्याची/तिची चेंडू बदलण्याची इच्छा आहे का, असे विचारतील. आवश्यकता भासल्यास, फलंदाजी संघाच्या बाबतीत, कर्णधाराऐवजी मैदानावरील नाबाद फलंदाज याविषयी निर्णय घेऊ शकतील.

**४१.३.४.१** चेंडू बदलण्याची विनंती केल्यास, कायद्याचे उल्लंघन होण्याआधी चेंडूची जेवढी झीज झालेली होती, जवळपास तेवढीच झीज झालेला चेंडू पंच निवडतील आणि लगेचच वापरात आणतील.

**४१.३.४.२** खेळण्यासाठी बदली चेंडू निवडला किंवा नाही, तरीही गोलंदाजाकडील पंच,

- विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असल्यास, खेळपट्टीवरील फलंदाजांना आणि क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला, चेंडू बदलल्याचे सांगेल आणि त्यांच्या कृतीचे कारण सांगेल.
- फलंदाजी संघाच्या कर्णधाराला, शक्य तितक्या लवकर, घडलेल्या प्रसंगाची माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.३.५** जर त्या सामन्यामध्ये त्याच संघाने पुन्हा चेंडूची स्थिती अनुचित प्रकारे बदलली आहे याविषयी पंचांचे एकमत झाले, तर ते,

**४१.३.५.१** पुन्हा ४१.३.४.१ आणि ४१.३.४.२ मधील कारवाई करतील.

जर क्षेत्ररक्षण संघाने अशा प्रकारचा गुन्हा पुन्हा केला असेल, तर गोलंदाजाकडील पंच याशिवाय

**४१.३.५.२** क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधारास, त्याआधीचा चेंडू टाकणाऱ्या गोलंदाजाला ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल; त्याला/तिला त्या सामन्यात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

- खेळपट्टीवरील फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला आपल्या कृतीचे कारण सांगेल.
- आवश्यकता असल्यास, ते षटक असा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने आधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नसेल व त्याला त्यापुढील षटकातील कोणताही चेंडू टाकता येणार नाही.

## ४१.४ जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे

**४१.४.१** चेंडू खेळण्याची तयारी करताना किंवा चेंडू खेळताना कोणत्याही क्षेत्ररक्षकाने जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केल्यास ते अनुचित ठरेल.

**४१.४.२** जर एखाद्या क्षेत्ररक्षकाची कोणतीही कृती ही अशा प्रकारचा प्रयत्न आहे असे कोणत्याही पंचाला वाटले, तर तो/ती ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल आणि दुसऱ्या पंचाला त्याचे कारण सांगेल. गोलंदाजाकडील पंच

- फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला, फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला आपल्या कृतीचे कारण सांगेल.

त्या चेंडूवर कोणताही फलंदाज बाद होणार नाही व तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती

यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.५ जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे**

**४१.५.१** ४१.४ व्यतिरिक्त, स्ट्रायकरने चेंडू खेळल्यावर एखाद्या क्षेत्ररक्षकाने, जाणूनबुजून, शब्दाने अथवा कृतीने, कोणत्याही फलंदाजाचे लक्ष विचलित करण्याचा, फसवणूक करण्याचा किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केला तर ते अनुचित ठरेल.

**४१.५.२** अशा प्रकारे लक्ष विचलित केले, फसवणूक केली किंवा अडथळा आणला तर ते जाणूनबुजून केले अथवा नाही हे कोणताही पंच ठरवू शकेल.

**४१.५.३** कोणत्याही पंचाच्या मते, जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने कोणत्याही फलंदाजाचे लक्ष विचलित केले असेल, फसवणूक केली असेल, अडथळा आणला असेल किंवा तसे करण्याचा प्रयत्न केला असेल तर तो/ती ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल आणि दुसऱ्या पंचास त्याचे कारण सांगेल.

**४१.५.४** त्या चेंडूवर कोणताही फलंदाज बाद होणार नाही.

**४१.५.५** जर शारीरिक संपर्काने अडथळा आणला असेल तर कायदा ४२ (खेळाडूंचे वर्तन) अनुसार गुन्हा घडला आहे किंवा नाही हे दोन्ही पंच मिळून ठरवतील.

**४१.५.५.१** जर कायदा ४२ (खेळाडूंचे वर्तन) नुसार गुन्हा घडला असेल तर पंच कायदा ४२ प्रमाणे संबंधित कारवाई करतील आणि ४१.५.७ ते ४१.५.९ मधील प्रत्येक कृती सुद्धा करतील.

**४१.५.५.२** जर कायदा ४२ (खेळाडूंचे वर्तन) नुसार गुन्हा घडला नाही असे पंचांचे मत असेल, तर पंच ४१.५.६ ते ४१.५.१० मधील प्रत्येक कृती करतील.

**४१.५.६** गोलंदाजाकडील पंच

- फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला ह्या कृतीचे कारण सांगेल आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला याविषयी माहिती देईल.

**४१.५.७** चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

**४१.५.८** गुन्हा घडण्याच्या आधी फलंदाजांनी पूर्ण केलेल्या धावा जमा होतील, तसेच, कोणत्याही संघाला बहाल केलेल्या दंड धावाही मिळतील. याशिवाय गुन्हा घडला त्यावेळी फलंदाजांनी एकमेकांना ओलांडले असले किंवा नसले तरी, चालू असलेली धावही जमा होईल.

**४१.५.९** खेळपट्टीवरील फलंदाज पुढचा चेंडू त्यांच्यापैकी कोणी खेळायचा याचा निर्णय घेतील.

**४१.५.१०** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४१.६ आखूड टप्प्याचे धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे

**४१.६.१** जर, गोलंदाजाकडील पंचाच्या मते, चेंडूचा वेग, टप्पा, उंची आणि दिशा याचा विचार करता, स्ट्रायकरला शारीरिक दुखापत होण्याची शक्यता असेल तर, आखूड टप्प्याचे चेंडू टाकणे धोकादायक मानले जाईल. यासाठी फलंदाजाचे कौशल्य विचारात घेतले जाईल. मात्र, स्ट्रायकरने संरक्षक उपकरणे घातली आहेत, याचा विचार केला जाणार नाही.

**४१.६.२** आखूड टप्प्याची गोलंदाजी ४१.६.१ प्रमाणे धोकादायक नसली, तरी स्ट्रायकर त्याच्या क्रीझमध्ये सरळ उभा असताना जर चेंडू सातत्याने त्याच्या डोक्याच्या उंचीच्या वरून जात असतील, तर गोलंदाजाकडील पंच अशी गोलंदाजी अनुचित ठरवू शकेल. कायदा २१.१० (चेंडू टप्पा पडून स्ट्रायकरच्या डोक्याच्या वरून जाणे) सुद्धा पाहा.

**४१.६.३** एकदा पंचाने आखूड टप्प्याची गोलंदाजी ४१.६.१ प्रमाणे धोकादायक होत आहे किंवा ४१.६.२ प्रमाणे अनुचित होत आहे असे ठरवले की तो/ती नोबॉलचा पुकार व इशारा करेल. चेंडू डेड झाल्यावर पंच गोलंदाजास पहिली आणि शेवटची ताकीद देईल आणि घडलेल्या प्रसंगाविषयी दुसरा पंच, क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार आणि फलंदाज यांना माहिती देईल.

ही ताकीद त्या गोलंदाजासाठी त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.

**४१.६.४** जर त्या डावात त्याच गोलंदाजाने पुन्हा अशा प्रकारचा चेंडू टाकला, तर पंच

- नोबॉलचा पुकार व इशारा करेल.
- चेंडू डेड झाल्यावर क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला त्या गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल.
- दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.

अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

- पंच, घडलेल्या घटनेबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.६.५** ४१.६.३ आणि ४१.६.४ मधील ताकीद देण्याचा क्रम आणि ४१.७ मधील ताकीद आणि कृतीचा क्रम यांचा एकमेकांशी संबंध नाही.

## ४१.७ टप्पा न पाडता धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे

**४१.७.१** गोलंदाजाने टाकलेला कोणताही चेंडू टप्पा न पडता जर पॉपिंग क्रीझवर सरळ उभ्या असलेल्या स्ट्रायकरच्या कमरेच्या उंचीच्या वरून गेला किंवा वरून जाण्याची शक्यता असेल, तर असा चेंडू अनुचित ठरेल. जर गोलंदाजाने अशा प्रकारचा चेंडू टाकला, तर पंच नोबॉलचा पुकार व इशारा करेल.

**४१.७.२** गोलंदाजाने, ४१.७.१ मधील व्याख्येप्रमाणे टाकलेल्या चेंडूमुळे, स्ट्रायकरला शारीरिक दुखापत होण्याची शक्यता आहे असे गोलंदाजाकडील पंचाला वाटले, तर असा चेंडू धोकादायक सुद्धा समजला जाईल. हा निर्णय करताना पंच:

- स्ट्रायकरने घातलेले कोणतेही संरक्षक उपकरण विचारात घेणार नाही
- पुढील गोष्टींकडे लक्ष देईल
  - चेंडूचा वेग, उंची आणि दिशा
  - स्ट्रायकरचे कौशल्य
  - अशा प्रकारच्या चेंडूची पुनरावृत्ती

**४१.७.३** जर पंचाच्या मते, अशा प्रकारचा टप्पा न पडलेला एक चेंडू किंवा अशा प्रकारच्या चेंडूंची मालिका, ४१.७.२ अनुसार धोकादायक असेल, तर, चेंडू डेड झाल्यावर पंच पुन्हा स्कोअरर्सना नोबॉलचा इशारा करेल आणि गोलंदाजाला पहिली आणि शेवटची ताकीद देईल. त्यानंतर पंच दुसऱ्या पंचाला, क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला आणि फलंदाजांना घडलेल्या घटनेविषयी माहिती देईल. ही ताकीद त्या गोलंदाजासाठी त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.

**४१.७.४** जर त्या गोलंदाजाने त्याच डावात पुन्हा अशा प्रकारचा धोकादायक चेंडू टाकला, तर पंच

- नोबॉलचा पुकार व इशारा करेल
- चेंडू डेड झाल्यावर क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला त्या गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल
- दुसऱ्या पंचाला आपल्या कृतीचे कारण सांगेल.

अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

याशिवाय, पंच

- घडलेल्या गोष्टीबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.७.५** ४१.७.३ आणि ४१.७.४ मधील ताकीद आणि कृतीचा क्रम आणि ४१.६ मधील ताकीद आणि कृतीचा क्रम यांचा एकमेकांशी संबंध नाही.

**४१.७.६** जर एखाद्या गोलंदाजाने, ४१.७.१ मधील व्याख्येप्रमाणे, टप्पा न पडता केलेली गोलंदाजी, जाणूनबुजून केली आहे असे पंचाला वाटले, तर ४१.७.३ प्रमाणे ताकीद न देता पंच

- ताबडतोब नोबॉलचा पुकार व इशारा करेल.
- चेंडू डेड झाल्यावर क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल आणि दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.

अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

- घडलेल्या गोष्टीबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४१.८ जाणूनबुजून पुढच्या पायाने नोबॉल टाकणे

जर गोलंदाजाने जाणूनबुजून पुढच्या पायाने नोबॉल टाकला आहे असे पंचाला वाटले, तर तो/ती

- ताबडतोब नोबॉलचा पुकार व इशारा करेल.
- चेंडू डेड झाल्यावर क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल.
- दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.

अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

- घडलेल्या गोष्टीबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४१.९ क्षेत्ररक्षण संघाने वेळ वाया घालवणे

**४१.९.१** कोणत्याही क्षेत्ररक्षकाने वेळ वाया घालवणे अनुचित आहे.

**४१.९.२** जर एखादे षटक काहीही कारण नसताना धीम्या गतीने टाकले जात आहे, किंवा क्षेत्ररक्षण संघाचा कर्णधार, किंवा इतर कोणताही क्षेत्ररक्षक, इतर कोणत्याही प्रकारे वेळ वाया घालवत आहेत असे कोणत्याही पंचाला वाटले, तर पहिल्या वेळी संबंधित पंच

- चेंडू खेळीत असल्यास, डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.
- दुसऱ्या पंचाला काय घडले याविषयी माहिती देईल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला पहिली आणि शेवटची ताकीद देईल.
- फलंदाजांना काय घडले याविषयी माहिती देईल.

**४१.९.३** जर त्याच डावात पुन्हा कोणताही क्षेत्ररक्षक वेळ वाया घालवत आहे असे कोणत्याही पंचाला वाटले, तर संबंधित पंच

- चेंडू खेळीत असल्यास, डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.
- दुसऱ्या पंचाला काय घडले याविषयी माहिती देईल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

जर, षटक चालू नसताना वेळ वाया घालवला गेला असेल, तर फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल आणि क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला या कृतीचे कारण सांगेल.

किंवा, षटक चालू असताना वेळ घालवला गेला असेल, तर क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल.

अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.

लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

याशिवाय पंच, घडलेल्या घटनेबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

### ४१.१० फलंदाजांनी वेळ वाया घालवणे

**४१.१०.१** एखाद्या फलंदाजाने वेळ वाया घालवणे अनुचित आहे. सर्वसाधारणपणे गोलंदाज जेव्हा त्याचा/तिचा गोलंदाजीचा रन-अप घेण्यासाठी तयार असेल, तेव्हा स्ट्रायकरने चेंडू खेळण्यासाठी तयार असायला हवे.

**४१.१०.२** ही अट पूर्ण न करता किंवा इतर कोणत्याही प्रकारे जर कोणत्याही फलंदाजाने वेळ वाया घालवला, तर पुढील प्रमाणे कारवाई केली जाईल. पहिल्या प्रसंगी, गोलंदाजाने त्याचा/तिचा रन-अप सुरू करण्याआधी किंवा चेंडू डेड झाल्यावर, योग्य त्या वेळी, पंच

- फलंदाजांना पहिली आणि शेवटची ताकीद देतील. ही ताकीद संपूर्ण डावासाठी लागू राहील. पंच येणाऱ्या प्रत्येक फलंदाजास याची माहिती देईल.
- दुसऱ्या पंचाला काय घडले याविषयी माहिती देईल.
- घडलेल्या घटनेबद्दल क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधारास व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधारास माहिती देईल.

**४१.१०.३** जर त्याच डावात त्यानंतर कोणत्याही फलंदाजाने पुन्हा वेळ घालवला, तर पंच, चेंडू डेड असताना, योग्य त्या वेळी

- क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.
- दुसऱ्या फलंदाजाला, क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला काय घडले याविषयी माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.११ संरक्षित क्षेत्र**

संरक्षित क्षेत्र म्हणजे खेळपट्टीवरील असे आयताकृती क्षेत्र ज्याच्या दोन्ही टोकाला पॉपिंग क्रीझला समांतर अशी काल्पनिक रेषा आहे, जी दोन्ही पॉपिंग क्रीझपासून प्रत्येकी ५ फुट/१.५२ मी. पुढे आहे आणि दोन्ही बाजूंना प्रत्येकी एक काल्पनिक रेषा आहे, जी दोन्ही बाजूच्या मधल्या यष्टींच्या केंद्रबिंदूला जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या दोन्ही बाजूला १ फूट/३०.४८ से.मी. अंतरावर आणि एकमेकाला समांतर आहे.

**४१.१२ क्षेत्ररक्षकाने खेळपट्टी खराब करणे**

**४१.१२.१** खेळपट्टी जाणूनबुजून किंवा टाळता येण्यासारखे असताना खराब करणे अनुचित आहे. एखादा क्षेत्ररक्षक वाजवी कारण नसताना खेळपट्टीवर आला आहे, असे कोणत्याही पंचाला वाटले, तर तो/ती टाळता येण्यासारखे असताना खेळपट्टी खराब करत आहे, असे मानले जाईल.

**४१.१२.२** ४१.१३.१ प्रमाणे सोडून, एखाद्या क्षेत्ररक्षकाने टाळता येण्यासारखे असताना खेळपट्टी खराब केली, तर पहिल्या प्रसंगी, ज्या पंचाने हे पहिले असेल तो/ती पंच, चेंडू डेड झाल्यावर दुसऱ्या पंचाला याविषयी माहिती देईल. गोलंदाजाकडील पंच त्यानंतर

- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला पहिली आणि शेवटची ताकीद देईल. ही ताकीद त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.
- फलंदाजांना काय घडले याविषयी माहिती देईल.

**४१.१२.३** जर त्या डावात कोणत्याही क्षेत्ररक्षकाने पुन्हा कधीही, टाळता येण्यासारखे असताना खेळपट्टी खराब केली, तर, ज्या पंचाने हे पाहिले असेल तो/ती पंच, चेंडू डेड झाल्यावर, त्याविषयी दुसऱ्या पंचाला माहिती देईल. गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- लागू असल्यास, स्कोअररला नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.
- फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल करेल.

- लागू असलेल्या इतर प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला या कृतीचे कारण सांगेल.
- दोन्ही फलंदाजांना व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला काय घडले याविषयी माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.१३ गोलंदाजाने संरक्षित क्षेत्रावर धावणे**

**४१.१३.१** चेंडू टाकला किंवा नाही तरी, गोलंदाजाने त्याच्या/तिच्या फॉलो-थ्रू मध्ये वाजवी कारणाशिवाय संरक्षित क्षेत्रात प्रवेश करणे अनुचित ठरेल.

**४१.१३.२** जर गोलंदाजाने या कायद्याचे उल्लंघन केले, तर पहिल्या प्रसंगी, चेंडू डेड झाल्यावर पंच,

- गोलंदाजाला पहिली ताकीद देईल आणि काय घडले याविषयी दुसऱ्या पंचास माहिती देईल. ही ताकीद त्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व फलंदाजांना काय घडले याविषयी माहिती देईल.

**४१.१३.३** जर त्या डावात त्याच गोलंदाजाने पुन्हा या कायद्याचे उल्लंघन केले, तर पंच वरील प्रक्रिया पुन्हा करेल व ही शेवटची ताकीद असल्याचे सांगेल. ही ताकीद सुद्धा त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील.

**४१.१३.४** जर, त्या डावात त्याच गोलंदाजाने तिसऱ्या वेळी या कायद्याचे उल्लंघन केले, तर चेंडू डेड झाल्यावर पंच,

- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला गोलंदाजास ताबडतोब निलंबित करण्यास सांगेल. लागू असल्यास, ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीच्या षटकातील कोणताही चेंडू टाकलेला नाही व ज्याला पुढील षटकातील कोणताही चेंडू टाकण्याची परवानगी मिळणार नाही. अशा प्रकारे निलंबित झालेल्या गोलंदाजास त्या संपूर्ण डावात पुन्हा गोलंदाजी करण्यास मनाई असेल.
- दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.
- घडलेल्या गोष्टीबद्दल फलंदाजांना आणि शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला माहिती देईल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती

यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.१४ फलंदाजाने खेळपट्टी खराब करणे**

**४१.१४.१** खेळपट्टी जाणूनबुजून किंवा टाळता येण्यासारखे असताना खराब करणे अनुचित आहे. जर स्ट्रायकरने चेंडू खेळताना किंवा चेंडू खेळण्याचा प्रयत्न करताना संरक्षित क्षेत्रात प्रवेश केला, तर त्यानंतर लगेचच त्याने/तिने तेथून बाहेर जायला हवे. एखादा फलंदाज वाजवी कारण नसताना खेळपट्टीवर आला आहे, असे कोणत्याही पंचाला वाटले, तर तो/ती टाळता येण्यासारखे असताना खेळपट्टी खराब करत आहे, असे मानण्यात येईल.

**४१.१४.२** जर कोणत्याही फलंदाजाने, ४१.१५ प्रमाणे सोडून, खेळपट्टी जाणूनबुजून किंवा टाळता येण्यासारखे असताना खराब केली, तर पहिल्या प्रसंगी, ज्या पंचाने हे पाहिले असेल तो/ती पंच चेंडू डेड झाल्यावर दुसऱ्या पंचाला काय घडले याविषयी माहिती देईल. गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- फलंदाजांना असे करणे अनुचित असल्याचे सांगेल व त्यांना पहिली आणि शेवटची ताकीद देईल. ही ताकीद त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील. पंच येणाऱ्या प्रत्येक नवीन फलंदाजास याची माहिती देईल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधारास व शक्य तेवढ्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधारास घडलेल्या घटनेबद्दल माहिती देईल.

**४१.१४.३** जर त्याच डावात त्यानंतर कोणत्याही फलंदाजाने पुन्हा कधीही टाळता येण्यासारखे असताना खेळपट्टी खराब केली, तर ज्या पंचाने हे पाहिले असेल तो/ती पंच चेंडू डेड झाल्यावर दुसऱ्या पंचाला काय घडले याविषयी माहिती देईल.

गोलंदाजाकडील पंच,

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- लागू असल्यास, स्कोअरर्सना नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.
- क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असल्यास, कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला या कृतीचे कारण सांगेल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती

यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.१५ स्ट्रायकर संरक्षित क्षेत्रात आला**

**४१.१५.१** स्ट्रायकर चेंडू खेळण्यासाठी पवित्रा घेताना संरक्षित क्षेत्रात उभा राहणार नाही किंवा त्याच्या अगदी जवळ अशा प्रकारे उभा राहणार नाही, की ज्यामुळे संरक्षित क्षेत्रात वारंवार अतिक्रमण करणे अपरिहार्य ठरेल.

स्ट्रायकर त्याच्या गार्डची खूण खेळपट्टीवर करू शकेल, मात्र, अशी खूण संरक्षित क्षेत्राच्या फार जवळ असू नये.

**४१.१५.२** जर स्ट्रायकरकडून ४१.१५.१ मधील कोणत्याही अटीचा भंग झाला तर, ज्या पंचाने हे पाहिले असेल, तो/ती पंच, गोलंदाज जर त्याच्या/तिच्या गोलंदाजीच्या शेवटच्या झेपेत आला/आली नसेल, तर ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल, नाहीतर, तो/ती चेंडू डेड होईपर्यंत थांबेल व त्यानंतर दुसऱ्या पंचाला घडलेल्या घटनेबद्दल माहिती देईल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- असे करणे हे अनुचित असल्याचे स्ट्रायकरला सांगेल आणि त्याला पहिली आणि शेवटची ताकीद देईल. अशी ताकीद त्या संपूर्ण डावासाठी लागू राहील. पंच याची माहिती नॉन-स्ट्रायकरला व येणाऱ्या प्रत्येक फलंदाजाला देईल.
- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला घडलेल्या घटनेबद्दल माहिती देईल.

**४१.१५.३** जर त्यानंतर त्याच डावात कोणत्याही फलंदाजाकडून पुन्हा कधीही ४१.१५.१ मधील कोणत्याही अटीचा भंग झाला, तर ज्या पंचाने हे पाहिले असेल, तो/ती पंच, गोलंदाज जर त्याच्या/तिच्या गोलंदाजीच्या शेवटच्या झेपेत आला/आली नसेल, तर ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल, नाहीतर, तो/ती चेंडू डेड होईपर्यंत थांबेल व त्यानंतर दुसऱ्या पंचाला घडलेल्या घटनेबद्दल माहिती देईल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- फलंदाजी संघाच्या सर्व धावा रद्द करेल.
- नाबाद फलंदाजास त्याच्या/तिच्या मूळ जागी परत पाठवेल.
- लागू असल्यास, स्कोअरर्सना नोबॉल किंवा वाईड चेंडूचा इशारा करेल.
- क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असल्यास, कायदा२८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.

- क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला या कृतीचे कारण सांगेल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

### ४१.१६ नॉन-स्ट्रायकरने त्याचे/तिचे क्रीझ लवकर सोडणे

**४१.१६.१** चेंडू खेळीत आल्यापासून, सर्वसाधारणपणे ज्यावेळी चेंडू गोलंदाजाच्या हातातून सुटण्याची अपेक्षा असते त्या वेळेपर्यंत कधीही, जर नॉन-स्ट्रायकर त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असेल, तर तो/ती धावचीत होऊ शकेल. या परिस्थितीत, नॉन-स्ट्रायकर त्याच्या/तिच्या क्रीझच्या बाहेर असताना, गोलंदाजाने चेंडू फेकून किंवा चेंडू हातात पकडून त्या बाजूच्या यष्टी पाडल्या, तर नॉन-स्ट्रायकर धावचीत होईल. त्यानंतर चेंडू टाकला गेला किंवा नाही, तरीही हे लागू होईल.

**४१.१६.२** जर चेंडू टाकला गेला नाही आणि अपील झाले, तर

- धावचीत आहे किंवा नाही याविषयी पंच त्याचा/तिचा निर्णय देईल. जर तो नाबाद असेल, तर तो/ती शक्य तितक्या लवकर डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.
- तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

**४१.१६.३** जर चेंडू टाकला आणि त्यानंतर अपील झाले, तर

- धावचीत आहे किंवा नाही याविषयी पंच त्याचा/तिचा निर्णय देईल.
- नॉन-स्ट्रायकर बाद झाला नाही, तर चेंडू खेळीत राहील आणि कायदा २१.६ (चेंडू टाकताना गोलंदाजामुळे यष्टी पडणे) लागू होईल.
- जरी नॉन-स्ट्रायकर बाद झाला, तरी तो चेंडू षटकातील एक म्हणून मोजला जाणार नाही.

### ४१.१७ फलंदाजांनी धाव चोरणे

गोलंदाजाचा रन-अप चालू असताना फलंदाजांनी धाव चोरण्याचा प्रयत्न करणे अनुचित आहे. जर गोलंदाजाने कोणत्याही फलंदाजाला धावचीत करण्याचा प्रयत्न केला नाही - ४१.१६ आणि कायदा २१.४ (गोलंदाजाने चेंडू टाकण्याआधी तो स्ट्रायकरकडील बाजूस फेकला) पाहा - तर पंच

- अशा प्रयत्नात फलंदाजांनी एकमेकांना ओलांडल्यावर ताबडतोब डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल.
- दुसऱ्या पंचाला या कृतीचे कारण सांगेल.

गोलंदाजाकडील पंच त्यानंतर,

- दोन्ही फलंदाजांना त्यांच्या मूळ जागी पाठवेल.
- क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल करेल.
- लागू असल्यास, कायदा २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) प्रमाणे सोडून इतर कोणत्याही प्रकारच्या ५ दंड धावा बहाल करेल.
- फलंदाजांना, क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराला व शक्य तितक्या लवकर फलंदाजी संघाच्या कर्णधाराला या कृतीचे कारण सांगेल.

सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

**४१.१८ दंड धावा**

**४१.१८.१** जेव्हा कोणत्याही संघाला दंड धावा बहाल केल्या जातील, तेव्हा चेंडू डेड झाल्यावर पंच स्कोअरर्सना दंड धावांचा इशारा करेल. कायदा २.१३ (इशारे) पाहा.

**४१.१८.२** जरी निकाल आधीच लागला असला, तरी कायद्यानुसार जेव्हा दंड धावा बहाल करण्याचा प्रसंग येईल, त्या प्रत्येक प्रसंगी त्या बहाल केल्या जातील. कायदा १६.६ (विजयाचा फटका अथवा अवांतर धावा) पाहा.

तथापि, कायदे २३.३ (लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत), २५.७ (स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने), २८.३ (क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स) आणि ३४.४ (कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारल्यास मिळणाऱ्या धावा) मधील दंड धावा बहाल करण्यावरील निर्बंध लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

**४१.१८.३** जेव्हा फलंदाजी संघाला ५ दंड धावा बहाल केल्या जातील, तेव्हा,

- त्या अवांतर दंड धावा म्हणून जमा होतील आणि इतर कोणत्याही दंड धावांव्यतिरिक्त असतील.
- त्या चेंडू डेड झाल्यावर बहाल केल्या जातील व त्या धावा त्याच्या आधीच्या किंवा नंतरच्या चेंडूपासून मिळाल्या असे न मानता, या चेंडूंपासून मिळालेल्या धावांव्यतिरिक्त असतील.
- केवळ ५ दंड धावा मिळाल्या या कारणासाठी फलंदाज त्यांची बाजू बदलणार नाहीत.

**४१.१८.४** जेव्हा क्षेत्ररक्षण संघाला ५ दंड धावा बहाल केल्या जातील, तेव्हा त्या, त्या संघाच्या नुकत्याच पूर्ण झालेल्या डावाच्या धावसंख्येत अवांतर दंड धावा म्हणून जमा होतील. मात्र जर क्षेत्ररक्षण संघाचा एकही डाव पूर्ण झालेला नसेल, तर त्या ५ दंड धावा त्यांच्या पुढच्या डावाच्या धावसंख्येत जमा होतील.

## कायदा ४२ खेळाडूंचे वर्तन

### ४२.१ आक्षेपार्ह वर्तन

**४२.१.१** कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह वर्तनावर पंच कारवाई करतील. गुन्ह्याचे ४ स्तर व त्यासंबंधी पंचांनी करावयाची कृती खालील ४२.२ ते ४२.५ मध्ये स्तर १, स्तर २, स्तर ३ व स्तर ४ चे गुन्हे म्हणून ओळखले जातील.

**४२.१.२** जर सामन्यादरम्यान कधीही एखाद्या खेळाडूचे वर्तन हे आक्षेपार्ह आहे असे कोणत्याही पंचाला वाटले, तर संबंधित पंच डेड चेंडूचा पुकार व इशारा करेल. असा पुकार केल्यामुळे गुन्हा न करणाऱ्या संघाला काही तोटा होणार नाही याबद्दल समाधान होईपर्यंत पंच असा पुकार करण्यास विलंब करेल.

**४२.१.३** संबंधित पंच याबद्दल दुसऱ्या पंचाला कळवेल आणि दोघे मिळून गैरवर्तन घडले आहे का ते ठरवतील. जर त्यांनी तसे ठरवले तर असे वर्तन, खालील ४२.२ ते ४२.५ प्रमाणे, कोणत्या स्तरातील आहे हे निश्चित करतील आणि त्यानुसार कारवाई करतील.

**४२.१.४** खालील १ ते ४ मधील प्रत्येक स्तरासाठी, गुन्हा फलंदाजाने केला असल्यास, पंच दोषी खेळाडूच्या कर्णधाराला मैदानावर बोलावतील. फक्त या कायद्यापुरते, खेळपट्टीवरील फलंदाजांना त्यांच्या कर्णधाराचे प्रतिनिधित्व करता येणार नाही.

**४२.१.५** १ ते ४ मधील प्रत्येक स्तरासाठी

- कायदा ११ (मध्यंतरे) आणि कायदा२.८ (धोकादायक किंवा प्रतिकूल परिस्थितीत खेळ थांबवणे) सोडून 'टाईम'च्या पुकारापासून ते 'प्ले'च्या पुकारापर्यंतचा खेळाचा कालावधी हा वाया गेलेला कालावधी म्हणून मोजला जाईल.
- त्या दिवशीची खेळ संपण्याची वेळ तेवढ्या कालावधीने पुढे ढकलण्यात येईल.
- लागू असल्यास, केवळ वाया गेलेल्या या कालावधीमुळे सामन्याच्या शेवटच्या तासातील षटके कमी केली जाणार नाहीत.

### ४२.२ पहिल्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती

**४२.२.१** एखाद्या खेळाडूने खालीलपैकी कोणतीही कृती केल्यास तो पहिल्या स्तराचा गुन्हा मानला जाईल.

- क्रिकेटच्या मैदानाचा कोणताही भाग किंवा सामन्यामध्ये वापरण्यात येणारी उपकरणे अथवा इतर वस्तू यांचा जाणूनबुजून अवमान करणे किंवा गैरवापर करणे
- शब्दाने किंवा कृतीने पंचाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करणे
- त्या परिस्थितीत, अश्लील, आक्षेपार्ह किंवा अपमानकारक वाटेल अशी भाषा वापरणे
- अश्लील हावभाव करणे

- आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात अपील करणे
- अपील करत आक्रमकरित्या पंचाच्या दिशेने पुढे येणे
- इतर कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन जे पंचांच्या मते पहिल्या स्तराच्या गुन्ह्यासमान आहे.

**४२.२.२** जर अशा प्रकारचा गुन्हा केला गेला, तर, तो कोणत्याही स्तरातील पहिला गुन्हा आहे किंवा नाही, त्याप्रमाणे ४२.२.२.१ ते ४२.२.२.६ मधील योग्य त्या कलमांची अंमलबजावणी केली जाईल.

**४२.२.२.१** गरज असल्यास, पंच 'टाईम'चा पुकार करेल.

**४२.२.२.२** दोन्ही पंच मिळून दोषी खेळाडूच्या कर्णधाराला बोलावतील व त्याला या स्तराचा गुन्हा घडला असल्याची माहिती देतील.

**४२.२.२.३** जर हा पहिल्या स्तराचा गुन्हा त्या संघाचा कोणत्याही स्तरातील पहिला गुन्हा असेल, तर पंच,

**४२.२.२.३.१** पहिली आणि शेवटची ताकीद देईल, जी त्या संघातील सर्व सदस्यांसाठी उर्वरित सामन्यासाठी लागू राहील.

**४२.२.२.३.२** त्याच्या/तिच्या संघातील कोणत्याही सदस्याने जर पुन्हा पहिल्या स्तराचा गुन्हा केला, तर विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करण्यात येतील, अशी गुन्हा करणाऱ्या खेळाडूच्या कर्णधाराला ताकीद देईल.

**४२.२.२.४** जर पहिल्या स्तराच्या गुन्ह्यानंतर त्या संघाने पुन्हा कोणत्याही स्तराचा गुन्हा केला, तर पंच विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल.

**४२.२.२.५** शक्य तितक्या लवकर पंच 'प्ले'चा पुकार करेल.

**४२.२.२.६** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४२.३ दुसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती

**४२.३.१** एखाद्या खेळाडूने खालीलपैकी कोणतीही कृती केल्यास तो दुसऱ्या स्तराचा गुन्हा मानला जाईल.

- शब्दाने किंवा कृतीने पंचाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करणे
- दुसऱ्या एखाद्या खेळाडूला चुकीच्या पद्धतीने व जाणूनबुजून स्पर्श करणे

- एखाद्या खेळाडूच्या, पंचाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या दिशेने चुकीच्या पद्धतीने आणि धोकादायक रित्या चेंडू फेकणे
- दुसऱ्या खेळाडूला, पंचाला, संघाच्या अधिकाऱ्याला किंवा प्रेक्षकाला उद्देशून अशी भाषा वापरणे किंवा असे हावभाव करणे, जे त्या परिस्थितीत अश्लील असतील किंवा अतिशय अपमानास्पद असतील
- किंवा इतर कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, जे पंचांच्या मते दुसऱ्या स्तराच्या गुन्ह्यासमान आहे.

**४२.३.२** जर अशा प्रकारचा गुन्हा केला, तर ४२.३.२.१ ते ४२.३.२.६ ची अंमलबजावणी केली जाईल.

**४२.३.२.१** गरज असल्यास, पंच 'टाईम'चा पुकार करेल.

**४२.३.२.२** दोन्ही पंच मिळून खेळाडूच्या कर्णधाराला बोलावतील व त्याला या स्तराचा गुन्हा घडला असल्याची माहिती देतील.

**४२.३.२.३** पंच विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल.

**४२.३.२.४** पंच, दोषी खेळाडूच्या कर्णधाराला अशी ताकीद देईल की, जर त्याच्या/तिच्या संघातील कोणत्याही सदस्याने पुन्हा पहिल्या स्तराचा गुन्हा केला, तर विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करण्यात येतील.

**४२.३.२.५** शक्य तितक्या लवकर पंच 'प्ले'चा पुकार करेल.

**४२.३.२.६** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४२.४ तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती

**४२.४.१** एखाद्या खेळाडूने खालीलपैकी कोणतीही कृती केल्यास तो तिसऱ्या स्तराचा गुन्हा मानला जाईल.

- शब्दाने किंवा हावभावाने पंचांच्या मनात दहशत निर्माण करणे.
- पंच सोडून, एखाद्या खेळाडूला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला मारहाण करण्याची धमकी देणे. ४२.५.१ पाहा.

**४२.४.२** जर अशा प्रकारचा गुन्हा केला, तर ४२.४.२.१ ते ४२.४.२.८ ची अंमलबजावणी केली जाईल.

**४२.४.२.१** गरज असल्यास, पंच ‘टाईम’चा पुकार करेल.

**४२.४.२.२** दोन्ही पंच मिळून खेळाडूच्या कर्णधाराला बोलावतील व त्याला या स्तराचा गुन्हा घडला असल्याची माहिती देतील.

**४२.४.२.३** पंच कर्णधाराला, दोषी खेळाडूला ताबडतोब मैदानातून बाहेर काढण्यास सांगतील. त्याच्या निलंबनाचा कालावधी पुढीलप्रमाणे ठरवला जाईल:

**४२.४.२.३.१** डावातील षटकांवर मर्यादा नसलेल्या सामन्यात त्या खेळाडूला १० षटकांसाठी निलंबित करण्यात येईल. निलंबनाच्या वेळी चालू असलेल्या षटकातील काही चेंडू शिल्लक असतील, तर ते खेळाडूच्या निलंबनाच्या षटकांमध्ये मोजले जाणार नाहीत.

**४२.४.२.३.२** डावातील षटकांवर मर्यादा असलेल्या सामन्यात, त्या खेळाडूला, चालू डावाच्या सुरूवातीला ठरलेल्या षटकांच्या एक पंचमांश षटकांसाठी निलंबित करण्यात येईल. जर निलंबनासाठीच्या षटकांची आकडेमोड करताना, उत्तरादाखल अपूर्ण षटक येत असेल, तर ते षटक पूर्ण धरण्यात येईल. निलंबनाच्या वेळी चालू असलेल्या षटकातील काही चेंडू शिल्लक असतील तर ते खेळाडूच्या निलंबनाच्या षटकांमध्ये मोजले जाणार नाहीत.

**४२.४.२.३.३** जर खेळाडू हा क्षेत्ररक्षक असेल तर त्याच्यासाठी/तिच्यासाठी बदली खेळाडू देण्यात येणार नाही. गुन्हा करणारा खेळाडू त्याच्या/तिच्या निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यावर लगेच मैदानावर येऊ शकेल व त्याला/तिला ताबडतोब गोलंदाजी करता येईल.

**४२.४.२.३.४** एखाद्या गोलंदाजास षटक चालू असताना निलंबित केले असेल तर ते षटक दुसरा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीचे षटक टाकले नसेल व ज्याला पुढील षटक टाकता येणार नाही.

**४२.४.२.३.५** जर दोषी खेळाडू हा नाबाद फलंदाज असेल तर त्याची/तिची जागा त्याच्या/तिच्या संघाचा दुसरा सदस्य घेईल. दोषी खेळाडू त्याच्या/तिच्या निलंबनाचा कालावधी पूर्ण झाला की, गडी बाद झाल्यावर, फलंदाजी करण्यासाठी परत येऊ शकेल. फलंदाजाच्या निलंबनाच्या कालावधीत जर कोणताही फलंदाज फलंदाजीसाठी यायला उपलब्ध नसेल तर तो डाव पूर्ण होईल. जर खेळाडूने कोणत्याही कारणामुळे त्याचा/तिचा डाव पुन्हा

सुरू केला नाही तर त्याच्या डावाची नोंद ‘निवृत्त - नाबाद’ अशी केली जाईल.

**४२.४.२.३.६** जर दोषी खेळाडू हा फलंदाजी संघाचा बाद झालेला सदस्य असेल, तर त्याच्या निलंबनाच्या कालावधीची सुरुवात पुढील डाव सुरू होईपर्यंत होणार नाही. याशिवाय, या परिस्थितीत, खेळाडू ज्या डावात निलंबित झाला असेल, त्या डावात तो/ती रनर म्हणूनही काम करू शकणार नाही.

**४२.४.२.३.७** त्याच्या/तिच्या संघातील कोणत्याही सदस्याने जर पुन्हा पहिल्या स्तराचा गुन्हा केला, तर विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करण्यात येतील, अशी खेळाडूच्या कर्णधाराला पंच ताकीद देईल.

**४२.४.२.३.८** निलंबनाच्या कालावधीतील शिल्लक राहीलेली षटके सामन्याच्या पुढील डावांत ढकलली जातील. डावाच्या शेवटी अपूर्ण राहिलेले षटक खेळाडूच्या निलंबनाच्या षटकांमध्ये मोजले जाणार नाही.

**४२.४.२.४** योग्य असेल, तेव्हा, पंच

- विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल
- स्कोअररला तिसऱ्या स्तराच्या दंडाचा इशारा करेल
- 'प्ले'चा पुकार करेल.

**४२.४.२.५** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४२.५ चौथ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती

**४२.५.१** एखाद्या खेळाडूने खालीलपैकी कोणतीही कृती केल्यास तो चौथ्या स्तराचा गुन्हा मानला जाईल.

- एखाद्या पंचाला मारहाण करण्याची धमकी देणे
- एखाद्या पंचाला चुकीच्या पद्धतीने व जाणूनबुजून स्पर्श करणे
- एखाद्या खेळाडूला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला बेदम मारहाण करणे
- इतर कोणत्याही प्रकारचे हिंसक कृत्य करणे.

**४२.५.२** जर अशा प्रकारचा गुन्हा केला, तर ४२.५.२.१ ते ४२.५.२.५ ची अंमलबजावणी केली जाईल.

**४२.५.२.१** गरज असल्यास, पंच 'टाईम'चा पुकार करेल.

**४२.५.२.२** दोन्ही पंच मिळून दोषी खेळाडूच्या कर्णधाराला बोलावतील व त्याला या स्तराचा गुन्हा घडला असल्याची माहिती देतील.

**४२.५.२.३** पंच कर्णधाराला, दोषी खेळाडूला उर्वरित सामन्यासाठी ताबडतोब मैदानाबाहेर काढण्यास सांगतील आणि खालील गोष्टींची अंमलबजावणी करतील.

**४२.५.२.३.१** जर दोषी खेळाडू क्षेत्ररक्षक असेल तर त्याच्यासाठी/तिच्यासाठी बदली खेळाडू देण्यात येणार नाही. त्याच्या/तिच्या संघाची फलंदाजी असणाऱ्या पुढील कोणत्याही डावाच्या सुरूवातीला, त्याच्या/तिच्या डावाची नोंद निवृत्त - बाद अशी करण्यात येईल.

**४२.५.२.३.२** जर एखाद्या गोलंदाजास षटक चालू असताना निलंबित केले, तर ते षटक असा एखादा गोलंदाज पूर्ण करेल, ज्याने त्याआधीचे षटक टाकले नसेल व ज्याला पुढील षटक टाकता येणार नाही.

**४२.५.२.३.३** जर दोषी खेळाडू फलंदाज असेल तर, तो/ती कायदे ३२ ते ३९ प्रमाणे बाद झाला/झाली नसल्यास, चालू डावात आणि त्याच्या/तिच्या संघाची फलंदाजी आहे अशा त्यानंतरच्या कोणत्याही डावात, त्याच्या डावाची नोंद, निवृत्त - बाद अशी केली जाईल. अशा वेळी दुसरा एखादा फलंदाज फलंदाजीसाठी उपलब्ध नसल्यास तो डाव संपेल.

**४२.५.२.३.४** त्याच्या/तिच्या संघातील कोणत्याही सदस्याने जर पुन्हा पहिल्या स्तराचा गुन्हा केला तर विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करण्यात येतील, अशी गुन्हा करणाऱ्या खेळाडूच्या कर्णधाराला पंच ताकीद देईल.

**४२.५.२.४** शक्य तितक्या लवकर, पंच

- विरुद्ध संघाला ५ दंड धावा बहाल करेल
- स्कोअररला चौथ्या स्तराच्या दंडाचा इशारा करेल
- 'प्ले'चा पुकार करेल.

**४२.५.२.५** सामना संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर दोन्ही पंच मिळून घडलेल्या घटनेबद्दल संबंधित संघाचे कार्यकारी अधिकारी आणि सामन्यासाठी जबाबदार प्रशासकीय समिती यांना अहवाल सादर करतील, जे कर्णधार, इतर संबंधित व्यक्ती आणि आवश्यकता भासल्यास संपूर्ण संघावर योग्य ती कारवाई करतील.

## ४२.६ कर्णधाराने एखाद्या खेळाडूस मैदानाबाहेर काढण्यास नकार देणे

**४२.६.१** जर कर्णधाराने ४२.४.२.३ किंवा ४२.५.२.३ मधील एखाद्या सूचनेचे पालन करण्यास नकार दिला, तर पंच कायदा १६.३ (पंचांनी सामना बहाल करणे) लागू करतील.

**४२.६.२** जर दोन्ही कर्णधारांनी, एकाच घटनेच्या संदर्भात ४२.४.२.३ किंवा ४२.५.२.३ मधील सूचनांचे पालन करण्यास नकार दिला, तर पंच सर्व खेळाडूंना मैदान सोडून जाण्यास सांगतील. कायदा १२.९ (सामना संपला) प्रमाणे सामना संपणार नाही आणि कायदा १६ (निकाल) प्रमाणे सामन्याचा निकाल लागणार नाही.

## ४२.७ स्तर ३ आणि स्तर ४ गुन्ह्यांसंदर्भातील आणखी काही मुद्दे

**४२.७.१** एखाद्या खेळाडूने, यष्टिरक्षक म्हणून काम करत असताना जर तिसऱ्या किंवा चौथ्या स्तराचा गुन्हा केला, तर कायदा २४.१.२ (बदली क्षेत्ररक्षक) लागू होणार नाही, म्हणजेच एखादा नामांकन झालेला अधिकृत क्षेत्ररक्षकच यष्टिरक्षक म्हणून काम करू शकेल. जरी इतर कोणत्याही क्षेत्ररक्षकाला जखमी झाल्यामुळे किंवा आजारी पडल्यामुळे बदली खेळाडू दिला गेला असला, तरीही हे लागू राहील.

**४२.७.२** ज्याला बदली खेळाडू किंवा रनर दिलेला आहे, अशा नामांकन झालेल्या अधिकृत क्षेत्ररक्षकाला, त्याला दिलेल्या बदली खेळाडूने किंवा रनरने केलेल्या तिसऱ्या किंवा चौथ्या स्तराच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगावी लागेल.

**४२.७.२.१** जेव्हा बदली क्षेत्ररक्षक एखादा गुन्हा करेल तेव्हा नामांकन झालेला खेळाडू व बदली क्षेत्ररक्षक दोघांनाही ४२.४.२.३ किंवा ४२.५.२.३ यांमधील लागू असेल त्याप्रमाणे, योग्य ती शिक्षा भोगावी लागेल. मात्र ४२.४.२.५ किंवा ४२.५.२.५ प्रमाणे फक्त त्या बदली खेळाडूची तक्रार केली जाईल.

**४२.७.२.२** जेव्हा रनर एखादा गुन्हा करेल, तेव्हा ज्याला रनर दिला आहे असा फलंदाज व रनर या दोघांनाही ४२.४.२.३ किंवा ४२.५.२.३ यांमधील लागू असेल त्याप्रमाणे, योग्य ती शिक्षा भोगावी लागेल. चौथ्या स्तराची शिक्षा रनरला उर्वरित सामन्यासाठी भोगावी लागेल. मात्र ज्यासाठी तो रनर म्हणून राहिला आहे, त्या फलंदाजाला ती शिक्षा त्या डावासाठीच भोगावी लागेल.

**परिशिष्ट 'अ'**

मजकुरात स्पष्ट न केल्या गेलेल्या शब्दांच्या किंवा वाक्प्रचारांच्या व्याख्या आणि त्याचे स्पष्टीकरण.

**अ१ सामना**

**अ१.१ खेळ** हा शब्द या कायद्यांमध्ये क्रिकेटचा खेळ याअर्थी वापरला आहे.

**अ१.२ सामना** म्हणजे दोन संघांमध्ये क्रिकेटच्या कायद्याअंतर्गत खेळला जाणारा एक सामना (स्पर्धा) होय.

**अ१.३ नाणेफेक** म्हणजे डावाच्या निवडीसाठी करण्यात येणारी नाणेफेक.

**अ१.४ नाणेफेकीच्या आधी** म्हणजे सामना सुरू होण्याची अपेक्षा असलेल्या दिवशी नाणेफेकीच्या आधी कधीही आणि एक दिवसीय सामना असल्यास सामन्याच्या दिवशी नाणेफेकीच्या आधी कधीही.

**अ१.५ सामन्यापूर्वी** म्हणजे नाणेफेकीच्या आधी कधीही. हे नाणेफेक होणार असेल त्या दिवसापुरते मर्यादित नसेल.

**अ१.६ सामन्यादरम्यान** म्हणजे खेळ चालू असो किंवा नसो, नाणेफेक झाल्यानंतर सामना संपेपर्यंत कधीही.

**अ१.७ खेळाचा कालावधी** म्हणजे 'प्ले' चा पुकार झाल्यापासून 'टाईम' चा पुकार होईपर्यंतचा काळ. कायदे १२.१ ('प्ले'चा पुकार) व १२.२ ('टाईम'चा पुकार) पाहा.

**अ१.८ सामन्याच्या संचालना**मध्ये सामन्याच्या कोणत्याही दिवशी कोणत्याही वेळी सामन्याशी संबंधित घडलेल्या कोणत्याही घटनेचा अंतर्भाव असेल.

**अ२ सामन्यात वापरण्याच्या वस्तू आणि उपकरणे**

**अ२.१** बॅट, चेंडू, यष्टी आणि बेल्स ह्या **सामन्यात वापरण्याच्या वस्तू** होत.

**अ२.२ बाह्य संरक्षक उपकरण** म्हणजे पोशाखातील कोणतीही दृश्य वस्तू जी शरीराला बाहेरून होणाऱ्या दुखापती पासून संरक्षण होण्यासाठी परिधान केली आहे.

फलंदाजांना, संरक्षक हेल्मेट, बाहेरील पॅड (फलंदाजीचे पॅड), फलंदाजीचे ग्लोव्हज आणि, बाहेरच्या बाजूला दिसत असल्यास, हाताचे कवच, या गोष्टी घालण्याची परवानगी आहे.

क्षेत्ररक्षकास फक्त संरक्षक हेल्मेट घालण्यासाठी परवानगी असेल. मात्र, यष्टिरक्षकास यष्टीरक्षण करण्यासाठी लागणारे पॅड आणि ग्लोव्हज घालण्याची सुद्धा परवानगी असेल.

**अ२.३ संरक्षक हेल्मेट** म्हणजे टणक पदार्थांनी डोक्याच्या, चेहऱ्याच्या किंवा या दोन्हींच्या संरक्षणासाठी बनवलेले डोक्यात घालण्याचे हेल्मेट. क्रिकेटच्या या कायद्यांसाठी, या व्याख्येत चेहऱ्याच्या संरक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या इतर संरक्षक उपकरणाचाही (फेस गार्ड) समावेश असेल.

**अ२.४ उपकरण** - फलंदाजाचे उपकरण, म्हणजे वरील व्याख्येप्रमाणे त्याची/तिची बॅट व त्याने/तिने घातलेले इतर बाह्य संरक्षक उपकरण.

क्षेत्ररक्षकाचे उपकरण म्हणजे, त्याने/तिने घातलेले कोणतेही बाह्य संरक्षक उपकरण.

**अ२.५ बॅट** - पुढील गोष्टी बॅटचा भाग मानण्यात येतील.

- संपूर्ण बॅट.
- बॅट ज्या हातात (किंवा हातांत) धरली आहे त्या हातात (किंवा हातांत) घातलेला ग्लोव्ह (किंवा ग्लोव्ह्ज).
- त्या हातात किंवा हातांत ग्लोव्ह्ज घातला/घातले नसल्यास, फलंदाजाच्या ज्या हातात किंवा हातांत बॅट धरलेली आहे, त्या हाताचा/हातांचा पंजा.

**अ२.६ फलंदाजाने हातात धरलेली.** फलंदाजाच्या हाताचा किंवा ग्लोव्ह घातलेल्या हाताचा आणि बॅटच्या कोणत्याही भागाचा एकमेकांशी असलेला स्पर्श.

**अ३ खेळण्याचे क्षेत्र**

**अ३.१ खेळाचे मैदान,** म्हणजे सीमारेषेच्या आतील क्षेत्र.

**अ३.२ चौकोन,** म्हणजे तयार केलेला असा खास चौकोन ज्यामध्ये सामन्याची खेळपट्टी आहे.

**अ३.३ बाहेरील मैदान,** म्हणजे मैदानातील चौकोन आणि सीमारेषा यांच्या मधील मैदानाचा भाग

**अ४ जागा**

**अ४.१** खेळपट्टीच्या एका बाजूच्या **पॉपिंग क्रीझच्या मागे,** म्हणजे मैदानाचा तो भाग, ज्यात आखलेली इतर क्रीझेस व काही खुणा, वस्तू किंवा त्यातील व्यक्तींचाही समावेश असेल व जो त्या पॉपिंग क्रीझच्या त्या बाजूला असेल, ज्यात खेळपट्टीच्या दुसऱ्या बाजूच्या क्रीझेसचा समावेश नसेल. इतर क्रीझेस व काही खुणा, वस्तू किंवा व्यक्तीच्या संदर्भात **मागे आहे,** असे म्हणण्यातही हेच तत्व आहे. अ१३ मधील आकृती पाहा.

**अ४.२** खेळपट्टीच्या एका बाजूच्या **पॉपिंग क्रीझच्या पुढे,** म्हणजे मैदानाचा तो भाग, ज्यात आखलेली इतर क्रीझेस व काही खुणा, वस्तू किंवा त्यातील व्यक्तींचाही समावेश असेल व जो पॉपिंग क्रीझच्या त्या बाजूला असेल, ज्यात दुसऱ्या बाजूच्या क्रीझेसचा समावेश असेल. इतर क्रीझेस व काही खुणा, वस्तू किंवा व्यक्तीच्या संदर्भात **पुढे आहे,** असे म्हणण्यातही हेच तत्व आहे. अ१३ मधील आकृती पाहा.

**अ४.३ स्ट्रायकरकडील बाजू,** म्हणजे ती बाजू जेथे स्ट्रायकर गोलंदाजाने टाकलेला चेंडू खेळण्यासाठी उभा राहतो. हे ती बाजू ओळखण्यापुरते असेल. त्यानंतर तेथून तो कुठे गेला त्याचा याच्याशी संबंध नाही.

**अ४.४ गोलंदाजाकडील बाजू,** म्हणजे ती बाजू जेथून गोलंदाज चेंडू टाकतो. ही बाजू, अ४.३ मध्ये म्हटलेल्या स्ट्रायकरच्या बाजूच्या विरुध्द दिशेची बाजू म्हणून ओळखली जाईल.

**अ४.५ यष्टिरक्षकाची बाजू,** म्हणजे अ४.३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्ट्रायकरकडील बाजू.

**अ४.६ स्ट्रायकरच्या यष्टींच्या पुढील रेषेत,** म्हणजे स्ट्रायकरच्या बाजूच्या तिन्ही यष्टींची पुढची बाजू जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या पुढचा मैदानाचा भाग; ही रेषा दोन्ही बाजूला सीमारेषेपर्यंत आहे असे मानले जाईल. अ४.२ पाहा.

**अ४.७ यष्टींच्या मागे,** म्हणजे त्या विशिष्ट बाजूच्या तिन्ही यष्टींची मागची बाजू जोडणाऱ्या काल्पनिक रेषेच्या मागचा मैदानाचा भाग; ही रेषा दोन्ही बाजूला सीमारेषेपर्यंत आहे असे मानले जाईल. अ४.१ पाहा.

**अ४.८ यष्टिरक्षकाच्या मागे** म्हणजे वर स्पष्ट केल्याप्रमाणे स्ट्रायकरच्या बाजूच्या यष्टींच्या मागे, मात्र दोन्ही यष्टींच्या संचांच्या रेषेत सरळ आणि यष्टीरक्षकापेक्षा यष्टींपासून लांब.

**अ४.९ ऑफ साईड/ऑन साईड** - अ१३ मधील आकृती पाहा.

**अ४.१० आतील कडा,** म्हणजे जवळ असलेल्या यष्टींच्या बाजूची कडा.

## अ५ पंच

**अ५.१ पंच** - जेथे फक्त 'पंच' असे म्हटले आहे, त्याचा अर्थ नेहमी 'गोलंदाजाकडील पंच' असा असेल. त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी किंवा योग्य अर्थ कळण्यासाठी हे काही वेळा विस्तृतपणे लिहिले आहे. 'एखादा पंच' किंवा 'पंच' या सर्वसाधारण संज्ञा आहेत. कोणता पंच अपेक्षित आहे, हे कळण्यासाठी काही वेळा त्याबद्दल विस्तृतपणे लिहिले आहे. प्रत्येक पंच एका आड एक षटकात गोलंदाजाकडील पंच व स्ट्रायकरकडील पंच असेल.

**अ५.२ गोलंदाजाकडील पंच** म्हणजे खेळीत असलेल्या चेंडूसाठी गोलंदाजाकडील बाजूस (अ४.४ पाहा) उभा/उभी आहे तो/ती पंच.

**अ५.३ स्ट्रायकरकडील पंच,** म्हणजे खेळीत असलेल्या चेंडूसाठी जो पंच स्ट्रायकरकडील बाजूला (अ४.३ पाहा), त्याच्या/तिच्या सोयीनुसार खेळपट्टीच्या कोणत्याही बाजूला, उभा आहे तो/ती पंच.

**अ५.४ दोन्ही पंचांची सहमती** अशा निर्णयांना लागू होईल, जे निर्णय दोन्ही पंच एकत्र, खेळाडूंशिवाय, घेतात.

## अ६ फलंदाज

**अ६.१ फलंदाजी संघ,** म्हणजे खेळ चालू असला किंवा नसला तरी, ज्या संघाची फलंदाजी चालू आहे, तो संघ.

**अ६.२ फलंदाजी संघाचा सदस्य,** म्हणजे फलंदाजी संघाच्या कर्णधाराने नामांकन केलेल्या सदस्यांपैकी एक, किंवा त्याच्या बदली दिला गेलेला अधिकृत खेळाडू.

**अ६.३ फलंदाजाचे क्रीझ -** खेळपट्टीच्या दोन्ही बाजूंना असलेल्या पॉपिंग क्रीझच्या मागचा मैदानाचा सर्व भाग, म्हणजे त्या बाजूचे फलंदाजाचे क्रीझ.

**अ६.४ मूळ जागा,** म्हणजे चेंडू खेळीत आला तेव्हा फलंदाज ज्या क्रीझ मध्ये होता, ती जागा.

**अ६.५ त्याने/तिने सोडलेली जागा,** म्हणजे चालू असलेल्या धावेच्या सुरूवातीला फलंदाज ज्या क्रीझ मध्ये होता, ती जागा.

**अ६.६ फलंदाजाची नेहमी उभे राहण्याची जागा,** म्हणजे गोलंदाजाने टाकलेला चेंडू खेळण्यासाठी स्ट्रायकरची उभे राहण्याची जागा आणि त्याचा पवित्रा.

**अ६.७** या कायद्यांसाठी, **कमरेची उंची,** म्हणजे फलंदाज क्रीझवर सरळ उभा असताना त्याने/तिने परंपरागतरित्या परिधान केलेल्या पँटच्या वरच्या रेषेपर्यंतची उंची.

## अ७ क्षेत्ररक्षक

**अ७.१ क्षेत्ररक्षण संघ,** म्हणजे ज्या संघाचे, खेळ चालू असला किंवा नसला तरीही, क्षेत्ररक्षण चालू आहे, असा संघ.

**अ७.२ क्षेत्ररक्षण संघाचा सदस्य,** म्हणजे क्षेत्ररक्षण संघाच्या कर्णधाराने नामांकन केलेल्या सदस्यांपैकी एक, किंवा त्याच्याबद्दल दिला गेलेला अधिकृत बदली खेळाडू, किंवा क्षेत्ररक्षणापुरता आलेला बदली खेळाडू.

**अ७.३ क्षेत्ररक्षक,** म्हणजे मैदानावर असणाऱ्या क्षेत्ररक्षण संघाच्या ११ किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या प्रतिनिधींपैकी एक. या व्याख्येमध्ये फक्त गोलंदाज आणि यष्टीरक्षकाचाच नाही, तर मैदानावर उपस्थित नामांकन झालेल्या इतर सदस्यांचा व त्याचबरोबर नामांकन झालेल्या अनुपस्थित सदस्यांच्या जागी क्षेत्ररक्षण करणाऱ्या बदली खेळाडूंचाही समावेश असेल. यामध्ये नामांकन झालेल्या सदस्यांपैकी जो अनुपस्थित आहे, त्याचा किंवा जो अनुपस्थित आहे आणि ज्याला मैदानावर परत येण्यासाठी पंचानी अजून परवानगी दिलेली नाही, अशा सदस्याचा समावेश नसेल.

एखादा खेळाडू क्षेत्ररक्षक म्हणून काही जबाबदारी पार पाडण्यासाठी अतिशय थोड्या कालावधीसाठी मैदानाबाहेर गेला, तर तो/ती अनुपस्थित आहे, असे मानले जाणार नाही किंवा कायदा २४.२ (क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती किंवा त्याने मैदान सोडणे) साठी त्याने/तिने मैदान सोडले आहे, असेही मानले जाणार नाही.

## अ८ बदली खेळाडू, अधिकृत बदली खेळाडू आणि रनर

**अ८.१ बदली खेळाडू,** हा एक असा खेळाडू आहे, जो मैदानावर क्षेत्ररक्षक म्हणून भूमिका बजावतो, मात्र ज्या खेळाडूसाठी तो/ती क्षेत्ररक्षण करतो/करते आहे, त्या खेळाडूची त्या संघाच्या नामांकन यादीतील जागा तो/ती घेत नाही. बदली खेळाडूची भूमिका ही क्षेत्ररक्षणापुरती मर्यादित आहे.

**अ८.२ अधिकृत बदली खेळाडू,** म्हणजे असा खेळाडू, जो नामांकन झालेल्या खेळाडूची जागा घेऊन स्वतः नामांकन झालेला अधिकृत खेळाडू बनतो. त्याची मैदानावरील भूमिका ही संघातील इतर नामांकित सदस्यांइतकीच मर्यादित असते.

**अ८.३ रनर** हा/ही संघातील अधिकृत सदस्य असेल, जो/जी त्याच्या/तिच्या संघातील फलंदाजी करत असलेल्या आणि धावण्यासाठी असमर्थ असलेल्या दुसऱ्या अधिकृत सदस्यासाठी धावतो/धावते.

**अ९ गोलंदाज**

**अ९.१ ओव्हर द विकेट/राउंड द विकेट** – गोलंदाज यष्टी आणि रिटर्न क्रीझच्या मधून धावत येताना जर यष्टी त्याच्या/तिच्या गोलंदाजी करणाऱ्या हाताच्या बाजूला असतील, तर तो/ती 'ओव्हर द विकेट' गोलंदाजी करत आहे. मात्र, जर रिटर्न क्रीझ त्याच्या/तिच्या गोलंदाजी करणाऱ्या हाताच्या बाजूला असेल, तर तो/ती 'राउंड द विकेट' गोलंदाजी करत आहे.

**अ९.२ डिलिवरी स्विंग** - डिलिवरी स्विंग, म्हणजे गोलंदाजाच्या हाताची अशी हालचाल, ज्या दरम्यान गोलंदाजी करताना सर्वसाधारणपणे तो चेंडू हातातून सोडतो.

**अ९.३ चेंडू टाकायची शेवटची झेप,** म्हणजे अशी झेप, ज्यामध्ये, चेंडू टाकला जावो अथवा न जावो, डिलिवरी स्विंग केला जातो. जेव्हा त्या झेपेत गोलंदाजाचा मागचा पाय जमिनीवर पडतो, तेव्हा चेंडू टाकायची शेवटची झेप सुरू होते आणि त्याच झेपेत जेव्हा पुढचा पाय पडतो, तेव्हा चेंडू टाकायची शेवटची झेप संपते. या शेवटच्या झेपेनंतरची झेप, जेव्हा शेवटच्या झेपेतील मागचा पाय पुन्हा जमिनीवर टेकतो, तेव्हा पूर्ण होते.

**अ१० चेंडू**

**अ१०.१ चेंडू मारला/चेंडूला मारले** - जर स्पष्टपणे वेगळे काही म्हटले नसेल, तर त्याचा अर्थ चेंडू बॅटने मारला किंवा चेंडूला बॅटने मारले, असा असेल.

**अ१०.२ थेट परत येतो/थेट लागतो** आणि अशा प्रकारच्या कोणत्याही शब्दाचा अर्थ 'कोणत्याही क्षेत्ररक्षकाला स्पर्श न होता' असा असेल. मात्र यातून मैदानाला होणारा स्पर्श वगळलेला नाही.

**अ१०.३ टप्पा न पडता,** म्हणजे गोलंदाजाने टाकलेला असा चेंडू, जो खेळपट्टीला स्पर्श न होता थेट स्ट्रायकरपर्यंत पोचतो किंवा स्ट्रायकरला पार करून जातो.

**अ११ धावा**

**अ११.१ नाकारण्यात आलेली धाव,** म्हणजे अशी धाव, जी कायद्यानुसार काढायलाच नको होती. अशी धाव केवळ रद्दच होणार नाही, तर फलंदाजांना त्यांच्या मूळ जागीही पाठवले जाईल.

**अ११.२ मोजता न येणारी धाव,** म्हणजे अशी धाव जी बेकायदेशीर नाही, मात्र ती योग्य प्रकारे काढलेली धाव म्हणून मानता येणार नाही. ती मोजता न येणारी धाव असल्यामुळे ती रद्द करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा प्रकारे काढण्याचा प्रयत्न केलेली धाव न मिळणे, म्हणजे धाव रद्द करणे नसल्यामुळे या कारणासाठी फलंदाजांना त्यांच्या मूळ जागी पाठवण्यात येणार नाही.

**अ१२ अंग**

**अ१२.१ अंग;** खेळाडूचे अंग, म्हणजे प्रत्यक्ष हाडा मांसाचा माणूस, ज्यात त्याच्या/तिच्या पोशाखाचा किंवा त्याने/तिने घातलेल्या बाह्य संरक्षक उपकरणाचा समावेश असेल. मात्र त्यात, फलंदाजाच्या बाबतीत, त्याच्या/तिच्या बॅटचा समावेश नसेल.

बॅट न धरलेला हात, ग्लोव्ह घातलेला असो किंवा नसो, फलंदाजाच्या अंगाचा भाग असेल.

कोणतेही उपकरण अथवा कपडे खेळाडूच्या अंगावर असल्याशिवाय ते त्याच्या/तिच्या अंगाचा भाग असणार नाहीत.


हातात धरलेला, मात्र हातात न घातलेला ग्लोव्ह हा फलंदाजाच्या अंगाचा भाग असेल.

क्षेत्ररक्षकासाठी, त्याने/तिने हातात धरलेल्या त्याच्या/तिच्या पोशाखाचा अथवा उपकरणाचा भाग हा त्याच्या/तिच्या अंगाचा भाग असणार नाही.

**अ१२.२ पोशाख** - ज्याला बाह्य संरक्षक उपकरण म्हणता येणार नाही अशा खेळाडूने घातलेल्या सर्व वस्तू, ज्यांत चष्मा किंवा दागिने, इत्यादीचा समावेश असेल, त्यांचा खेळाडूच्या पोशाखात अंतर्भाव असेल. यात त्याने/तिने संरक्षणासाठी घातलेल्या, पण न दिसणाऱ्या गोष्टींचाही अंतर्भाव असेल. या पोषाखाच्या व्याख्येत फलंदाजाच्या बॅटचा समावेश असणार नाही.

**अ१२.३ हात** - फलंदाजाचा किंवा यष्टिरक्षकाचा हात म्हणजे त्याचा/तिचा हात व त्याने हातात घातलेला संपूर्ण ग्लोव्ह.

### अ१३ ऑफ साईड/ऑन साईड; पॉपिंग क्रीझच्या पुढे/मागे



**परिशिष्ट ब: बॅट (कायदा ५)**

**ब.१ सर्वसाधारण मार्गदर्शन**

**ब.१.१** मोजमापे - खालील ब.२ ते ब.६ मधील तरतुदी कायद्यामध्ये व या परिशिष्टामध्ये दिलेल्या सर्व मोजमापांच्या व बंधनांच्या अधीन असतील.

**ब.१.२** चिकटपट्टी/गोंद - सर्व बाबतीत, चिकटवण्यासाठी वापरलेला पदार्थ/गोंद जेथे आवश्यक आहे तेथेच व कमीतकमी प्रमाणात वापरण्यास परवानगी आहे.

**ब.१.३** बॅटचे प्रकार - खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे, वेगळे काही म्हटले नसल्यास, 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' प्रकारच्या बॅटशी संबंधित आहेत.

**ब.२ हँडलसाठी मार्गदर्शक तत्वे**

**ब.२.१** हँडलची एक बाजू बॅटच्या पात्याच्या खाचेत हँडल आणि पाते जोडण्यासाठी घातली जाते. हँडलचा हा खालचा भाग केवळ बॅटचे पाते आणि हँडल एकत्र जोडण्यासाठी वापरला जातो. हा पात्याचा भाग नाही, परंतु खालील ब.३ आणि ब.४ चा अर्थ लावण्याच्या दृष्टीने जेथे जेथे बॅटच्या पात्याचा संदर्भ येईल, त्यात योग्य तेथे हँडलच्या या खालच्या भागाचाही समावेश असेल.

**ब.२.२** आवश्यक असेल तेथे हे हँडल चिकटवले जाऊ शकते आणि त्याचा वरचा भाग मजबूत दोऱ्याने बांधलेला असू शकतो.

कायदा ५.५ चे उल्लंघन न करता, चांगली पकड मिळावी म्हणून, हँडलचा वरच्या भागावर योग्य अशा पदार्थाचे आवरण घालता येऊ शकेल. कायदा ५.६ च्या संबंधाने सोडून, असे आवरण बॅटचा भाग मानण्यात येणार नाही. अशा आवरणाच्या खालच्या भागाचा विस्तार ब.२.४ मध्ये सांगितलेल्या मर्यादेपेक्षा पुढे जाता कामा नये.

गुंडाळलेला मजबूत दोरा आणि हँडलची ग्रीप याचा विस्तार, ब.३.१ मध्ये म्हटल्याप्रमाणे, हँडलचा खालचा आणि वरचा भाग जेथे एकत्र येतात, त्याच्या पुढे, बॅटच्या खांद्याचा काही भाग झाकला जाईल एवढा असू शकेल.

हँडलच्या खालच्या भागावर लावण्यासाठी किंवा त्याच्या आत घालण्यासाठी, वर सांगितलेले पदार्थ आणि हे पदार्थ चिकटवण्यासाठी किंवा हँडल आणि पाते एकमेकांना जोडण्यासाठी आवश्यक तेवढा गोंद किंवा चिकटपट्टी, यांशिवाय कोणताही पदार्थ वापरता येणार नाही.

**ब.२.३** **हँडलमध्ये वापरण्यात येणारे पदार्थ -** बांबू, लाकूड किंवा मजबूत दोरा यांव्यतिरिक्त हँडलमधील इतर पदार्थांचे प्रमाण 'अ' आणि 'ब' प्रकारच्या बॅटसाठी हँडलच्या आकारमानाच्या एक दशांश असावे आणि 'क' आणि 'ड' प्रकारच्या बॅटसाठी ते एक

पंचमांश असावे. असे पदार्थ हँडलच्या खालच्या भागात ३.२५ इंच/८.२५ से.मी. पेक्षा जास्त पुढे येऊ नयेत.

**ब.२.४ हँडलची बांधणी आणि आवरण -** हँडलची बांधणी आणि आवरण यांचा विस्तार, हँडलच्या लांबीच्या बाजूने मोजताना, हँडलचा खालचा आणि वरचा भाग जेथे एकत्र येतात, त्याच्या पुढे, जास्तीत जास्त,

गुंडाळलेल्या मजबूत दोऱ्यासाठी, २.५ इंच/६.३५ से.मी. असेल.

हँडलच्या ग्रीपसाठी, २.७५ इंच/६.९९ से.मी. असेल.

**ब.३ पात्यासाठी मार्गदर्शक तत्वे**

**ब.३.१** पात्याला एक पृष्ठभाग, एक पाठ, एक तळ, बाजू आणि खांदे असतात.

**ब.३.१.१** पात्याचा पृष्ठभाग, म्हणजे त्याचा मारण्यासाठी वापरण्यात येणारा पृष्ठभाग, जो सपाट असेल किंवा पारंपारिक दबाव तंत्रामुळे किंचित बहिर्वक्र झालेला असेल. पाठ म्हणजे याची विरुद्ध बाजू.

**ब.३.१.२** खांदे, बाजू आणि तळ हे उर्वरित भाग, पृष्ठभाग आणि पाठ यांना वेगळे करतात.

**ब.३.१.३** हँडलच्या दोन्ही बाजूला एक याप्रमाणे असलेले खांदे, म्हणजे हँडलचा पात्यात पहिल्यांदा प्रवेश होतो, तेथपासून जेथे पाते प्रथम सर्वाधिक रुंद होते, याच्या मधील भाग.

**ब.३.१.४** तळ, म्हणजे दोन्ही खांद्याच्या विरुध्द बाजूचा भाग.

**ब.३.१.५** तळ आणि खांदे यांच्यामधील उर्वरित पाते, म्हणजे पात्याच्या दोन्ही बाजूला एक याप्रमाणे असलेल्या बाजू.

**ब.३.२** ब.२.४, ब.३.३ आणि कायदा ५.४ यांमध्ये परवानगी असलेले पदार्थ आणि ते चिकटवण्यासाठी किंवा हँडल आणि पाते एकमेकात घट्ट बसवण्यासाठी, त्याच्या बरोबर वापरण्यात आलेला कमीतकमी गोंद किंवा चिकटपट्टी यांशिवाय इतर कोणताही पदार्थ पात्यावर लावता येणार नाही किंवा पात्याच्या आत घालता येणार नाही.

**ब.३.३** पात्यावर आवरण घालणे. 'अ' आणि 'ब' प्रकारच्या बॅटच्या पात्यावर, कायदा ५.४ प्रमाणे सोडून, आवरण घालता येणार नाही. 'क' आणि 'ड' प्रकारच्या बॅटला कापडाचे आवरण असू शकेल. याची दुरुस्ती/देखभाल खालील ब.४ प्रमाणे होऊ शकेल.

'क' आणि 'ड' प्रकारच्या बॅटच्या कापडी आवरण जाडी, ब.४.१ प्रमाणे दुरुस्ती/देखभाल करण्याआधी, ०.०१२ इंच /०.३ मिमी. पेक्षा जास्त असू नये.

वर सांगितलेले, कायदा ५.४ आणि खालील ब.४ प्रमाणे वापरलेले कोणतेही पदार्थ बॅटचा भाग मानण्यात येतील व त्याच्या सकट बॅट ब.८ मध्ये सांगितल्याप्रमाणे बॅटमापक यंत्रामधून जायला हवी.

**ब.४ संरक्षण आणि दुरुस्ती**

**ब.४.१** पात्याच्या पृष्ठभागाच्या आत येऊ शकणाऱ्या ओलसरपणाला प्रतिबंध व्हावा, म्हणून आणि/किंवा लाकडाच्या नैसर्गिक स्वरूपातील दोष लपविण्यासाठी, पात्याच्या पृष्ठभागावर घन नसलेल्या पदार्थाने उपचार केले जाऊ शकतील. अशा प्रकारच्या उपचारांमुळे पात्याचा मूळ रंग बदलता कामा नये. मात्र, संपूर्ण पाते एकसारखे दिसावे म्हणून त्याचे नैसर्गिक दोष झाकता येऊ शकतील.

**ब.४.२** कायदा ५.४ मध्ये सांगितलेले पदार्थ संरक्षण आणि दुरुस्तीसाठी वापरण्यात येऊ शकतील आणि ते पात्याच्या व्यतिरिक्त असतील. तथापि, कायदा ५.६ ची नोंद घ्यावी.

कायदा ५.४.१ प्रमाणे सोडून, अशा प्रकारच्या कोणत्याही पदार्थाचा विस्तार पात्याच्या पाठीच्या कोणत्याही भागावर असू नये आणि तो तसा असल्यास, केवळ खराब झालेल्या भागावर गुंडाळलेल्या सलग आवरणाच्या स्वरुपात असावा.

दुरुस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या पदार्थाचा विस्तार खराब झालेल्या भागाच्या प्रत्येक बाजूला पात्याच्या लांबीच्या बाजूने ०.७९ इंच/२.० से.मी. पेक्षा जास्त नसावा. तो जेथे सलग गुंडाळलेला असेल, तेथे गुंडाळलेल्या भागाची एकूण जाडी ०.०४ इंच/०.१ सेमी पेक्षा जास्त नसावी.

असा घन नसलेला पदार्थ, ज्याचा वाळल्यावर होणारा कडक थर ०.००४ इंच/०.०१ से.मी. पेक्षा जास्त जाड होतो, वापरण्यास परवानगी नसेल.

याशिवाय, 'ब', 'क' आणि 'ड' प्रकारच्या बॅटची खराबी होऊ नये यासाठी, तळामध्ये आणि/किंवा पात्याच्या पृष्ठभागाला समांतर अशा कोणत्याही बाजूमध्ये एखादा संरक्षक पदार्थ घालता येईल.

**ब.४.३** परवानगी असलेली आवरणे, दुरुस्तीसाठी लागणारे पदार्थ आणि तळाच्या संरक्षणासाठीचा पदार्थ यांची जाडी त्यांच्या निर्दिष्ट केलेल्या जाडीपेक्षा अधिक नसावी. त्यांची मोजमापे वर दिलेल्या मोजमापांपेक्षा जास्त असू शकतील, मात्र बॅट तरीही ब.८ मध्ये सांगितल्याप्रमाणे बॅटमापक यंत्रामधून जायला हवी.

**ब.५ तळाच्या आत आणि पात्याच्या बाजूने घालण्यात येणारे पदार्थ -** यासाठी वापरण्यात येणारे लाकूड ०.३५ इंच/०.८९ से.मी. पेक्षा जाड असू नये.

कोणत्याही क्षणी तळाच्या आत घालण्यात येणाऱ्या पदार्थांचा विस्तार तळापासून पात्याच्या वरपर्यंत कुठेही २.५ इंच/६.३५ से.मी. पेक्षा जास्त नसावा.

पात्याच्या कोणत्याही बाजूने घालण्यात आलेल्या पदार्थाचा विस्तार कडेपासून पात्यावर कुठेही १ इंच/२.५४ से.मी. पेक्षा जास्त नसावा.

**ब.६ व्यावसायिक चिन्हे -** अशा प्रकारची चिन्हे ०.००८ इंच/०.०२ से.मी. पेक्षा जाड असू नयेत. पात्याच्या मागच्या बाजूला त्यांनी पृष्ठभागाच्या ५०% पेक्षा जास्त भाग व्यापलेला असू नये. पात्याच्या पृष्ठभागावर त्यांनी व्यापलेला भाग, ब.२.२ आणि ब.२.४ मध्ये म्हटल्याप्रमाणे, बॅटच्या हँडलची ग्रीप जेथे संपते तेथपासून खाली मोजले असता, वरील ९ इंच/२२.८६ से.मी. मध्ये असावा.

**ब.७ 'ड' प्रकारच्या बॅट**


'ड' प्रकारच्या बॅट, त्यांच्या व्याख्येप्रमाणे, कायदा ५ आणि या परिशिष्टामध्ये दिलेली आकाराची मोजमापे आणि त्यांवरील निर्बंध, यांना धरून असाव्यात. याशिवाय पाते

**ब.७.१** लाकडाचा थर देऊन आणि त्याचे तीन पेक्षा जास्त तुकडे न वापरता बनवलेले असू शकेल.

**ब.७.२** कायदा ५.५ चे उल्लंघन न करता, रंगवलेले असू शकेल.

**ब.८ बॅटमापक यंत्र**

क्रिकेटच्या कायद्यानुसार असलेल्या सर्व बॅट कायदा ५.७ मधील मार्गदर्शक तत्वांप्रमाणे असाव्यात. त्या कायदा ५.४ मध्ये नमूद केलेल्या संरक्षक आवरणांसह किंवा त्याशिवाय बॅटमापक यंत्रातून पार जायला हव्या. या बॅटमापक यंत्राची मोजमापे आणि आकार पुढील आकृतीत दाखविलेला आहे.





<u>बॅटमापक यंत्राची मोजमापे</u>


| | |
|---|---|
| एकूण खोली | २.६८ इंच / ६.८ सेमी. |
| रुंदी | ४.३३ इंच / ११.० सेमी. |
| कडा | १.६१ इंच / ४.१ सेमी. |
| बाक | ०.२० इंच / ०.५ सेमी. |

टीप: बॅटमापक यंत्राच्या खालच्या कडेच्या बाकाची वर्तुळाकार त्रिज्या १२.० इंच / ३०.५ सेमी. असेल, ज्याचा केंद्रबिंदू बॅटमापक यंत्रामधील मोकळ्या जागेच्या उभ्या मध्यरेषेवर असेल.

## परिशिष्ट 'क'
## कायदा ६ (खेळपट्टी) आणि कायदा ७ (क्रीझेस)



# परिशिष्ट 'ड'
## कायदा ८ (यष्टी)




### बेल्स
वारिष्ठ दर्जाच्या क्रिकेटसाठी

संपूर्ण बेल्स: ४.३१ इंच / १०.९५ सेमी.

(अ) १.३८ इंच / ३.५० सेमी.

(ब) २.१३ इंच / ५.४० सेमी.

(क) ०.८१ इंच / २.०६ सेमी.

### यष्टी
वारिष्ठ दर्जाच्या क्रिकेटसाठी

(ड) उंची: २८ इंच / ७.११ सेमी.

(इ) परीघ

जास्तीतजास्त १.५ इंच / ३.८१ सेमी.

कमीतकमी १.३८ इंच / ३.५० सेमी.

### संपूर्ण यष्टींची रुंदी
(फ) ९ इंच / २२.८६ सेमी.

## परिशिष्ट 'इ'
## यष्टिरक्षणाचे ग्लोव्हस





ह्या आकृत्या खालील गोष्टी स्पष्ट करतात:

➔ दोन बोटांच्या मध्ये जोड वापरलेला नाही

➔ ही तर्जनी आणि अंगठा यांच्या मध्ये आधारासाठी एका सलग ताणल्या न जाणाऱ्या पदार्थाचा जोड वापरला आहे

➔ आणि, जेव्हा ग्लोव्ह घातलेल्या हाताचा अंगठा पूर्णपणे ताणलेला असेल तेव्हा तर्जनी व अंगठा यांमधील आधारासाठी वापरलेल्या जोडाची वरची रेषा तर्जनीच्या वरच्या टोकापासून अंगठ्याच्या वरच्या टोकापर्यंत सरळ व ताठ आहे.

## विषय सूची


**प्रस्तावना** २

**उद्देशिका - क्रिकेटमधील खिलाडूवृत्ती** ५

**कायदा १: खेळाडू**

१.१ खेळाडूंची संख्या ६

१.२ नामांकन आणि खेळाडूंच्या मूळ यादीत बदल ६

१.३ कर्णधार ६

१.४ कर्णधाराची जबाबदारी ६

**कायदा २: पंच**

२.१ नियुक्ती आणि उपस्थिती ७

२.२ पंच बदलणे ७

२.३ कर्णधारांशी सल्लामसलत ७

२.४ यष्टी, क्रिझेस आणि सीमारेषा ७

२.५ सामन्याचे संचालन, सामन्यात वापरण्याच्या वस्तू आणि उपकरणे ८

२.६ उचित व अनुचित खेळ ८

२.७ मैदान, हवामान व प्रकाश यांची योग्यता ८

२.८ धोकादायक किंवा प्रतिकूल परिस्थितीत खेळ थांबवणे ९

२.९ पंचांची जागा ९

२.१० पंचांनी बाजू बदलणे ९

२.११ मतभेद आणि वादविवाद ९

२.१२ पंचांचा निर्णय १०

२.१३ इशारे १०

२.१४ पंचांना कळवणे ११

२.१५ धावसंख्येची अचूकता ११

**कायदा ३: स्कोअरर्स**

३.१ स्कोअरर्सची नेमणूक १२

३.२ धावसंख्येची अचूकता १२

३.३ इशाऱ्याची पोच देणे १२

**कायदा ४: चेंडू**

४.१ वजन व आकार १२

४.२ चेंडूची निवड आणि ताबा १२

४.३ नवीन चेंडू १२

४.४ एकापेक्षा जास्त दिवसाच्या सामन्यात नवीन चेंडू १३

४.५ चेंडू हरवला किंवा खेळण्यास निरुपयोगी झाला १३

४.६ मोजमापे १३

**कायदा ५: बॅट**

५.१ बॅट १३

५.२ हँडल १३

५.३ पाते १४

५.४ संरक्षण आणि दुरुस्ती १४

५.५ चेंडूला हानी पोहोचणे १४

५.६ चेंडूचा स्पर्श १५

५.७ बॅटच्या आकारावरील मर्यादा १५

५.८ बॅटचे प्रकार १६

**कायदा ६: खेळपट्टी**

६.१ खेळपट्टीचे क्षेत्र १६

६.२ खेळण्यासाठी खेळपट्टीची योग्यता १६

६.३ खेळपट्टीचा निवड आणि तयारी १६

६.४ खेळपट्टी बदलणे १७

६.५ कृत्रिम खेळपट्टी १७

**कायदा ७: क्रीझेस**

७.१ क्रीझेस १७

७.२ बोलिंग क्रीझ १७

७.३ पॉपिंग क्रीझ १७

७.४ रिटर्न क्रीझेस १७

**कायदा ८: यष्टी**

८.१ वर्णन, रुंदी आणि यष्टी रोवणे १८

८.२ यष्टींची मापे १८

८.३ बेल्स १८

८.४ लहान वयोगटाचे क्रिकेट १८

८.५ बेल्स काढून ठेवणे १९

**कायदा ९: खेळण्याच्या क्षेत्राची तयारी व देखभाल**

९.१ रोलिंग १९

९.२ खेळपट्टीवरील सैल दगड माती काढणे १९

९.३ गवत कापणे २०

९.४ खेळपट्टीवर पाणी मारणे २१

९.५ क्रिझेस पुन्हा आखणे २१

९.६ पायामुळे झालेल्या खड्ड्यांची देखभाल २१

| | | |
|---|---|---|
| ९.७ | पाऊल घसरू नये म्हणून उपाय व खेळपट्टीची देखभाल | २१ |
| ९.८ | कृत्रिम खेळपट्ट्या | २१ |
| **कायदा १०:** | **खेळपट्टी आच्छादित करणे** | |
| १०.१ | सामन्यापूर्वी | २१ |
| १०.२ | सामन्यादरम्यान | २२ |
| १०.३ | आच्छादने काढणे | २२ |
| **कायदा ११:** | **मध्यंतरे** | |
| ११.१ | मध्यंतर | २२ |
| ११.२ | मध्यंतराचा कालावधी | २२ |
| ११.३ | डावांमधील मध्यंतरासाठी वेगळा वेळ न देणे | २३ |
| ११.४ | मध्यंतराची ठरलेली वेळ बदलणे | २३ |
| ११.५ | जेवणाची ठरलेली वेळ बदलणे | २३ |
| ११.६ | चहापानाची ठरलेली वेळ बदलणे | २४ |
| ११.७ | जेवणाचे किंवा चहापानाचे मध्यंतर - ९ गडी बाद | २४ |
| ११.८ | पाण्याची मध्यंतरे | २५ |
| ११.९ | मध्यंतर न घेण्याचे ठरवणे | २५ |
| ११.१० | स्कोअररर्सना कळवणे | २५ |
| **कायदा १२:** | **खेळाची सुरुवात; खेळ थांबवणे** | |
| १२.१ | 'प्ले'चा पुकार | २६ |
| १२.२ | 'टाईम'चा पुकार | २६ |
| १२.३ | बेल्स काढणे | २६ |
| १२.४ | नवीन षटक सुरु करणे | २६ |
| १२.५ | षटक पूर्ण करणे | २६ |
| १२.६ | सामन्याचा शेवटचा तास - षटकांची संख्या | २६ |
| १२.७ | सामन्याचा शेवटचा तास - खेळातील व्यत्यय | २७ |
| १२.८ | सामन्याचा शेवटचा तास - दोन डावांमधील मध्यंतरे | २७ |
| १२.९ | सामना संपला | २८ |
| १२.१० | सामन्याचे शेवटचे षटक पूर्ण करणे | २८ |
| १२.११ | सामन्याच्या शेवटच्या तासात गोलंदाज षटक पूर्ण करू शकला नाही | २९ |
| **कायदा १३:** | **डाव** | |
| १३.१ | डावांची संख्या | २९ |
| १३.२ | आळीपाळीने डाव | २९ |
| १३.३ | पूर्ण झालेला डाव | २९ |
| १३.४ | नाणेफेक | ३० |
| १३.५ | निर्णय कळवणे | ३० |
| **कायदा १४:** | **फॉलोऑन** | |
| १४.१ | पहिल्या डावातील आघाडी | ३० |
| १४.२ | निर्णयाची सूचना | ३० |
| १४.३ | पहिल्या दिवसाचा खेळ वाया गेला | ३१ |
| **कायदा १५:** | **डाव घोषित करणे व डाव न खेळता सोडणे** | |
| १५.१ | डाव घोषित करण्याची वेळ | ३१ |
| १५.२ | डाव न खेळता सोडणे | ३१ |
| १५.३ | निर्णयाची सूचना | ३१ |
| **कायदा १६:** | **निकाल** | |
| १६.१ | विजय - दोन डावांचा सामना | ३१ |
| १६.२ | विजय - एका डावाचा सामना | ३१ |
| १६.३ | पंचांनी सामना बहाल करणे | ३१ |
| १६.४ | कायदा १३.१.२ प्रमाणे करार झालेले सामने | ३२ |
| १६.५ | इतर सर्व सामने - बरोबरी किंवा अनिर्णित | ३२ |
| १६.६ | विजयाचा फटका अथवा अवांतर धावा | ३३ |
| १६.७ | निकालाचा तपशील | ३३ |
| १६.८ | निकालाची अचूकता | ३३ |
| १६.९ | स्कोअरिंगमधील चुका | ३३ |
| १६.१० | निकाल बदलता येणार नाही | ३४ |
| **कायदा १७:** | **षटक** | |
| १७.१ | चेंडूंची संख्या | ३४ |
| १७.२ | षटकाची सुरुवात | ३४ |
| १७.३ | चेंडूंची वैधता | ३४ |
| १७.४ | 'ओव्हर'चा पुकार | ३५ |
| १७.५ | पंचाची मोजण्यात चूक झाली | ३५ |
| १७.६ | गोलंदाजाने बाजू बदलणे | ३५ |
| १७.७ | षटक पूर्ण करणे | ३५ |
| १७.८ | षटक चालू असताना गोलंदाज गोलंदाजी करण्यास असमर्थ झाला किंवा निलंबित झाला | ३६ |
| **कायदा १८:** | **धावा काढणे** | |
| १८.१ | धाव | ३६ |
| १८.२ | धावा रद्द | ३६ |

१८.३ तोकड्या धावा ३६
१८.४ अजाणतेपणी काढलेली तोकडी धाव ३७
१८.५ जाणूनबुजून काढलेल्या तोकड्या धावा ३७
१८.६ दंड म्हणून दिल्या जाणाऱ्या धावा ३८
१८.७ सीमापार चेंडूच्या धावा ३८
१८.८ फलंदाज बाद झाला तरी जमा होणाऱ्या धावा ३८
१८.९ गडी बाद होण्याव्यतिरिक्त चेंडू डेड झाला तेव्हा जमा होणाऱ्या धावा ३८
१८.१० काढलेल्या धावा जमा करणे ३९
१८.११ फलंदाज आपल्या मूळ जागेवर परत येईल ३९
१८.१२ फलंदाज त्याने/तिने सोडलेल्या जागेवर परत येईल ४०

**कायदा १९: सीमारेषा**

१९.१ मैदानावरील सीमारेषा निर्धारित करणे ४०
१९.२ सीमारेषा ठरवणे आणि तिची आखणी ४१
१९.३ सीमारेषा पूर्ववत करणे ४१
१९.४ चेंडू सीमारेषेपलीकडे टेकला ४२
१९.५ क्षेत्ररक्षक सीमारेषेपलीकडे टेकला ४२
१९.६ सीमापार चेंडूच्या धावा ४२
१९.७ चेंडू सीमापार गेल्यास जमा होणाऱ्या धावा ४३
१९.८ ओव्हरथ्रो किंवा क्षेत्ररक्षकाने जाणूनबुजून केलेली कृती ४३

**कायदा २०: डेड चेंडू**

२०.१ चेंडू डेड होतो ४४
२०.२ चेंडू पूर्णपणे स्थिरावणे ४४
२०.३ 'ओव्हर' किंवा 'टाईम'चा पुकार ४४
२०.४ पंचाने डेड चेंडूचा पुकार व इशारा करणे ४४
२०.५ चेंडू डेड रहात नाही ४५
२०.६ डेड चेंडू; चेंडू षटकातील एक म्हणून मोजणे ४६

**कायदा २१: नोबॉल**

२१.१ चेंडू टाकण्याची पद्धत ४६
२१.२ योग्य प्रकारे टाकलेला चेंडू - हात ४६
२१.३ चेंडू फेकला किंवा अंडरआर्म टाकला - पंचांनी करावयाची कृती ४७
२१.४ गोलंदाजाने चेंडू टाकण्याआधी तो स्ट्रायकरकडील बाजूस फेकला ४७
२१.५ योग्य प्रकारे टाकलेला चेंडू - पाय ४८
२१.६ चेंडू टाकताना गोलंदाजामुळे यष्टी पडणे ४८
२१.७ चेंडूचा एकापेक्षा जास्त वेळा टप्पा पडणे, चेंडू घरंगळत जाणे किंवा चेंडूचा टप्पा खेळपट्टीच्या बाहेर पडणे ४८
२१.८ चेंडू स्ट्रायकरच्या यष्टींच्या समोर येऊन थांबणे ४९
२१.९ गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूचा क्षेत्ररक्षकाला स्पर्श होणे ४९
२१.१० चेंडू टप्पा पडून स्ट्रायकरच्या डोक्याच्या वरून जाणे ४९
२१.११ इतर कायद्यांच्या उल्लंघनासाठी नोबॉल ४९
२१.१२ नोबॉल रद्द करणे ४९
२१.१३ वाईडच्या आधी नोबॉल ५०
२१.१४ चेंडू डेड होणार नाही ५०
२१.१५ नोबॉलसाठी दंड ५०
२१.१६ नोबॉलवर काढलेल्या धावा - कशा जमा होतील ५०
२१.१७ नोबॉल न मोजणे ५०
२१.१८ नोबॉलवर बाद ५०

**कायदा २२: वाईड चेंडू**

२२.१ चेंडू वाईड ठरवणे ५०
२२.२ वाईड चेंडूचा पुकार व इशारा ५१
२२.३ वाईड चेंडूचा निर्णय मागे घेणे ५१
२२.४ चेंडू वाईड नाही ५१
२२.५ चेंडू डेड नाही ५१
२२.६ वाईड चेंडूबद्दल दंड ५१
२२.७ वाईड चेंडूवरील धावा - कशा जमा होतील ५१
२२.८ वाईड न मोजणे ५२
२२.९ वाईड चेंडूवर बाद ५२

**कायदा २३: बाय व लेग बाय**

२३.१ बाईज ५२
२३.२ लेग बाईज ५२
२३.३ लेग बाईज बहाल केल्या जाणार नाहीत ५३

**कायदा २४: क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती; बदली खेळाडू**

२४.१ बदली क्षेत्ररक्षक ५३

२४.२ क्षेत्ररक्षकाची अनुपस्थिती किंवा त्याने मैदान सोडणे ५४
२४.३ दंडाच्या कालावधीला अपवाद ५५
२४.४ खेळाडूने परवानगी शिवाय परत येणे ५५

**कायदा २५: फलंदाजाचा डाव; रनर**

२५.१ फलंदाज किंवा रनर होण्यासाठी पात्रता ५६
२५.२ फलंदाजाच्या डावाची सुरुवात ५६
२५.३ फलंदाजाने डाव सुरु करण्यावरील बंधने ५६
२५.४ फलंदाज निवृत्त होणे ५७
२५.५ रनर ५७
२५.६ फलंदाज आणि त्याचा/तिचा रनर यांचे बाद होणे व त्यांचे वर्तन ५८
२५.७ स्ट्रायकरच्या रनरवरील बंधने ५९

**कायदा २६: मैदानावरील सराव**

२६.१ खेळपट्टी किंवा उर्वरित चौकोनावरील सराव ५९
२६.२ बाहेरील मैदानावर सराव ६०
२६.३ रन-अपचा सराव ६०
२६.४ कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दंड ६०

**कायदा २७: यष्टीरक्षक**

२७.१ संरक्षक उपकरणे ६१
२७.२ ग्लोव्हज ६१
२७.३ यष्टीरक्षकाची जागा ६२
२७.४ यष्टीरक्षकाची हालचाल ६२
२७.५ यष्टीरक्षकावरील बंधने ६३
२७.६ स्ट्रायकरचा यष्टीरक्षकास अडथळा ६३

**कायदा २८: क्षेत्ररक्षक**

२८.१ संरक्षक उपकरणे ६३
२८.२ चेंडू अडवणे ६३
२८.३ क्षेत्ररक्षण संघाची संरक्षक हेल्मेट्स ६४
२८.४ ऑन साईडच्या क्षेत्ररक्षकांवरील मर्यादा ६५
२८.५ क्षेत्ररक्षकांनी खेळपट्टीवर अतिक्रमण न करणे ६५
२८.६ यष्टीरक्षकाशिवाय इतर क्षेत्ररक्षकांची हालचाल ६५

**कायदा २९: यष्टी पडली**

२९.१ यष्टी पाडली ६६
२९.२ एक बेल पडली ६७
२९.३ यष्टी पूर्ववत करणे ६७
२९.४ बेल्स काढून ठेवणे ६७

**कायदा ३०: फलंदाज त्याच्या/ तिच्या क्रीझबाहेर**

३०.१ फलंदाज त्याच्या/तिच्या क्रीझबाहेर कधी असेल ६७
३०.२ फलंदाजाचे क्रीझ कोणते ६८
३०.३ नॉन-स्ट्रायकरची जागा ६८

**कायदा ३१: अपील्स**

३१.१ अपील झाल्याशिवाय पंच फलंदाजास बाद देणार नाहीत ६९
३१.२ फलंदाज बाद झाला ६९
३१.३ अपील करण्याची वेळ ६९
३१.४ अपील 'हाऊज दॅट' ६९
३१.५ अपीलास उत्तर देणे ६९
३१.६ पंचांची सल्लामसलत ७०
३१.७ फलंदाजाने गैरसमजुतीने डाव सोडणे ७०
३१.८ अपील मागे घेणे ७०

**कायदा ३२: त्रिफळाचीत**

३२.१ त्रिफळाचीत बाद ७०
३२.२ त्रिफळाचीत आधी धरतील ७१

**कायदा ३३: झेल**

३३.१ झेल बाद ७१
३३.२ योग्य झेल ७१
३३.३ झेल घेण्याची कृती ७२
३३.४ धावा जमा होणार नाहीत ७२
३३.५ झेलबाद आधी धरतील ७२

**कायदा ३४: चेंडू दोनदा मारला**

३४.१ चेंडू दोनदा मारला म्हणून बाद ७२
३४.२ चेंडू दोनदा मारला - नाबाद ७३
३४.३ कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारला ७३
३४.४ कायद्यानुसार चेंडू एकापेक्षा जास्त वेळा मारल्यास मिळणाऱ्या धावा ७२
३४.५ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही ७३

**कायदा ३५: स्वयंचीत**

३५.१ स्वयंचीत बाद ७३
३५.२ स्वयंचीत नाबाद ७४

**कायदा ३६: पायचीत**
३६.१ पायचीत बाद ७४
३६.२ चेंडूचा स्पर्श ७५
३६.३ यष्टींची ऑफ साईड ७५
**कायदा ३७: क्षेत्ररक्षणास अडथळा आणणे**
३७.१ क्षेत्ररक्षणास अडथळा आणला म्हणून बाद ७५
३७.२ क्षेत्ररक्षणास अडथळा आणला - नाबाद ७६
३७.३ झेल घेताना अडथळा आणला ७६
३७.४ क्षेत्ररक्षकास चेंडू परत करणे ७६
३७.५ मिळणाऱ्या धावा ७६
३७.६ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही ७७
**कायदा ३८: धावचीत**
३८.१ धावचीत बाद ७७
३८.२ धावचीत नाबाद ७७
३८.३ कोणता फलंदाज बाद ७८
३८.४ जमा होणाऱ्या धावा ७८
३८.५ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही ७८
**कायदा ३९: यष्टीचीत**
३९.१ यष्टीचीत बाद ७८
३९.२ चेंडू यष्टीरक्षकाच्या अंगाला लागून परतणे ७९
३९.३ यष्टीचीत नाबाद ७९
**कायदा ४०: उशिर झाला म्हणून बाद**
४०.१ उशिर झाला म्हणून बाद ७९
४०.२ गोलंदाजास श्रेय मिळणार नाही ८०
**कायदा ४१: अनुचित खेळ**
४१.१ उचित व अनुचित खेळ - कर्णधारांची जबाबदारी ८०
४१.२ अनुचित कृती ८०
४१.३ सामन्याचा चेंडू - त्याची स्थिती बदलणे ८१
४१.४ जाणूनबुजून स्ट्रायकरचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करणे ८२
४१.५ जाणूनबुजून फलंदाजाचे लक्ष विचलित करणे, फसवणूक करणे किंवा अडथळा आणणे ८३
४१.६ आखूड टप्प्याचे धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे ८४
४१.७ टप्पा न पाडता धोकादायक व अनुचित चेंडू टाकणे ८५
४१.८ जाणूनबुजून पुढच्या पायाने नोबॉल टाकणे ८७
४१.९ क्षेत्ररक्षण संघाने वेळ वाया घालवणे ८७
४१.१० फलंदाजांनी वेळ वाया घालवणे ८८
४१.११ संरक्षित क्षेत्र ८९
४१.१२ क्षेत्ररक्षकाने खेळपट्टी खराब करणे ८९
४१.१३ गोलंदाजाने संरक्षित क्षेत्रावर धावणे ९०
४१.१४ फलंदाजाने खेळपट्टी खराब करणे ९१
४१.१५ स्ट्रायकर संरक्षित क्षेत्रात आला ९२
४१.१६ नॉन-स्ट्रायकरने त्याचे/तिचे क्रीझ लवकर सोडणे ९३
४१.१७ फलंदाजांनी धाव चोरणे ९३
४१.१८ दंड धावा ९४
**कायदा ४२: खेळाडूंचे वर्तन**
४२.१ आक्षेपार्ह वर्तन ९५
४२.२ पहिल्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती ९५
४२.३ दुसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती ९६
४२.४ तिसऱ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती ९७
४२.५ चौथ्या स्तराचे गुन्हे आणि पंचांनी करावयाची कृती ९९
४२.६ कर्णधाराने एखाद्या खेळाडूस मैदानाबाहेर काढण्यास नकार देणे १०१
४२.७ स्तर ३ आणि स्तर ४ गुन्ह्यां - संदर्भातील आणखी काही मुद्दे १०१

**परिशिष्ट 'अ' मजकुरात स्पष्ट न केल्या गेलेल्या शब्दांच्या किंवा वाक्प्रचारांच्या व्याख्या आणि त्याचे स्पष्टीकरण**
अ१ सामना १०२
अ२ सामन्यात वापरण्याच्या वस्तू आणि उपकरणे १०२
अ३ खेळण्याचे क्षेत्र १०३
अ४ जागा १०३
अ५ पंच १०४
अ६ फलंदाज १०४
अ७ क्षेत्ररक्षक १०५

**अ८** बदली खेळाडू, अधिकृत बदली खेळाडू आणि रनर **१०५**

**अ९** गोलंदाज **१०६**

**अ१०** चेंडू **१०६**

**अ११** धावा **१०६**

**अ१२** अंग **१०७**

**अ१३** ऑफ साईड/ऑन साईड; पॉपिंग क्रीझच्या पुढे/मागे **१०८**

**परिशिष्ट 'ब' बॅट (कायदा ५)**

**ब.१** सर्वसाधारण मार्गदर्शन **१०९**

**ब.२** हँडलसाठी मार्गदर्शक तत्वे **१०९**

**ब.३** पात्यासाठी मार्गदर्शक तत्वे **११०**

**ब.४** संरक्षण आणि दुरुस्ती **१११**

**ब.५** तळाच्या आत आणि पात्याच्या बाजूने घालण्यात येणारे पदार्थ **१११**

**ब.६** व्यावसाईक चिन्हे **११२**

**ब.७** 'ड' प्रकारच्या बॅट **११२**

**ब.८** बॅटमापक यंत्र **११२**

**परिशिष्ट 'क'**

कायदा ६ (खेळपट्टी) **११३**

कायदा ७ (क्रीझेस) **११३**

**परिशिष्ट 'ड'**

कायदा ८ (यष्टी) **११४**

**परिशिष्ट 'इ'**

यष्टीरक्षकाचे ग्लोव्हस **११५**